म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९८२

वारशनिवाररविवारसोमवारमंगळवारबुधवारगुरुवारशुक्रवार

श्विनकार्तिकमार्गशीर्षपौषमाघफाल्गुनचैत्रवैशाखज्येष्ठआषाढश्रा

शिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्

र श्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्

# ऋतुचक्र

प्रतिपदाद्वितीयातृतीयाचतुर्थीपंचमीषष्ठीसप्तमीअष्टमीनवमीदशमीएकादशीद्वादशीत्रयोदशीचतुर्दशीपौर्णिमा

पदाद्वितीयातृतियाचतुर्थीपंचमीषष्ठीसप्तमीअष्टमीनवमीदशमीएकादशीद्वादशीत्रयोदशीचतुर्दशीपौर्णिमा

शुक्रवारशनिवाररविवारसोमवारमंगळवारबुधवारगुरुवारशुक्रवारशनिवाररविवारसोमवारमंगळवारबुधवा

शुक्रवारशनिवाररविवारसोमवारमंगळवारबुधवारगुरुवारशुक्रवारशनिवाररविवारसोमवारमंगळवारबुधवा

श्रावणभाद्रपदआश्विनकार्तिकमार्गशीर्षपौषमाघफाल्गुनचैत्रवैशाखज्येष्ठआषाढश्रावणभाद्र

शाखज्येष्ठआषाढश्रावणभाद्रपदआश्विनकार्तिकमार्गशीर्षपौषमाघफाल्गुनचैत्रवैशाखज्येष्ठआषाढश्रावणभाद्र

## दुर्गा भागवत

शिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाश

शिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाशरद्हिमःशिशिरश्चवसंतश्चग्रीष्मोवर्षाश

मेघमंडळमेघश्यामआषाढश्रावणसायळीपुष्पमंडितभाद्रपदसो

संतहृदय

REFBK-0015918

REFBK-0015918

ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

ऋतुचक्र

दा. क्र. १५८९८
निबंध

ऋतूंच्या लावण्यमहोत्सवाची चित्रे रेखाटणारे हे ललितनिबंध आहेत. दुर्गाबाईंनी डोळे भरून सृष्टीचे दर्शन घेतले आहे. निसर्गाची बदलती रूपे, पशुपक्ष्यांच्या हालचाली, रंगगंधांच्या बोलक्या संवेदना त्यांनी एखाद्या शास्त्रज्ञाच्या डोळस कुतूहलाने न्याहाळल्या आहेत. परंतु या शास्त्रीय दृष्टिकोनाला काव्यात्म प्रतिभेची मिळालेली जोड हे या ललितनिबंधांचे खरे वैशिष्ट्य आहे. या सृष्टीतल्या सर्व सौंदर्याचा भौतिक आणि कलात्मक आस्वाद घेणारे सौंदर्यासक्त मन त्यांच्याजवळ आहे. तसेच, या तरल सौंदर्यानुभवांना सेंद्रिय रूप देण्याचे, या अतींद्रिय क्षणांना इंद्रियांकरवी अनुभवायला लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेच्या ठिकाणी आहे. जाईजुईच्या झेल्यासारखे हातात धरून हुंगावेसे वाटणारे पर्जन्यरूप सूर्यबिंब, पोपटाच्या पिलांसारखी दिसणारी वडाची हिरवी पाने, पारिजातकाच्या मोत्यापोवळ्यांच्या राशीतून फुटणारे श्रावणाचे हसू, फुलांच्या पायघड्यांवरून भूतलावर पदार्पण करणारा पुष्पमंडित भाद्रपद...हे सारे रूपरसरंगगंधांचे, लावण्यविभ्रमांचे जग दुर्गाबाईंचे हे निबंध वाचीत क्षणोक्षणी प्रत्ययाला येते. निसर्गाच्या चित्रलिपीचे रहस्य दुर्गाबाईंना उलगडले आहे याची साक्ष या निबंधसंग्रहात पानोपानी मिळते.

लेखिकेची इतर पुस्तके

राजारामशास्त्री भागवत यांचे चरित्र : १९४७
राजारामशास्त्री भागवत यांचे संकीर्ण लेख ( संपादित ) : १९५०
महानदीच्या तीरावर : १९५३
लोकसाहित्याची रूपरेखा : १९५६
पूर्वा : १९५७
तुळशीचे लग्न : १९५७
भावमुद्रा : १९६०
व्यासपर्व : १९६२
दख्खनच्या लोककथा : १९५६
तामीळनाडच्या लोककथा : १९५९
रानझरा : १९६३
Early Buddhist Jurisprudence : 1938
A Digest of Comparative Philology : 1940
Hinduism and its Place in the New World Society : 1947
( Translation of Dr. Ketkar's writings on Hinduism )
Romance in Sacred Lore : 1948
A Primer of Anthropology : 1950
An outline of Indian Folklore : 1956

# ऋतुचक्र

दुर्गा
भागवत

पॉप्युलर
प्रकाशन

तिसरी आवृत्ती
फेब्रुवारी १९६७

© दुर्गा भागवत

पहिली आवृत्ती : सप्टेंबर १९५६ दुसरी आवृत्ती : जुलै १९५९
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे २
प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४
सजावट : देवीदास बागूल

ऋतुचक्र ........ १
वसंतहृदय चैत्र ........ ५
चैत्रसखा वैशाख ........ १५
ज्येष्ठातले पहिले मेघमंडळ ........ २७
मेघश्याम आषाढ ........ ३३
श्रावण-साखळी ........ ४५
पुष्पमंडित भाद्रपद ........ ५३
सोनेरी आश्विन ........ ६१
संध्यारंजित कार्तिक ........ ७१
प्रशांत आणि प्रक्षुब्ध मार्गशीर्ष ........ ८१
तालबद्ध पौष ........ ९३
मायावी माघ ........ १०१
रूपधर फाल्गुन ........ १११

## अनुक्रम

ऋतुचक्र

# ऋतुचक्र

ग्रं. क्र. १५६९८

'ऋ' किंवा ऋतू म्हणजेच फिरता काल. समस्त सृष्टीला कवटाळणारा, हरघटकेला तिला हसवणारा, रडवणारा, नटवणारा आणि तिचा सगळा नखरा, साज शृंगार हातांनी ओढून काढून तिला उन्हात तापवणारा, वाऱ्यात सुकवणारा, भिजवणारा कालाचा अगदी लहान अंश म्हणजेच ऋतू. कालाची पावलेच म्हणाना. कालाचे अनादि अनंत रूप कुणाला कळले आहे? कालाचे मुख प्रेमळ आहे की क्रूर आहे ते कुणाला समजले आहे? म्हणूनच प्राचीन काळापासून सूर्यालाच प्रसंगी काल म्हणण्याची प्रथा पडली आणि त्याच्यानंतर प्राणिसृष्टीतले निर्मितीचे आविष्कार पाहून, चंद्राच्या आगमनाप्रमाणे प्रचंड महासागरांना भरत्या ओहोट्या येतात हे पाहून, चंद्राच्या कलांप्रमाणे मानवाने कालाला चंद्राचे सौम्य रूप कल्पिले. गर्भाचा अधिष्ठाता देव चंद्राला मानले. या कालरूपी चंद्राच्या एकपासून बारा पावलांत प्राणिसृष्टीची गर्भावस्था चिंतकांनी ध्यानात घेतली. चंद्र गर्भपेशीच्या शिवणी शिवतो, असे वेदात

म्हटले आहे. आपल्या अमृतमय किरणांनी तो गर्भामध्ये जीवनाचा अंकुर रुजवतो. स्त्रीच्या ऋतुस्रावाचा आणि चंद्राचा संबंध तर अतोनात जवळचा. ऋतू शब्दातला तो कालमान मोजणारा अर्थही दोन्ही बाबतींत एकच. फिरून फिरून येणारा. सृजनशील.

या निसर्गाच्या आविष्कारावरच भव्य रूपके प्राचीन ऋषींनी केली. निसर्ग व मानव हे भिन्न नाहीत. आपण या अफाट सृष्टीहून वेगळे असूच शकत नाही, ही जाणीव लहान लहान गावांत, नद्यांच्या, डोंगरांच्या, अरण्यांच्या आसपास राहणाऱ्या प्राचीनांच्या मनात सदैव जागृत असे. पंचमहाभूतांच्या सूक्ष्मातल्या सूक्ष्म आणि भव्यातल्या भव्य आविष्काराबद्दल त्यांनी चिंतन केले आणि मग आपले काही ठोकळ सिद्धान्त व संकेत त्यांच्यावर बसवून ठेवले; तेच संकेत, त्याच भावना आम्ही अजून जोपासत होतो. त्यांतले काही संकेत मोठे मार्मिक आहेत. उदाहरणार्थ, चंद्र व गर्भ यांचे नाते पाहिल्यास आपल्या बाळगाण्यांतून चंद्राला मामा का म्हणतात हे कोडे सहज सुटते. तसेच मृगाचे किडे आषाढात दिसले की पृथ्वी ऋतुस्नात झाली असा पूर्वकालीन संकेत. कुणब्यांच्या लोकगीतांतही मुलीच्या वयात येण्याच्या प्रसंगाला मृगाच्या पावसाची उपमा दिली आहे. हे संकेत आहेत. पण आता केवळ या अद्‌भुतरम्य कल्पनांची कास धरून चालणार नाही. संकेतातला हा निसर्ग आपल्याला आपल्या पूर्वजांसारखा रंगवू शकणार नाही. ज्या उपमा त्यांच्या तोंडी शोभल्या त्या आमच्या जिभेला पेलणार नाहीत.

निसर्ग तोच आहे. पण आता आमचे जीवन शहरी झाले आहे. जीवनाचे उद्दिष्टही बदलू पाहाते आहे. तरी पण एवढे खरे की कुठे गवताचे पाते हलू दे, अद्याप ते आमच्या डोळ्यांना रिझवते. सांजसकाळचे पूर्वपश्चिमेचे रंग सुखदायक वाटतात. वाऱ्याची झुळुक अपूर्व स्पर्शसुख देते. पावसाच्या सरी अजूनही कानांत काळाचे अनादी गूढ कवन ओततात. वारे घो घो वाहताना झिजलेल्या काळ्या पहाडांच्या भीषण कहाण्या सांगतात. धो धो वाहणाऱ्या दरसाल गाळाने सुपीक होणाऱ्या शेतांच्या कहाण्यांबरोबर

आपल्या काठांवर फोफावलेल्या व विनाश पावलेल्या मानवी संस्कृतींची गूढ कथाही सांगत असतात.

शहरी मानवाला अजूनही निसर्ग असा हरघडीला ओढीत असतो. कामाचे घाईचे तास नि तास, दिवस, महिने, वर्षेही सोडल्यास, जे चार फुरसतीचे क्षण मिळतात, त्या वेळी आपण सहज त्या खिडकीबाहेर डोकावतो. मग शेजारच्या घराच्या छपरावर पडलेले ऊनही किती वेगळे वाटते. त्या वाकड्यातिकड्या छाया. घराच्या भिंतीतच उगवून हालणारे ते वडाचे रोपटेही कसे जिवन्त व जवळचे वाटते. ते घुमणारे पारवे तर मन ओढून घेतातच पण हे काळे कुळकुळीत कावळे, तेही चटचटीत उन्हात, त्यांच्या त्या तुळतुळीत पंखावर व पाठीवर मोरपंखी छटा दिसल्यामुळे किती सुरेख दिसताहेत. तितक्यातच पाहा, ते फुलचुखे बारीक चिमणे पक्षी आपल्या आनंदी तानेने तुमचे मन उल्हसित करताहेत. आजूबाजूचे साधे झाडही शहरी गजबजाटात एक प्रकारचा एकान्त तुमच्या भोवती निर्माण करते. त्याचे हिरवेपण जणू पलीकडल्या घरातल्या माणसांना तुमच्यापासून झाकूनच टाकीत आहे.

बारमास सवंग असलेली दृश्येही अशी चटका लावतात. मग खरोखर ऋतूंच्या ऐन बहाराच्या छटा किती हृद्य असतील, ते काय सांगायला हवे? आम्ही निसर्गापासून दूर गेलो तरी निसर्ग आमचा पाठपुरावा करतोच आहे. ऋतूंच्या रूपात तो प्रकट होतो आहे. पृथ्वीवर पडणाऱ्या कालाच्या या एका पावलात आणि आकाशात पडणाऱ्या दुसऱ्या पावलात सारे ऋतुचक्र सामावले आहे. त्या ऋतुचक्राचे दर्शन मला घडले तसे पुढे दिले आहे.

# वसंतहृदय

## चैत्र

श्रावणाची साखळी असते तशीच वसंताची. फाल्गुन, चैत्र आणि वैशाख हे तीन महिने वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले, वेसुमार रंगांनी नटलेले, प्रखर उन्हाने अंग भाजणारे, पण त्याच वेळी अत्यंत शीतल सुखकारक अशा दक्षिणानिलांनी गात्रांना सुखविणारे, दृष्टीला भ्रांत करणारे, प्राणिमात्रातल्या निर्मितीच्या शक्तीच्या उन्मादक वृत्तींना चेतविणारे असे हे महिने आहेत. एक दुसऱ्यात मिसळला आहे. तरी पण चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, मधुमास आहे, ऋतुराज वसंताचे स्पंदन पावणारे हृदय आहे, यात शंका नाही. चैत्र हा कुसुमाकर आहे. ' पुष्पधूळीमाजी लोळे वसंत ' असे मुक्तेश्वरांनी म्हटले आहे. याच महिन्यात परागांवर वसंत खरोखर लोळत असतो. ऋतुराजाचे किंवा मधुमासाचे लक्षण ज्ञानेश्वरांनी सुंदर रीतीने वर्णन केले आहे :

जैसे ऋतुपतीचे द्वार। वनश्री निरंतर
वोळगे फळभार। लावण्येसी ॥

ऋतुपतीच्या द्वारी वनश्रीचे–म्हणजे नवपल्लवांनी गर्द झाकलेल्या फुलांनी डवरून गेलेल्या वृक्षलतांचे दर्शन. हे दर्शन तर फाल्गुनातच घडते. मग मधुमासाचे वैशिष्ट्य कशात आहे ? या महिन्यात ते सारे सौंदर्य तर आहेच पण फळांचेही रूप दृष्ट लागेलसे असते. फुलातून, फळातून मधुरस वाहत असतो. माधुर्याची प्रतीती मनामनाला होत असते. पानाफुलांची शोभा उत्कटतेने प्रकट होत असते. पक्ष्यांचे रत्युत्सुक कंठ स्वच्छंद गाणी गात असतात. संयमाची बतावणी निसर्ग झुगारून देतो. उन्मत्त प्रेमाची उकळी जीवजंतूंच्याही अंगातून फुटते. ‘कुणास्तव कुणीतरी’ या वेळीं काहीतरी करण्याच्या खटपटीत असते. नटूनथटून दुसऱ्याला आकर्षित करायचे आणि परस्परांच्या सहकारातून स्वतःचे चिमुकले, क्षुद्र जीवनही विश्वाच्या भव्य नियतीत एकरूप, एकतान होईल असा आनंद निर्माण करण्याचे प्रकृतीचे तंत्र, सारी सजीव सृष्टी या वेळीं पाहा कशी मुक्त हस्ताने वापरीत आहे.

चैत्रातल्या पालवीचे रूप कुठेही मोठे मनोहर. पण ही पिंपळाची झाडे पाहा, कशी गहिऱ्या गुलाबी पानांच्या रेशमी पताका नाचवीत उभी आहेत ती. जुनी पाने गळतागळता नवी येत होती म्हणून शिरीषासारखी ही पालवी पहिल्याने डोळ्यांत भरत नव्हती. पण सारी नवी पाने आल्यावर खरोखरच उन्हात जेव्हा ही भडक गुलाबी पाने चमकतात, तेव्हा जणू काही सुंदर पुष्पांचे गेंदच या झाडावर फुलले आहेत असे वाटते. इतर झाडांची पालवी फार लहान असल्याने फार हलत नाही. पण या पानांची सारखी सळसळ. त्यातल्या त्यात आमच्या घराजवळ एक पिंपळाचे झाड आहे, ते तर फारच बहारीचे दिसते. त्याच्यावर मधुमालतीची प्रचंड वेल चढली आहे. चारी बाजूंनी अगदी मध्यापर्यंत त्या झाडाला तिने वेढून टाकले आहे. आणि आता ही मधुमालती गुलाबी गेंदांनी खच्चून भरली आहे. आता फुलायला आणखी जागा नाही, अशी दाटी पिंपळाच्या तांबूस पानांची आणि या गुच्छांची झाली आहे. तरुलतांच्या आलिंगनाची काव्यमय वर्णने मी पुष्कळ वाचली आहेत. पण मधुमालतीला आपल्या पल्लवांनी छातीशी घट्ट घट्ट

कवळून धरणाऱ्या आणि लाजवट पालवीने आच्छादलेले आपले सुंदर मस्तक किंचित लववून निर्भर हर्षाचे आणि कोमलतेचे प्रदर्शन करणारा हा पुराणवृक्ष पाहून माझी नजर येता जाता त्याच्यावर खिळून राहते. आणि नुसती पालवीच नाही तर हिरवी फळेही इतर झाडांप्रमाणे यांच्या फांदीफांदीला ओळीने चिकटून बसली आहेत.

नर अशोकाची झाडे तर डोकीपासून पायापर्यंत नटली आहेत. मादी अशोक फार थोडे. पण तीच झाडे फुलतात. मलबारहिलवरचे हे झाड नव्या पानांनी तर बहरलेच आहे. त्याची पाने नरासारखी शोभिवंत नाहीत. पण त्याच्यावरचे ते मधाने थबथबलेले तांबड्या फुलांचे मोठे मोठे केसर असलेले सुंदर तुरे हारोहारी लागले आहेत. प्रत्येक गुच्छात एखाददुसरे पांढुरके फूल असल्याने तर फुलांची शोभा अवर्णनीय वाटते.

सर्व फुलांत अतिशय हिरीरीने कोणी नटले असेल तर ही उग्रगंधी घाणेरी. किती शोभिवंत आणि दुरंगी फुलांच्या गुच्छांनी ती भरली आहे. गुलाबी फुलात एखादे पिवळे, पिवळ्यात एखादे गुलाबी, शेंदरी व पिवळा, पिवळा आणि जांभळा, लाल आणि पांढरा, जांभळा आणि गुलाबी, शेंदरी आणि जांभळा, किती म्हणून या झाडाच्या दुरंगी फुलांच्या रंगांचे वर्णन करावे ? वास्तविक हे कुठलेच दोन रंग स्वाभाविकपणे एकमेकांच्या शेजारी एरवी शोभणारे नाहीत, पण निसर्गाच्या दुनियेत कुठलेही भडक व एरवी विसंगत वाटणारे रंग विशोभित दिसत नाहीत, उलट एकमेकांची शोभा वाढवतात. गुजरातेत बऱ्याच भागांत वृक्षवनस्पतींचा दुष्काळ. तिथे या झाडाला भलतेच महत्त्व आहे. आपण तुच्छतेने घाणेरी म्हणतो तिला. आणि तिच्या अतुलनीय रंगसौंदर्याला उपेक्षून पुढे जातो. पण गुजरातीत ‘ चुनडी ’ असे सुंदर व यथार्थ नामाभिधान या झाडाला दिलेले आहे. आणि ह्या फुलाचे हे नाव ऐकल्यावर, काठेवाडी व राजपुतान्यातल्या चुनड्यांच्या भडक रंगाचे रहस्य मला उमगले. भडक विशोभित रंग म्हणून त्यांची पुष्कळदा कुचेष्टा केली जाते. जी रंगांची मिश्रणे आम्ही आमच्या वस्त्राभरणात कटाक्षाने टाळतो,

तीच या लोकांनी शतकानुशतके निसर्गाच्या प्रेरणेप्रमाणे शिरोधार्य मानली. भारतीय रंगाभिरुचीचे मूळ प्रादेशिक वातावरणात आणि नैसर्गिक आविष्कारात असलेले पाहून मोठे नवल वाटते.

तशीच ही माडाची आणि सुरमाडाची झाडे पाहा. माडाची झाडे बारमहा हिरवी आणि फळांनी भरलेली दिसतात. पल्लवांचा नखरा त्यांना माहीतच नाही जसा. पण फाल्गुन लागला की त्यांच्या माथ्यावर अधिक फिक्या रंगांचे जावळ भुरभुरल्यासारखे वाटते. त्यांच्या पानांच्या गाभ्यातून वाढलेल्या नारळांच्या लंगरांच्या वर होडीच्या आकाराचे पेव फुटते. आणि त्या सुक्या कळकट पेवातून वेताच्या रंगाच्या फुलांच्या लोंब्या बाहेर पडतात. चैत्राच्या मध्यापर्यंत या लोंब्या दिसतात. नारळाची फुले निर्गंध आणि टणक. पण झाडाखाली पडलेल्या फुलांच्या राशीतून चार दोन फुले उचलून घेऊन जरा निरखून पाहा. त्यांचा तो टणकपणा तुम्हाला बोचणार नाही. पाकळ्यांच्या गुळगुळीत स्पर्शाने बोटे सुखावतात. तीन पाकळ्यांची फिक्या पिवळ्या रंगांची ही फुले. आत तशाच रंगांच्या केसरांची दाटी. तीन पाकळ्यांचा हा फुलांचा पेला पाहून, त्यांच्या आकाराचे सौंदर्य पाहून तुम्ही मुग्ध झाल्याखेरीज राहणार नाही. प्रचंड नारळाचे हे नखाएवढे फूल पाहून मोठी गंमत वाटते! भविष्यपुराणात तीन पाकळ्यांच्या कमळाचे वर्णन आहे. मीही प्रत्यक्षात तीन पाकळ्यांचे फूल पाहिले नव्हते. सहज ही नारळीची, सुरमाडांची फुले पाहिली आणि तीन पाकळ्यांच्या कमळाची कल्पना प्रत्यक्षात पाहिल्याचे समाधान अनुभवले. चैत्रात या लोंब्यांबरोबर नारळाला लहान हिरवे खाकोटे झाडांवर धरले आहेत. सुरमाडांना हिरव्या सुरसुपाऱ्यांचे दोन हात लांबीचे, पाचूच्या मण्यांच्याच सरांचे जणू काही घोस लागले आहेत. वीस घोस आहेत. पंचवीस सरांचा एक एक घोस दर झाडावर, असे दोन तीन. वैशाखाच्या अखेरीस या सुपाऱ्या एका फळात दोन असलेल्या, काळ्याभोर अर्धमंडलाकृती अशा त्या चकचकीत सुपाऱ्या रस्त्यावर गळून पडतील. आम्ही लहानपणी त्या वेचून दिवसभर खात असू. त्यांनी सागरगोटे खेळत असू.

परवाच मी रस्त्यावरून फिरावयाला चालले होते. आणि काहीतरी शीतल कोमल माझ्या अंगावर ठिपकले. अतिमधुर सुगंध आजूबाजूला दरवळला. मी खाली पाहिले, तो सुरंगीची सुंदर केशरी परागांची आणि पांढऱ्या पाकळ्यांची नखाएवढी फुले खाली पडली होती. भराभरा ती वेचून मी वर पाहिले, तो काय ? त्या झाडाच्या विशाल जडाला, फांद्यांना ती अती नाजूक फुले बिलगली होती. इतर फुले लांबवर फुटलेल्या बारीक डहाळ्यांना लागतात, तशी ही नाहीत. पुढल्या रस्त्यावर उंडीची झाडे ताजी टवटवीत होऊन उभी होती. ती या सुरंगीच्या जातीचीच. तशीच सुंदर सुवासिक फुले येतात त्यांना. संस्कृतात पुन्नाग म्हणतात त्यांना. पण अजून ती झाडे फुललेली नाहीत.

शेजारचे कडुनिंबाचे झाड निळसर फुलांच्या तुऱ्यांनी भरून गेले आहे. त्यांचा सुगंध रात्रीच्या वेळी अतिशय मनोरम वाटतो. त्यांच्या शेजारीच कडवट उग्र वासाचे करंजाचे झाडही सबंध फुलले आहे. करंजाच्या फुलांचे रूप अलौकिक असते. अगदी नखाएवढी कळी; करंजीच्याच आकाराची, पांढरी, हिरवा परकर नेसलेली. पण फूल उमलले की किती निराळे दिसते. आत एक निळीजांभळी नाजूक सुंदर कळी आणि तिच्या डोकीवर अर्धवर्तुळ अशी पांढरी टोपी. जणू काही टोपडे घातलेला बाल घनश्यामच या फुलांच्या रूपात अवतरला आहे. रस्त्यावर पडलेला या फुलांचा खच फार रमणीय दिसतो.

नव्या पानांचा साज चढवून या जांभळीने शुभ्र फुलांचा नाजूक मोहोर आणि हिरव्या लांबोड्या फळांचे घोस अंगावर धारण केले आहेत. फुलांचे आणि फळांचे ते लावण्य पाहिले की कथासरित्सागरातल्या जांभळीच्या फुलात जन्मलेल्या आणि फळात वाढलेल्या सुंदर विद्याधरीची गोष्ट मला नेहमी आठवते. जांभळीचे फूल मसुरीएवढे, तेही केसरांचेच बनलेले. आत तिळाएवढा पेला. या फुलात मावणारी अप्सराच काय ते इवल्याल्या पेल्यातले मधुमिश्रित पेय पिऊ शकेल. शिरीषाच्या आणि या फुलांभोवती सुगा दिवसभर रुंजी घालतो आहे.

परंतु वसंतलक्ष्मीचे शुभ्र हास्य कुठे फुलत असेल तर ते पांढऱ्या खुरचाफ्याच्या झाडांवर. फाल्गुनात काही झाडे फुलली होती तर काही फुलू की नको या विचारात उभी होती. चाफ्याची घट्ट मिटून राहिलेली कळी फुलायला किती तरी दिवस लागतात. चाफ्याचे निष्पर्ण दांडे निळसर पांढऱ्या वर्णाचे, आकाशाच्या रंगात कसे एकजीव झालेसे वाटतात. पण त्यांच्या बोथटपणामुळेच आपले लक्ष वारंवार त्यांच्या कुरूपपणाने व्यथित होते. शिरीष, गुलमोहोरासारखी निष्पर्णतेची शोभा या झाडाला नाही. पण मार्गशीर्षाच्या अखेरीपासून या झाडाच्या बोथट दांड्यांच्या शेंड्यांवर चिकट लाल डिंकाचा स्राव दिसू लागतो. ते शेंडे तकाकू लागतात आणि मग फुटून वाहणाऱ्या चिरातून मांजराच्या नखासारख्या अणकुचीदार पण लाल अशा नख्या बाहेर पडतात. त्याही चिकामुळे चकाकतात. मग हे मोड वाढीस लागतात. आणि एका एका मोडातून अनेक डिक्षांचे गुच्छ बाहेर पडतात. ते झपाझप वाढून त्यांचे दांडोरे होतात आणि मग त्या दांडोऱ्यांच्या टोकांवर कळ्या धरतात. चांगल्या महिनाभर या कळ्या मुक्या असतात. आणि मग एकेक गुच्छ फुलता फुलता सबंध झाड फुललेले दिसते. नव्या कळ्या येत असतात. जुनी फुले गळत असतात. पण पांगाऱ्याप्रमाणेच झाडाच्या माथ्यावरचा पुष्पभार तसाच डौलदार आणि दाट असतो. पळस, सावरी आणि निष्पर्ण चाफ्यांचे पुष्पवैभव अपूर्व असते. मात्र चैत्रात चाफ्यांच्या फुलांचा ऐन भर तर पळस पांगाऱ्यांचा भर ओसरण्याची चिन्हे दिसु लागतात. सावरीवर फुलांच्या बरोबरीने लांबोडकी हिरवी फळे लटकू लागतात. पांगाऱ्याला, शिरीषाला हिरव्या शेंगा धरतात. अशा तऱ्हेने मधुमासातले फळांचे लावण्य झाडांवर दृग्गोचर होते.

चैत्रातल्या पर्णशोभेचे आणि फळशोभेचे वर्णन आंब्याफणसाशिवाय पूर्ण होणार नाही. वसंताशी पौषाअखेरीपासूनच मोहोरून सहकार करणारे हे आंब्याचे झाड. देठांना लागलेले कैऱ्यांचे लांबलचक हिरवे गोळे वाऱ्याबरोबर झोके घेत असताना, किंवा पोपट किंवा कावळे त्या पाडाला लागल्या आहेत

की नाहीत ते पाहण्याकरिता त्यांना चोचींनी प्रहार करतात, तेव्हा मोठी मौज दिसते. गावाबाहेरच्या झाडांतून कोकिळांचे कूजनही बहुधा याच झाडांवर चालत असते. कैऱ्या जून झालेल्या असतानाच एकीकडे पाने झडत असतात. पण झाड रुक्ष असे कधीच दिसत नाही. चैत्रात याही झाडाला पालवीचे घोसच्या घोस लागतात आणि कैऱ्यांबरोबर तेही झोके घेतात. माघातले मोहोरांच्या झुबक्यांनी भरलेले व सुगंधाने दरवळलेले झाड सुंदर की आताचे, हे सांगणे कठीण आहे. आणि फणस ! त्याला नजरेत भरण्यासारखी पालवी नसली तरी तेही टवटवीत दिसते आहे. आणि त्याची फळे पायापासून डोकीपर्यंत लादली गेलेली नजरेत भरताहेत. फणसाला फुले धरत नाहीत पण पौषमाघात त्याला हिरवे कोके येतात. फुगीर मिरचीसारखे. मग एकेक कोका दुभंगतो. वरचे टरफल तपकिरी होऊन गळते. आतला हिरवा फणस गुळगुळीत तुकतुकीत असतो. मग काही दिवसांनी त्यावर खसखशीसारखे बारके दाणे दिसू लागतात. ते दाणे वाढून पांढऱ्या किडीसारखे तंतू बनतात. त्यांच्या खालून काटे वाढतात. आणि ते तंतू गळले की संपूर्ण अवयवांनी युक्त पण आकाराने मुसुंब्याएवढा फणस तयार होतो. अगदी बुंध्यापासून ते धरतात. कधी कधी फळ अर्धे मातीत पण गाडले जाते.

रूपरसगंधमय अशा या चैत्रमासाची शोभा झाडावरच्या काही बांधल्या जाणाऱ्या आणि काही गेलेल्या पक्ष्यांच्या घरट्यांनी पूर्णत्वाला येते. ठिकठिकाणी काही लोंबत्या आकाराची, तर काही वाटोळी चेंडूसारखी, तर काही पसरट गोल, अशी ही काळीकबरी घरटी म्हणजे वसंताच्या चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात मला. समोर सारी झाडे पालवताहेत, फुलताहेत, फळताहेत; पक्षी गाताहेत, मीलन पावताहेत, घरे बांधून अंडी घालताहेत. सारा सारा निसर्गाविष्कार उघड्यावर पडला असून त्याच्या त्या विराट खुलेपणामुळेच त्याच्याभोवती गूढ आवरण पडल्यासारखे वाटते आहे. उघड्या दोन डोळ्यांत तो अविष्कार मावत नाही. बुद्धीचे चिमुकले विश्व या पसाऱ्याचे प्रतिबिंब साठविण्यास असमर्थ असते. या पसाऱ्यातलाच एक

सचेतन, सुखलोलुप, परिमाणू, म्हणजे आपले मन, आपले शरीर, आपल्या साऱ्या संवेदना असे मात्र सारखे जाणवत असते. आणि म्हणूनच कोणत्याही चिमुकल्या निसर्गदृश्याशी या वेळी आपण एकतान होऊ शकतो. एवढेच नाही तर हे लहानसेच सौंदर्य पुरे आहे, त्याहून आणखी मोठे काही नको असते, माधुर्याचा हा थेंब अभिरुचीला पुरेसा वाटतो आणि म्हणूनच निसर्गाच्या विराट चित्रलिपीचा शोध घेण्यापेक्षा मला या स्थूल, विरामचिन्हां-कडेच पाहायला जास्त आवडते.

माघात ही घरकुले मोकळीच होती. पण गेल्या महिन्याभरात जुनी घरे सारी रहिवाश्यांनी व्यापून टाकली आहेत. घारींच्या प्रचंड कोटरांतून चिंध्यांच्या पताका खाली लोंबताहेत. नवी घरे बांधणाऱ्या घारींची या लक्तरांकडे किती दृष्टी असते ! मालकिणीचे लक्ष नाही असे पाहून एका घारीने तिच्या घरट्या-तील एक धांदोटी उचलली व जोरात भरारी मारली. तोच घरवालीचे लक्ष तिच्याकडे गेले आणि तिने तिचा पाठलाग चालवला. इतक्यात त्या चोरट्या घारीचा दबा धरून बसलेला नर एकदम झडप घालून घरवालीच्या अंगावर धावला आणि त्याने चोचींचा प्रहार तिच्या माथ्यावर केला. त्याबरोबर एक करुण आर्त किंकाळी तिच्या तोंडून बाहेर पडली. घारीच्या उन्मत्त किंकाळीत असे कारुण्य मी पूर्वी कधीच ऐकले नव्हते. जीव घेऊन ती कशीबशी पळू लागली आणि घरट्यात जाऊन बसली. त्या अंड्यांचाही आधार वाटला तिला. थोड्या वेळाने तिचा जोडीदार तिथे आला आणि वरच्या डहाळीवर बसला. ते दुसरे उपरे जोडपे मात्र पार नजरेआड झाले.

लांब लांबच्या घरातल्या पक्ष्यांत किंवा विजातीय पक्ष्यांत एकमेकांच्या अंड्यांचा व पिलांचा नाश करण्याची स्पर्धाच लागलेली असते. दररोज दोन चार घारींचे कुठल्यातरी घरट्यांशी असे भांडण चाललेले दिसते. परंतु नवल असे की काही अगदी जवळ जवळ जी घरे आहेत तिथे सहसा सजातीय पक्ष्यांत असे भांडण दिसत नाही. या जवळच्याच झाडावर पाहा, चाळीत शेजारी बिऱ्हाडे असावी तशीच ही दोन घारींची घरटी दोन हातांच्या

अंतरावर दोन बेचक्यांत आहेत. दोन्ही घरट्यांतली पिले माना वर करून बघताहेत. त्यांनी यत्किंचित शब्द केला तरी त्यांच्या आया उंचावर घिरट्या घालीत असल्या तरी तत्परतेने धावून येऊन, ‘ घार हिंडते आकाशी, तिचे चित्त पिलापाशी ’ या तुकारामाच्या बोलांची आठवण करून देताहेत.

कावळ्यांची घरेही एका पांगाऱ्याच्या झाडावर अशीच रांगेने असलेली मी पाहिली. या पाखरांत शेजाऱ्यांबद्दल जरी समंजसपणा दिसत असला तरी पहाटेच्या वेळी त्यांच्यामधला खोडकरपणा जागा झालेला दिसतो. रात्रभर भुकेलेल्या बाळांना पोपट, कावळे, चिमण्या व कबुतरांच्या अंड्यांची ताजी न्याहारी देण्यासाठी घारी धडपडतात. दररोज सकाळीं एखाद्या घारीच्या मागे लागून पोपट नाही तर कावळे आक्रोश करीत तिला हुसकून लावताना दिसतात. ती पळपुटी घार या वेळी मात्र तोंडातून आवाजही काढीत नाही. त्याचप्रमाणे कावळ्यांच्या मागे दररोज पहाटे चिमण्या अशाच धावत असतात. कावळ्यांना अजून पोरे झाली नसली तरी चिमण्यांच्या अंड्यांचा घास घेण्याचे डोहाळे ते पुरवून घेताहेत.

परंतु ही वेडी कबुतरे. कुठेही अस्ताव्यस्त घरे बांधताहेत. घरांच्या वळचणीतून बदाबदा त्यांची अंडी कोसळताहेत, तरी त्यांना शुद्ध नाही. ती आपली गटरगूम करीत एकमेकांच्या चोचीत चोची घालून प्रेमकूजन करण्यातच गढली आहेत. घारी आणि रानपारवे यांची आकाशात प्रेम करण्याची एक अजबच तऱ्हा मी फाल्गुनाच्या अखेरीला आणि चैत्राच्या सुरुवातीला पाहिली. या वेळीं चितूर, टोळ हे प्राणी उडता उडता मीलन पावताना आपल्याला दिसतात. पण पक्ष्यांची तऱ्हा तशी नसली तरी आकाशात जोडीने उडणाऱ्या घारी व ही कबुतरे एकमेकांवर उडता उडता गडगडत कोलांटी उड्या घेताना पाहिली की मोठा विस्मय वाटतो !

# चैत्रसखा वैशाख

वैशाखाचा महिना वास्तविक चैत्रातच गुंफलेला. बाह्यसौंदर्याचा वरवरचा सार साज लगेच दिसतो; तरी पण उन्हे जास्त तापताहेत. दिवस मोठाले होताहेत मध्यरात्रीच्या प्रहरी वाऱ्याचा निःश्वास रोखून सृष्टी अगदी स्तब्ध उभी असते नक्षत्रांचे तेजही मंदावले आहे. शुक्र, गुरु, मंगळ हे तारे हिवाळ्यात जसे दृष्टीला हुकमीपणाने खेचून घेत, तसे आता होत नाही. दिवसा ऊन नकोसे असले तरी सूर्याच्या दिव्य तेजाचे झोत चहूबाजूंनी आपल्याला वेढून टाकीत असतात. आणि रात्री मन चंद्रदर्शनाकरिता आतुर होते. चैत्र-वैशाखांतल्या दाट आणि शीतल अशा पौर्णिमेच्या चांदण्याचा स्पर्श जितका सचेतन आणि जीवनदायी वाटतो तितका शरद ऋतूतल्या पौर्णिमांचा वाटत नाही. शरद ऋतूतल्या थंड रात्रीतला तो चंद्रप्रकाश कुठून तरी लांबच्या अज्ञात स्वर्गीय ठिकाणाहून आलेला वाटतो. पौर्णिमेच्या चांदण्याची बरसात सदाच मोहक असली तरी चैत्र-वैशाखांतल्या या रात्रीतली आल्हाददायकता दूरची वाटत

नाही, अगदी पार्थिव वाटते ती! कारण आता शरीर शीतलतेचीच प्रतीक्षा करीत असते. बाहेरची शीतलता शरीराला लपेटून टाकते. त्याच्याशी एकजीव होते. दुपारच्या उन्हाने दिपलेले डोळे आता चांदण्यातला छायाप्रकाशाचा खेळ आतुरतेने पाहतात. अगदी उजाड स्थाने सुद्धा आता किती रमणीय दिसतात! जे स्थान झाडेझुडपे नसल्याने दिवसा रुक्ष वाटते तेच चांदण्यात अतिशय सुखकर वाटते. रस्त्याने जाताना चंद्र सतत आपल्या मागे येत असतो. घरात कामात गुंतले असताना तिष्ठत वाट पाहात कुठल्या तरी झाडाच्या माथ्यावर अडकून पडल्यासारखा उभा असतो. तुम्ही झोपी जा आणि पौर्णिमेच्या रात्री केव्हाही जाग आली की खिडकीबाहेर नजर टाका. आकाशात कुठेही असले तरी ते चंद्रबिंब तुमची वाट पाहातच अजूनही उभे आहे असे तुम्हाला वाटेल. सकाळी उठा आणि खिडकीतून डोकावा, तुम्हाला आणि उगवत्या सूर्याला हसत अखेरची सलामी देऊनच ते फिके मोतिया रंगाचे चंद्रबिंब अदृश्य होईल.

वैशाखी पौर्णिमेच्या घनदाट चांदण्यात आणि त्या चंद्रबिंबात, सर्व संवेदना तरल करण्याचे अद्‌भुत सामर्थ्य आहे. खरे पाहिले तर आश्विनापासून ज्येष्ठापर्यंतच्या साऱ्याच पौर्णिमा मोठ्या मनोज्ञ असतात. तिथितिथीच्या चंद्रकलांच्या, पौर्णिमेच्या प्रफुल्लित तेजाच्या आणि ढगाने गढूळ झालेल्या आणि नितळ काळोखाने दाटलेल्या अमावास्यांच्या काळ्या सौंदर्याचा परिणाम भारतीय संस्कृतीत खोलवर गेलेला आहे. ती कोजागिरी, ती त्रिपुरी पौर्णिमा ती उन्मादक होळीची पौर्णिमा, चैत्रातली हनुमानजयंतीची पौर्णिमा, वैशाखातली बुद्धजयंतीची पौर्णिमा आणि ज्येष्ठातली वटपौर्णिमा! किती भिन्न आदेश त्या देतात. केवढे कथाविश्व रंगवितात. यांतली कुठली जास्त मोहक, कुठली कमी हे कसे मोजायचे? पण कमीजास्तीचा प्रश्न तरी येतो कुठे? प्रत्येक पूर्णचंद्राला त्या त्या महिन्यातले वातावरण वेगळेच रम्यपण देत असते. आपापल्या संवेदनशीलतेप्रमाणे आपला लोभ काही ठिकाणी अधिक गुंतून पडतो एवढेच. असाच लोभ मला उन्हाळ्यातल्या पौर्णिमांबद्दल वाटतो.

फाल्गुनापासून ज्येष्ठापर्यंतच्या चार पौर्णिमांत, सृष्टीच्या विकसनाबरोबरच चंद्रसूर्याच्या तेजाचे खेळ शिगेला पोचलेले असतात. शरद पौर्णिमांचे आकर्षण पहिल्या पावसाळी महिन्यांच्या अंधुकतेमुळे फार वाढते आणि म्हणून त्या अविस्मरणीय झाल्या आहेत. पण खुल्या निरभ्र रात्रीतल्या एकामागून एक येणाऱ्या आणि जाणाऱ्या चांदण्या रात्री, त्यांच्या सौम्यतेमुळे मला नेहमी गुंगवून टाकतात. कुठे कुठे रातराणीचे फुललेले तुरे त्या चांदण्या रात्रींना सुगंधित करतात. कधी कुठे मोगरा, कुठे सायली. दिवसा उन्हाने तल्खली झाल्याने, रात्रीच्या वेळीं येणाऱ्या आणि ज्येष्ठापर्यंत उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या वाऱ्याच्या झुळका, या चांदण्या रात्रीचे रूप, गंध व स्पर्श सचेतन करून त्यांना एक निराळेच व्यक्तित्व देतात. रात्रिदेवीचे चांदण्याने फुललेले मनच जणू तुमच्याशी गुजगोष्टी करायला बघत असते. मागच्या स्मृती, पुढची स्वप्ने आणि आजच्या घटकेची सुखदुःखे साऱ्यांना ती सारख्याच कोमलतेने स्पर्श करीत जाते. पण प्रथम कोमल भासणारा हा स्पर्श नेहमीच सुखावह असतो असे नाही. नको वाटत असलेल्या आठवणींच्या अनेक अडगळी देखील या कल्पनांनी भारावलेल्या क्षणी अधिक मोठ्या होऊन सतावू लागतात.

वैशाखी पौर्णिमेत या साऱ्या पौर्णिमांच्या सौंदर्याचे सार एकवटलेले मला भासते. तिचा स्पर्श जवळजवळ माणसाच्याच स्पर्शासारखा मला सचेतन भासतो. मोगरीच्या फुलांचा सुगंध वाऱ्याच्या झुळकांबरोबर झेपावत येतो तेव्हा आपली सारी पुष्पसृष्टी वसंताने या पौर्णिमेच्या साफल्यासाठीच सजवली होती असे वाटते. मदनबाणाचे फूल हे वैशाखाचे मानचिन्ह. जाई, जुई, मोगरी, सायली, मदनबाण या फुलांतला सुगंधाचा परम उत्कर्ष याच महिन्यातला. वसंताच्या गंधसृष्टीचे पूर्णवैभव वैशाखातलेच.

पण एवढेच कशाला ? जे जे म्हणून वसंताचे आहे त्याला त्याला पूर्णत्व व अखेरीस विराम देण्याचेही काम वैशाखाचेच आहे. चैत्राचा हा सखा त्याचे कार्य पूर्ण करतो; परंतु सौंदर्याची जी विकलावस्था चैत्र सहन करू

शकता ना, तीही हा ज्येष्ठाशी सहमत करून, सृष्टीच्या तालाचा नूर सांभाळण्यासाठी, उघड्या डोळ्यांनी घडवून आणतो. फिरून पाने माघासारखी टपटप गळताना दिसतात आणि हे पाहून वैशाखही मेघमालेआड अदृश्य होतो आणि ज्येष्ठ अवतरतो.

शिरीषांच्या फुलांचा बहर उताराला लागला तरी आता त्यांच्या पानांच्या अंतरंगात एक विलक्षणच उकळी फुटल्यासारखे वाटते आहे. चैत्रातला कोवळा पोपटी रंग होता, तोपर्यंत हे झाड इतर झाडांच्या मेळाव्यातच एकवटले होते. पण वैशाखात ही पाने काळसर हिरवी झाली. दिवसभर उन्हाच्या भरातही फुले आणि पाने ताठपणे नाचत असतात. पण संध्याकाळ झाली की जादूची कांडी फिरावी तशा तऱ्हेने या झाडाची पाने लाजाळूच्या पानाप्रमाणे मिटतात. वारा असला तरी त्यांची दळे उमलत नाहीत. या भव्य गगनचुंबी वृक्षाच्या पानांचे हे संकोचलेले स्वरूप पाहून मोठी गंमत वाटते. चैत्रात पालवीत ताठपणा नव्हता. तेव्हा पानांची उघडमीट इतकी स्पष्ट जाणवत नव्हती. पण आता हे स्पंदन, पुष्कळ वेळ रेंगाळणाऱ्या सायंप्रकाशात फार जाणवते. शिरीषाच्या पानांचा हा संकोच पाहिला की आपल्या मनातही काळोखाबद्दल एक प्रकारचे भय उद्भवते. आजूबाजूची प्रफुल्लता पाहण्यास सरावलेले मन प्रकाशाची अपेक्षा करते. चांदण्यांचा मिणमिणा प्रकाश मनाला उल्हसित करू शकत नाही. पिठूर चांदणे हवे असते. झाडांवरचा फुलांचा रंगहीन आविष्कारही चांदण्या रात्री नजरेआड करावासा वाटत नाही.

वैशाख आला आणि चैत्रात मुके असलेले गुलमोहराचे झाड पालवले. हर्षभराने पुलकित झाले आणि पानांपेक्षाही हिरव्या कळ्यांचे, आणि तांबड्या फुलांचे मनोहर गुच्छ डोक्यावर नाचवू लागले. ज्येष्ठात त्याचे पुष्पवैभव अपार खुलेल. ज्या गुलमोहरांना फुलांचे पीक अमाप येते, त्यांची पाने फार उशीरा येतात. कधी कधी तर वैशाखाअखेरपर्यंत ती उघडीच असतात आणि मग पावसाळ्याच्या तोंडी एकदम फुलतात. ज्या झाडांना फुले फार धरत नाहीत त्या बालवृक्षांवर मात्र आता पानांची

दाटी झालेली दिसते. पाने धरलेली कुठल्या झाडाला शोभत नाहीत ? परंतु एकदा रस्त्याने जाताना मी अशीच दोन खुरटी गुलमोहराची झाडे पाहिली. आजूबाजूची झाडे मस्त माजलेली होती. ती पाहून या झाडांचा तो रडवा नूर माझ्या मनावर चांगलाच परिणाम करता झाला. जाता येता मी त्या झाडांकडे नेहमी पाहाते. पण प्रत्येक वेळी त्या झाडांचे दर्शन मला अधिकाधिकच केविलवाणे आणि भकास वाटते. पाने गळली होती तेव्हा बाकीच्या झाडांच्या फांद्या काळ्या शाईने काढलेल्या सुंदर रेषाचित्रां-प्रमाणे आकाशाच्या पार्श्वभूमीवर शोभत होत्या. पण ही खुरटी झाडे ? त्यांच्या फांद्या वरपासून खालपर्यंत मनोभंग होऊन खांदे वाकलेल्या माणसाच्या निर्जीव हातांप्रमाणे कशा तरी खाली लोंबत होत्या. एकही डहाळी दुसरा भाव दाखवीत नव्हती. शेजारी शेजारी असलेली ही दोन रडवी झाडे एकमेकांना दिलासा देत होती. पुढे त्यांना पालवी धरली. झाडे पानांनी भरली, तरी तो हिरवा साज पेलून धरण्याची हिंमत त्या शक्तिहीन सांगाड्यात राहिली नाही, असेच त्यांना पाहून अजून वाटते. संध्याकाळच्या वेळीं वाढत्या अंधारात ही दोन झाडे पाहिली की मन अत्यंत उदास होते. क्वचित फुले धरली तरी त्यांचे ते हसणे भकास व भयाण वाटते.

फुलमोगऱ्याची पिवळी फुले धारण करणारी ऑस्ट्रेलियन झाडे चौफेर बहरली आहेत. तसेच कोंबडीच्या अंड्याच्या आकाराच्या व रंगाच्या कळ्या व नागचाफ्याप्रमाणे फुले लागणारी ऑस्ट्रेलियन झाडेही अनुपम शोभेने नटली आहेत. देशी व ऑस्ट्रेलियन बाहव्याची झाडे आता किती सुंदर दिसतात म्हणून सांगावी ? पिवळ्या, गुलाबी फुलांचे प्रचंड घोसच्या घोस झाडभर लटकताहेत. ज्येष्ठाच्या अखेरपर्यंत हे वैभव कायम राहील. बाहव्यांच्या फुलांच्या सौंदर्याची मला अपार आसक्ती वाटते. विशेषतः देशी बाहव्याच्या पिवळ्या जर्द फुलांची चार पाकळ्यांची, पिवळी धमक आणि मखमली काया असणारी ती निर्गंध फुले, त्यांच्या त्या टपोर वाटोळ्या कळ्या; एकेक सुटी पाहिली तरी मनोरम दिसतात पण दोन हातांच्या मिठीत मावणार नाहीत

इतके जाड आणि पाच सात फूट लांब असे त्यांचे घोस झाडावरून खाली लोंबताना पाहिले की निसर्गाच्या पिवळ्या रंगाचा सारा मुलायमपणा त्या झाडावर साकार झालासा वाटतो. मुंबईत ही झाडे पाहून मला पुष्कळ वर्षांपूर्वी नाशकाला गोदाकाठी निर्जन कपारीत उगवलेल्या बाहव्याच्या ठेंगण्या ठुसक्या झाडांच्या अतुलनीय पुष्पवैभवाची सारखी आठवण होते. फुलांचे ते टोलेजंग नैसर्गिक हार झाडावरून नदीकाठच्या मऊ मातीत स्वच्छंद लोळत असायचे या दिवसांत. हारोहारी फुले लागणे हा शब्दप्रयोग आपण नेहमी वापरतो. पण हारोहारी फुले कशी लागतात ते देशी बाहव्याचे फुलोरे पाहिल्यावाचून समजणार नाही. किती थंड, सुखकारक व मृदुस्पर्श असे त्यांचा ! झाडांवरची इतर पानेफुले झुळकाझुळकांबरोबर नाचत असायची. पण मातीशी हितगुज करायचा छंद लागलेली ही फुले मेळाव्याने परमगांभीर्य धारण करून काळ्या मातीला आपल्या पिवळ्या सौंदर्याने भूषित करण्यात कृतार्थता मानीत असायची ! आषाढात बाहव्याच्या शेवग्याच्या शेंगा-सारख्याच लांब व गोल शेंगा काळ्या होऊन पडतील. बाहव्याच्या शेंगा म्हणजे गावढ्यातल्या मुलांच्या बिनपैशांच्या मनुका. शेंगा फोडल्या की त्यांचा चमत्कारिक उग्र वास आणि चपट्या वाटोळ्या बियांना चिकटलेला, चिकट, काळा लिबलिबीत गीर बाहेर पडतो. वास सोडला तर तो रुचीला मधुर लागतो. मिळतोही मुबलक.

तशीच ती अति नाजूक केसरांचीच बनलेली बाभळीची फुले. काटेरी व गावढ्या झाडावरच जन्मायचे ललाटी लिहिल्यामुळे ती लोकादरास पात्र होत नाहीत; कुठेतरी आडोशालाच ती शहरात दिसतात. गुलाबाचे काटे आपण विसरतो, फूल स्मरतो. पण गुलाबाचा तो वर्ण, रूप, गंध सारेच न्यारे. तसे या साध्यासुध्या फुलाचे नाही. तरी पण वसंतवैभवात हे झाडही आपला पुष्पबहार निःसंकोच प्रदर्शित करताना पाहून मन प्रसन्न होते यात शंका नाही. बाभूळ हे माळरानातले झाड. दख्खनच्या माळरानातली ती काही खुरटी काही मोठी बाभळीची झाडे बहरून गेलेली पाहिली रे पाहिली की, ‘ वद जादुगारिणी

तेव्हा मारलीस फुंकर कसली ! ओसाड माळ हा सारा पुष्पांनी भरूनी गेला ' या रेंदाळकरांच्या पद्यपंक्ती माझ्या मनात घुमू लागतात. ते प्रेमगीत आहे हे मी विसरते. जणू काही माळरानच प्रफुल्ल बाभळीला उद्देशून हे उद्गार काढीत आहेसे वाटते. ही झाली साध्या बाभळीची गोष्ट. पण देवबाभळीचे किंवा केसुरडीचे फूल फुलले की त्याचा वास फर्लांगाफर्लांगावर पसरतो. ते टपोर अनुपम केशरी वर्णाने नटलेले गोंड्यासारखे फूल जरा हातात तोडून घेतले की त्याच्यातून हळदीच्या कणांसारखी होणारी सुगंधी रेणूंची वृष्टी आणि त्याचा तो अतिमधुर, उत्तेजक आणि धुंद करणारा सुगंध, यांचे किती म्हणून वर्णन करावे ? मोगरा, निशिगंध, रातराणी, सायली, या साऱ्या फुलांची गंधाची बरसात संध्याकाळपासून पहाटेपर्यंत चाललेली असते. पण देवबाभाळीचे फूल भर दुपारीही आनंदी, सुगंधमय उच्छ्वास टाकीत असते. शिवाय बकुळी, सुरंगीप्रमाणे सुकले तरी त्याचा सुवास कायमच असतो. डोक्यात घातले, तर दिवस दिवस केसांना त्याचा वास लागलेला राहतो. उद्यानपुष्पांना आपल्या गुणांनी मागे टाकणारे नसले तरी त्यांची सर्वथैव बरोबरी करणारे कोणते पुष्प असेल तर ते देवबाभळीचेच. त्याची वेणी करा. फुले पाहा कशी एकमेकात मिळून जातात ती. देवबाभळींच्या फुलांची, देठ एकमेकात गुंफून किंवा सुतात गुंफून केलेली वेणी मला एखाद्या अलंकारासारखी वाटते. शहरातल्या बागांतून ही झाडे का लावली जात नाहीत याचे मला नेहमी नवल वाटते.

खुरचाफ्याची झाडे चैत्रातच फुलली; परंतु आता त्यांचे सौंदर्य शिगेस पोचले आहे. वैशाखाच्या दुपारच्या कडकडीत उन्हातच फुलण्याचा अट्टाहास करणाऱ्या या खुरचाफ्याच्या झाडाचे मला नेहमी कौतुक वाटते. बाकीची फुले सांजसकाळी फुलतात तर हे आपले दुपारचे ऐन माध्यान्हीस उमलते. या झाडाकडे पाहिले, की पंचाग्निसाधनाच्या तपातच जिचे सौंदर्य प्रेमाच्या कोवळिकीमुळे अत्यंत खुलले होते म्हणून म्हणतात त्या पार्वतीची आठवण होते. दुपारच्या दुसऱ्या प्रहरात फुलणारी गुलबक्षीची फुलेही अशीच.

वैशाखाचे दुपारचे ऊन खाऊनच कळ्यांचे तेज वाढीस लागते. सुगंधाचे भांडार परिपूर्णतेस येते. मग ती उमलोत केव्हाही. वैशाखाच्या प्रखर उन्हाने तापलेल्या दुपारीसारखे चैतन्य वाढवणारे वातावरण दुसरे नाही, असे झाडांच्या या वेळच्या फलपुष्पांनी भरलेल्या, रूपरसगंधांनी परिपूर्ण झालेल्या स्वरूपावरून वाटते. पक्ष्यांच्या आवाजातले माधुर्य, त्यांच्या शरीरातले लवलव करणारे ते चापल्य, आता पराकोटीला पोचले आहे.

भर दुपारी खुरईचे ते रानझाड पाहा. कसे आपले चारदळी लहानशा पण लांब, आणि जणू साखरेचाच पाक आत भरलेला आहे अशा देठांच्या फुलांचे मोठाले वाटोळे गेंद लेवून उभे आहे. काळे भोर भुंगे त्यांच्या भोवती रुंजी घालताहेत. त्यांचा गुं गुं आवाज या वेळी जसा वातावरणात घुमतो तसा इतर वेळी कधी आढळत नाही. तशीच ती चिनी जास्वंदीची फुले खाली तोंड करून लोंबताहेत आणि काळ्या रंगाची, चिमणीपेक्षाही फार लहान अशी ती फुलचुखी ! फुलावर बसून, पाहा कशी अंगाला मुरड घालून, खालच्या बाजूने उलटी होऊन आपली सुईसारखी लांब व बारीक चोच फुलाच्या नळकांडीत अलगद खुपसून मध खाते आहे ती ! मधूनमधून गायन चाललेच आहे. 'फुलपाखरांनी व भुंग्यांनीच मधाचा आस्वाद घ्यावा, पक्ष्यांना त्याचे काय ?' असे कविवचन आहे. पण फुलचुखी किती हळुवारपणे फुलाला जरासुद्धा न दुखवता मधाचा आस्वाद घेते, सरस तेवढेच चुंबीत जाते हे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजणार नाही.

वैशाखात कावळ्यांचे संसारीपणही बहरलेले असते. प्रणय रंगलेले असतात. वात्सल्य उमलत असते. वैशाखाच्या प्रतिपदेची ती पहाट होती. मध्यरात्री गार ओले वारे वाहत होते. आकाशात अचानक अभ्रे दाटून आली होती. पावसाचे चार थेंबही गळून सुक्या मातीतून गंधाचे लोट उठवून निघून गेले होते. सकाळ झाली तरी ढग रेंगाळतच होते. वैशाखातला तो भक्क उजेड मागे पडला होता. उकाडा थांबला होता. वाऱ्याच्या गार झुळका लांबून गारवा घेऊन येत होत्या. या अनपेक्षित बदलामुळे, वादळाच्या

चिन्हांमुळे, पाखरेही चेतावल्यासारखी दिसत होती. वैशाखात अगोदरच पक्ष्यांची व कीटकांची चळवळ पराकोटीला पोचलेली असते आणि आज हा अचानक झालेला बदल पाहून तर त्यांच्या सुरात आनंद, भय, प्रणय, सारे सारे भाव एकवटून वाहात होते. पावसाळ्यात तर पक्ष्यांची घरे पूर्ण होऊन अंडीही फुटलेली असतात. पण अजून तर कुणाकुणाची घरेही आकाराला आलेली नव्हती. मग का नाही होणार त्यांची धांदल ?

खिडकीतून पहाटेच्या धूसर आवरणातून झाडाझाडांवर चाललेली पाखरांची गजबज आणि धावपळ मी पाहात होते. समोरच्या ठेंगण्या घराच्या टाकीच्या उंच दांडीवर एक कावळा येऊन बसला. पाठीमागून त्याचा जोडीदार आला. दोघांचे आनंदाने भरलेले चीत्कार हवेत घुमले. आज जणू काही वातावरण बदलले तसे त्यांचेही नेहमीचे भाव बदलले होते. आपण काय करतो याची शुद्ध त्या नेहमी संयमाने वागणाऱ्या पाखरांना राहिली नाही. निसर्गातल्या बदलाबरोबर, निसर्गाने त्यांच्या सर्व प्रेरणांचा कबजा हिरावून घेतला. या दिवसांतील एकच एक प्रणयाची ऊर्मी तेवढी तेवती ठेवली. त्या कावळ्यांचे इतर पाखरांप्रमाणे आज त्या उंच जागेवर मीलन झाले आणि क्षणभरात ती दोघे दुसऱ्या गर्द झाडाच्या कुशीत घुसली; आणि मग ती थोड्या वेळाने फिरून बदामाच्या झाडावर गंभीरपणे येऊन बसली. मी पाहिले, तो त्यांतली ती बसक्या तोंडाची, वाकड्या चोचीची कावळी तर परिचयाचीच दिसली. इतर कावळ्यांची घरे बरीच बांधूनही झाली होती. आणि यांचा कशाला काही पत्ताच नव्हता. म्हणून का ती सारी धांदल ? तो बावळटपणा ? ती गडबड ? तसेच असावे. कारण दोन-तीन दिवसांनी काडी काडी जमवून ती दोघे आपले घरटे बांधू लागली. एवढे मोठे झाडाचे वेचके, त्यात त्या एवढ्याशा काड्या बसेनात. पहिल्याने एक काडी ठेवावी आणि ती कोसळावी. दोन दिवस एक मोठीशी काडी हुडकून ती ठेवायला त्यांना लागले. मग दुसरी काडी आली तिचीही तीच तऱ्हा. पाच सात काड्या आणि मग सारेच कोसळले. फिरून झाली श्रीगणेशाला सुरुवात. आठ-दहा दिवस

हेच चालले होते. पाच सात काटक्या बसवाव्या आणि मग सारे कोसळावे. फिरून ती दोघे काड्या ठेवीत त्या अशा वेड्यावाकड्या तऱ्हेने की त्या अचूक कोसळाव्याच. कावळ्यांच्या घर बांधण्याच्या या पहिल्या टप्प्यावरूनच कावळ्याचे शेणाचे घर वाहून गेल्याची प्रसिद्ध कथा निर्माण झाली असावी. पुष्कळदा वाटे की आपण जावे आणि त्या काड्या बेचक्यात व्यवस्थित रचून द्याव्या. पण त्या कावळ्यांची चिकाटी जबर. सात आठ तास दररोज खपून, त्यांनी अखेर पंधरवड्यात घर तयार केले. एकदा खालची बैठक जमली आणि मग दोन दिवसांत घरटे पुरे झाले. मग कापूस, पिसे, सुकी पाने, गुंतवळ नेण्यासाठी ते धडपडू लागले. मला चांगले आठवते आहे; गतवर्षीच या वेळी एक कावळा गुंतवळ उचलून नेत असता त्याची बोटे तिच्यात गुरफटली. घरट्यापर्यंत तो पोचलाच नाही. झाडावर बसून तोंडातली गुंतवळ त्याने पायांत पकडली आणि तो चोच साफ करू लागला. इतक्यात त्याची बोटे तिच्यात गुरफटली. त्याने जसजशी धडपड करावी तसतसा त्याचा पाय अधिकच गुंतला जावा. त्याचा जोडीदार बाजूला घुटमळला. पण ही भयंकर गुंतागुंत सोडवायला तोही असमर्थ ठरला. निसर्गाने पाखरांना या संकटातून मार्ग काढायची बुद्धी दिलेली नसावी. दुसरेही असंख्य कावळे तिथे जमून त्यांनी भयंकर कावकाव केली. पण त्याचा त्याला बिचाऱ्याला काय उपयोग ? शेवटी धडपडत असताना तो त्या गुंतवळीचे फांदीभोवती वेढे पडून उलटा टांगला गेला आणि प्राणाला मुकला. दोन तीन महिने त्याचे धड तसेच झाडावर लटकत होते. तिथेच ते सडले व अखेर झडून गेले. आणि ती तंगडी मात्र लोंबकळताना दिसत होती. पुढे पावसाच्या भयंकर माऱ्यानंतर तीही गेली. तेव्हापासून अजून त्या झाडावर घरटे बांधण्याचा हिय्या कावळ्यांनी या साली केला नाही. नेहमीची ती वसाहत आता रिकामी झाली आहे. परंतु या दृश्यांबरोबर आपल्या चिरसौंदर्याने माझ्या मनावर कोरली गेलेली आणखी दोन दृश्ये आहेत. तीच ती वाकड्या चोचीची कावळी आणि तिचा तो नर. कितीदा तरी ती एकमेकांची चुंबने

घेताना दिसतात. एरवी कावळे एकमेकांना घास देतात. पण हा नर विशेष रंगेल आहे. पंख फडफडवीत, आर्त स्वर करीत तो तिच्या उघडलेल्या चोचीत चोच घालतो; मग फिरून उडतो तेव्हा मादीही विशिष्ट आवाज काढते आणि फिरून पंख फडफडावीत त्याच्याजवळ जाते. तसेच नाक्यावर एक विलायती बाहव्याचे झाड आहे. त्याच्या लांब लांब फांद्या तजेलदार गुलाबी फुलांनी बहरलेल्या आहेत. प्रत्येक फांदी म्हणजे एक अति भव्य पण तितकाच नाजूक फुलोरा आहे. आणि त्या साऱ्या फुलोऱ्यांच्या मध्यभागी एका बेचक्यात कावळ्यांचे अर्धवर्तुळाकृती घरटे आहे. कावळी घरट्यात असते, कावळा बाहेर. त्या गुलाबी रंगाच्या पसाऱ्यातल्या तो घरट्याचा काळसर ठिपका, त्याच्यावरचा तो पक्ष्याचा काळा कुळकुळीत ठिपका आणि फांदीवरचा तो नराचा ठिपका पाहिला, म्हणजे या काळ्या ठिपक्याशिवाय गुलाबी गेंदांच्या सौंदर्याला परिपूर्णता आली नसती असे वाटते.

कावळ्या–चिमण्यांची दृश्ये सवंग असल्याने ती आपल्याला न्याहाळता येतात, पण त्यांनीच वसंतवैभवाला पूर्णता कशी येणार ? वैशाख लागला आणि बुलबुलांचे गळे मोकळे झाले. ताज्या सुरेल बोलताना घेऊन हे अव्वल गवय्ये गाऊ लागले. पहाट झाली की कधी आंब्याच्या तर कधी शेवग्याच्या तर कधी शिरीषाच्या डहाळीवर बसून मुक्त मनाने हे काळे पण अति शोभिवंत पाखरू वर्षभर हृदयात साठवून ठेवलेली प्रेमकवने गात बसते. कावळ्या-चिमण्यांच्या गजबजाटावर अंतराळीच जणू काही ते सूर तरंगतात. वसंतातल्या साऱ्या फुलांना शब्द असते तर ते कसे असते, असे मला कुणी विचारले, तर मी बुलबुलाकडे बोट दाखवीन. कोकिळाच्या शब्दात पुष्कळदा छाती फुटून जाते आहे की काय असे वाटणारी आर्तता भासते. पण बुलबुलाचा शब्द आनंदाने भरलेला, कणखर उल्हासाने दाटलेला. वासंतिक गंधसृष्टीचे प्रातिनिधिक मदनबाण, तसेच नादविश्वाचे बुलबुलाचे आखूड वसंतगीत. बुलबुलाच्या मागोमाग तांबट पक्ष्याचा टणत्कार हवेत घुमतो. भर दुपारी त्याला नुसती धार येते. वेडा राघूही विचित्र आवाज करीत कोलांट्या घेतो. फुलचुख्याच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमार
अनुक्रम ... ४३२५ दि: ... १९८३

मधुर आनंदी आलापिका तर दिवसभर वाऱ्यावर वाहातच असतात. गोविंद पक्षीदेखील याच महिन्यात अति करुणरम्य गीत गातात आणि पिसे फुलवून नाचतात. तपकिरी रंगाचे पिवळे पट्टे असणारे कांचन किंवा पीलक पक्षी याच दिवसांत दर्शन देतात. कोकणातले लोक त्यांना रामबाण म्हणतात. सावरीचे झाड त्यांचे आवडते. सूर्याच्या आगीत अक्षरशः भाजून निघालेला पण अंगावर फुलपाखरांप्रमाणे भरगच्च सौंदर्यचिन्हे — रूपाची, नादाची व सुगंधाची — धारण करणारा, चैत्रसखा वैशाख हा असा आहे.

# ज्येष्ठातले पहिले मेघमंडळ

ग्रीष्म ऋतू लागतो न लागतो आहे; पुष्पभार नुकताच कुठे सुकू लागला आहे. झाडावरची पालवी जूनवठ झाली आहे. आभाळ आलेले आहे. पांढरे भुरके ढग आकाशभर पसरलेले आहेत. उकाडा खूप होतो आहे. पण मधूनच थंड ओलसर वाऱ्याची झुळूक कुठून तरी पावसाळ्याची ललकारी देत येते आहे. वसंताचे खेळकर अल्लड वातावरण लुप्त झाले आहे. प्रौढपणाची सावली दुनियेवर पडलेली आहे. उन्हाळापावसाळा गळ्यात गळा घालून कधी इथे कधी तिथे पण स्वैरपणे भटकताहेत. वारे आणि ढग या दोघांची हातमिळवणी करताहेत. दोघेही जणू अभिन्न आहेत. सुंदर फुले-फळे, कोवळी पालवी, पक्ष्यांच्या प्रणयी ललकाऱ्या धारण करणारा अल्लड वसंत यांच्यांत मिसळूच शकत नाही. वेगळाच, अगदी एकटाच पडतो तो. आता ऋतू येतील ते सारे जोडीजोडीने, एकमेकांत मिसळूनच येतील. वसंताची कच्ची फळे, ते फुलांचे तुरे, सारे लोपले. आता प्रौढपणा धारण करून निसर्ग मधुर पक्व फळे घेऊन

आला आहे. झाडांवर शेंगा धरल्या आहेत. सगळीकडे जूनपणा, भारदस्त-पणा भरलेला आहे.

हा भारदस्तपणा बघा या ढगांनीच कसा वाढवला आहे तो. पांढरे पांढरे ते ढग रात्रीच एकाएकी जमा झाले. कृष्णपक्षातल्या काळ्या रात्री नक्षत्रे लुकलुकत असायची या वेळीं. पण ती झाकून गेली आहेत. जणू सृष्टिमातेला आता डोळे मिचकावण्याचे त्यांचे चाळे नकोसे वाटताहेत. संध्याकाळी कुठे इथे तिथे भटकणारी काळसर अभ्रखंडे आता पांढरी होऊन, विशाल होऊन आकाशाला गवसणी घालताहेत. आणि ती चंद्रप्रकाश नसताना सुद्धा इतकी पांढरी दिसताहेत की खरोखरच ढगाळलेली पावसाळ्यातील अंधारी रात्र भयाण काळीकुट्ट वाटते, तशी ही ग्रीष्मातली पहिल्या मेघमंडळाने मंडित झालेली रात्र भासत नाही. अंधाराचे नाव नाही. पहाटेपेक्षाही उजळा सगळीकडे दिसतो आहे. झाडाचे पान आणि पान, फांदी आणि फांदी काळसर असली तरी स्पष्ट वेगळी उठून दिसते आहे. काळोख नाहीच कुठे. वस्तुमात्र झोपले असले तरी मेघमंडळाने जागता पहारा ठेवला आहे. गडगडाट नाही. चम-चमाट नाही. कधी अधल्या मधल्या काळ्या ढगांतून चार दोन पाण्याचे थेंब स्तब्धपणे जमिनीवर पडताहेत. आवाज नाही. सळसळ नाही. त्या थेंबां-मुळे मातीचा सुवास मात्र उसळून हवेत वाऱ्याच्या झुळकीबरोबर तरंगत राहतो. आणि या वासामुळेच सकाळी झाडांच्या पानावरचे टप्पोर थेंब दवाचे नसून पावसाचे आहेत असे समजायचे.

छाया आणि प्रकाश या दोघांनाही आपल्या पोटात साठवणारे हे ढग पहाटेची लालीसुद्धा कशी रोखून धरतात. कुठेच स्वैरपण नाही. ढगावर करडी, गुलाबी, पिवळी छटा दिसते म्हणून सूर्योदय झाला असे समजायचे. ऊन, पाऊस, वारा सारे काही या मेघमंडळाने बंदिस्त करून ठेवले आहे. वाराही रोखला आहे. झाडाचे पान आणि पान याच्याच हुकमाने हलणार.

ऊन नसल्यामुळे छाया नाही. प्रकाश पण नाही. एका काचेरी आवरणा-

खाली सारे वस्तुजात आले आहे. छायाप्रकाशाचा खेळ भारतासारख्या उष्ण देशात नेहमीच लोभनीय असतो. पण छायाप्रकाश एक झालेले हे कुंद वातावरणही निराळ्याच शोभेने नटलेले असते. ते मोरांना उन्मत्त करते. समुद्रांना उचंबळून सोडते. या मंद प्रकाशात ऊन नसल्यामुळे झाडे जी उन्हात एकदम काळसर हिरवी किंवा पोपटी पालवी असताना सोनेरी दिसत, तशी दिसत नाहीत.

हा पाहा झाडांचा हिरवा साज किती विविध प्रकारचा आहे. हिरव्या रंगाच्या इतक्या विविध छटा या धूसर वातावरणात कशा स्पष्ट उठून दिसताहेत. हे पाहा समोरचे आंब्याचे झाड. काळसर जून राठ पानांनी भरून गेले आहे. झाडाची उंची बेताचीच असल्याने पानांवर धुळीची पुटे चढली आहेत. परंतु पलीकडचे आंब्याचे दुसरे झाड अधिक जिवंत आहे. पावसाच्या आधीच त्याला नवी पालवी धरू लागली आहे. वरची पालवी अगदी कोवळी. ती गर्द अंजिरी आहे. तांबड्या रंगात हिरवी छटा आहे नाही अशीच. पण खालची पालवी थोडी तांबडी आणि जास्त पोपटी अशी दिसते आहे. अंजिराच्या या दोन छटा त्या कोवळ्या रेशमी पालवीवर किती खुलून दिसताहेत. गर्द हिरवे आणि पोपटी पालवी धारण करणारे शेवग्याचे झाड आणखीच निराळ्या रंगाचे आहे. नारळाची झाडे सदाच गर्द-काळसर झावळ्यांनी भरलेली. पण त्या झावळ्यांचा रंग आता पडलेला आहे, मलूल झाला आहे. जरा तपकिरी वाटतो आहे. लवकरच त्या झावळ्या कोसळतील आणि नव्या पानांवर पावसाळ्यात हिरवा रंग फिरून खुलेल. पलीकडे ते पाहा अडूळशाचे झाड. वरची बाजू त्याची पांढरट पिवळट पोपटी पानांनी भरली आहे. किती वेगळे दिसते आहे ते झाड! त्याच्याच जरा मागे तर अशोकाचे झाड आहे. ते पाचूसारख्या शोभिवंत पानांनी नटले सजले आहे. आणि अगदी मागची रस्त्याच्या कडेवरची ती भव्य शिरीषांची रांग. काळ्याभोर हिरव्या पानांनी भरून गेली आहे. वरची गुलाबी फुलेही त्या काळ्या हिरव्या रंगात झाकल्यासारखी वाटतात. अशा या हिरव्या

छटा कुठेही जा, तुम्हाला दिसतील. आणि गंमत अशी की त्या साऱ्यांवर प्रौढपणाचे आवरण पडल्याचे तुम्हाला भासेल.

दिवस किती मोठे या दिवसांतले. आसमंतातल्या कुठल्याही देखाव्याचे निरीक्षण पोटभर करता येते. तास संथपणाने चालत असतात. उगीच नाही या महिन्याला ज्येष्ठ म्हटलेले! मोठ्यातला गंभीरपणा, संथपणा, भावगंभीरता या महिन्यात काठोकाठ भरलेली आहे.

हा पाहा भर दुपारचा समुद्र. एरवी केव्हाही दुपारी पाहा, निळ्याशार आकाशाखाली निळे पाणी थयथय नाचत असते. प्रत्येक लाटेच्या माथ्यावर असंख्य सूर्यफुले चमकत असतात. प्रत्येक फूल वेगळे चमकते. असंख्यात अशा त्या दैदीप्यमान ठिपक्यांचा खेळ आता साफ गेलेला आहे. पण आता ओहोटीची वेळ असूनही पाहा लाटांचा आवाज नेहमीपेक्षा जोरदार येतो आहे. पाण्याच्या रंगात धरणीचा तपकिरी-हिरवा रंग मिसळला आहे. आकाशाच्या धुरकट मेघाच्छादित रंगाचे मोठमोठाले पट्टे पाण्यावर उमटलेले आहेत. लाटांवर फेसाच्या शुभ्र जाळ्या दिसताहेत. आणि पाहा, क्षितिजाच्या अगदी कडेचा तो देखावा. समुद्र व आकाश यांच्या दरम्यान निळ्या गर्द रंगाची अगदी बारीक किनार कशी कोरून काढल्यासारखी दिसते आहे. त्या किनारीला लागून लाटा परतून फिरताना स्पष्ट दिसताहेत. वळताना फेसाचे मोठे वलय क्षितिजाला अखंड भिडलेले वरखाली होताना दिसते आहे. कोकणातल्या एका लोकगीतात लाट माणसांचे निरोप स्वर्गातल्या देवांना व पूर्वजांना पोचवून परत फिरते, असे म्हटले आहे. ज्येष्ठातला हा देखावा पाहून मला त्याचा अर्थ समजला. पाणी, जमीन, आकाश, सारी एका रंगाची, एका रूपाची झाली आहेत. या वेळी आणि या लाटा कशा आकाशाशी गुजगोष्टी करून जमिनीच्या किनाऱ्याकडे येताहेत पाहा. पाण्याचा रंग आता असाच अधिकाधिक तांबूस तपकिरी होत जाईल. आकाशदेखील उत्तरोत्तर ढगांनी अधिक व्यापून जाईल. मधून मधून ऊन पडेल तेवढेच. जेव्हा जेव्हा चंद्रसूर्यादी स्वर्गस्थ ज्योती मानवांत चार पावसाळी महिने दिसणार नाहीत,

तेव्हा या लाटा उंच उंच होऊन दोन्ही लोकांतल्या निरोपांची देवघेव अशीच करीत राहतील.

दुपार टळून संध्याकाळ झाली आहे. आणि सकाळी लाल न झालेले ढग आता पिवळ्या प्रकाशाची सुंदर बरसात धरणीवर करताहेत. खाली रस्त्यावर गुलमोहोराच्या केशरी पाकळ्यांचा सडा पडला आहे. जवळच रस्त्याने रांगोरांगी लावलेल्या ऑस्ट्रेलियन झाडांच्या पिवळ्या कागदी फुलांचा व पाकळ्यांचा दाट गालिचा पसरला आहे. कुणबी लोकांनी फुलमोगरा हे सुंदर नाव दिले आहे या झाडाला. पारिजात व मोगरा या दोहोंचा वास एक केला तर येईल तसा वास या फुलांना येतो. पण पारिजातकाचा वास दरवळतो आणि या फुलांचा जागच्या जागी बसणारा मंद असा आहे. या पाकळ्यांचे हे सडे या पिवळ्या प्रकाशात अतिशय खुलून दिसतात. हा पिवळा प्रकाश नव्हे, तर विश्वजननीच्या अंगावर उमटलेली ही सुंदर गर्भच्छाया आहे, असे मला वाटते. कारण या वेळी सृष्टीत सगळीकडे नवजननाचा सोहळा चालू असतो. पक्ष्यांची प्रणयगीते बंद झाली आहेत. गर्भवती पक्षिणी आपली घरकुले बांधून अंडी घालण्याच्या तयारीत आहेत. गेल्याच महिन्यात घरांची जागा धुंडताना पक्ष्यांची कोण मारामारी चालायची. पण आता सगळे शांत आहे. प्रत्येक जोडप्याला आपले निवाऱ्याचे स्थान मिळाले आहे. पोपटिणींच्या ढोलीत अंडी पडली आहेत. ढेरपोट्या चिमण्या संध्याकाळी मातीत अंग घुसळताना जास्तीच जड आणि फुगलेल्या दिसताहेत. कावळ्यांची घरे अजून बांधून पुरी झालेली नाहीत. नरमाद्यांची धावपळ चालूच आहे. पण एकंदर पाखरांची गती मंदावली आहे. चराचरावर कुटुंबवत्सलतेची छाया पसरलेली आहे. हा पाहा प्रचंड काळा मुंग्यांचा थवा. एरवी हे सारे जीव स्वतः प्रजोत्पादन करू शकत नसले तरी, या वेळी एकेक मुंगी एकेक पांढरे अंडे तोंडात धरून मोठ्या यात्रेला बिळाकडे निघाली आहे. शिरीषांच्या उंच झाडावरच्या माथ्यापर्यंत गिरक्या घेणाऱ्या पाकोळ्या आता अगदी गळून गळून गेलेल्या दिसताहेत. कुठे तरी अंडी घालून त्या जगाचा कायमचा

निरोप घेताहेत. कुंभारीण माशी झाडांच्या बुंध्याभोवती घरकुल करण्याकरता गिरक्या घेते आहे.

या वेळी शेतात मातीतले ते लहानगे मोराचे किडे गोल गोल घरे करीत असतील. मृगाचे टपोर पोटाचे किडे ढेकळाढेकळांतून फिरत असतील. वळवाचा पाऊस पडण्याचा हा सुमार. एक सर आली की हे किडे सारे मरतील. पण दरवर्षी नेमके या वेळेला ते फिरून येतात. इंद्र देवाचा निरोप धरणीला देतात. उन्हाने फोफावलेल्या मातीत गवताचे बी वळवाची सर पडताच जोराने वर येईल. भाजलेल्या शेतात पडलेले बी दोन सरींनंतर आषाढात वर डोकावू लागेल. आणि मग ढग काळे होतील. विजा चमकतील. गडगडाट होईल. मुसळधार पाऊस कोसळेल. पृथ्वीची निर्मिती पूर्ण होईल.

काळे ढग म्हणजे शेतकऱ्याचा आनंद. पांढरे ढग फसवे म्हणतात. पण ज्येष्ठाचे नाव सार्थ करणाऱ्या शुभ्र मेघमाले, मला तू फार आवडतेस. तुझे अवलोकन करताना मला कधी कंटाळा आलेला नाही.

## मेघश्याम
## आषाढ

ज्येष्ठी पौर्णिमा ओसरली, आणि ग्रीष्माने वर्षेशी हातमिळवणी केली. पांढऱ्या मेघमालांचा रंग जांभुळका झाला. वैशाखाअखेर सुटणाऱ्या स्वैर वाऱ्याच्या झुळका उन्मत्त झाल्या. झाडांच्या फांद्यांना गदगदा हलवू लागल्या. वसंतातल्या नाजूक सौम्य लहरींचे परिवर्तन लहान लहान वावटळींत झाले. झाडांची सुकी पाने भराभर गळून पडू लागली आणि ठिकठिकाणी वाऱ्याच्या भोवऱ्यांत धुरळ्याबरोबर गिरक्या घेत नाचू लागली. त्यातल्यात्यात एखादा सोसाट्याचा वाऱ्याचा झोत आला की ते भोवरे वरवर चढून त्या पानांना कुठच्या कुठे उडवून लावतात. पाकोळ्यांच्या नाचात जो विभ्रम आहे तोच या अचेतन पानांच्या वावटळींतल्या नाचात मला नेहमी भासतो. तो तपकिरी किंवा पिवळा विशीर्ण रंग, वाऱ्याबरोबर उडताना पानांची होणारी ती विशिष्ट कुजबूज; जणू काही त्या निर्जीव पर्णसृष्टीतला जीव वाऱ्यावर बसून अदृश्य स्थितीतही, जगाला काहीतरी आशादायक संदेश देत असतो. वाऱ्याच्या

बेफाम वारूवर स्वार होऊनच जसे काही त्या पानातले अमर चैतन्य मेघांच्या प्रचंड देहामागे दडून बसते. वाऱ्याच्या झोताझोताबरोबर झाडे कमरेपर्यंत लवून पिंगा घालीत असतात. हिरवी पाने घोष करतात. गंभीर मेघगर्जनेला साथ देतात. तहानलेली झाडे वर उडता आले नाही तरी उसळ्या मारमारून मेघांना झोंबू पाहतात. झाडांच्या पानापानांत आतुरता भरलेली दिसते.

वर्षाराणीच्या स्वागतासाठी झाडांनी आपले पानांचे साज फिरून बदलले. अवघ्या दोन महिन्यांत वसंतातली ती बहारदार पालवी जून झाली आणि पिकून गळूनसुद्धा पडू लागली. माघात पानगळती सुरू झाली की पाने तपकिरी होतात; एकदम सारी गळून पडतात. पण आषाढाच्या सुरुवातीला पाने बहुधा पिवळी धमक होऊन गळतात. गुलमोहोराच्या झाडात सुंदर सोनेरी छटा या पिवळ्या पानांमुळे दिसतात. पुष्कळदा संध्याकाळी सूर्याचे किरण पडून चमकावे, अशी ती पाने अभ्रे आली असताही चमकतात. आंब्याच्या झाडांना मधूनमधून कोवळ्या पालवीचे अंजिरी घोस लागलेले आहेत. पिंपळही उन्हाळी पाने गाळून बसला आहे. वडाच्या हिरव्या आणि पिकलेल्या पिवळ्या पानांच्याकडे आपले लक्षच जात नाही, कारण त्यांची ती झाडभर लागलेली लालबुंद फळे नजर रोखून ठेवतात. रानभेंडीच्या झाडाची शोभा अवर्णनीय वाढली आहे. ज्येष्ठापासून त्रिकोणी सुंदर पानांनी भेंडीचे काटेरी अंग अगदी आच्छादून गेले होते. आणि मृगाच्या हाकेबरोबर आकाशात सोनेरी बिजली चमकली आणि खाली या झाडावर पिवळे धमक मोठे असे गिरेबाज फूल उमलले. फुलाच्या मधोमध तांबड्या मखमलीचा चांदवा आणि वर परागांचा तुरा आहे. अंगाला पाकळ्यांच्या पिळाचे वेढे बसलेल्या कळ्या दिवसेंदिवस टपोर होऊन फुलताहेत. पुष्कळदा ही पिवळी फुले आणि पाने ही एकात एक इतकी मिळून जातात की, फूल कुठले आणि पान कुठले हे लांबून उमगत नाही; आणि म्हणूनच न फुललेल्या झाडाची शोभादेखील ती पिकली पाने उणी दिसू देत नाहीत. फूल पिकुटले की तांबूस सुंदर रंग

धारण करते. या वेळी पाकळ्यांचा ताठरपणा कमी झाला नसता तर हे फूल उताराला लागले आहे असे लक्षातही आले नसते. बचनागाचे पिवळे फूलही असेच गर्द शेंदरी रंग धारण करते. या झाडाची फुले जशी झपाझप फुलतात तशीच ती लांब देठाची, हिरव्या रंगाची, सुपारीच्या आकाराची, भेंडीची फळे इतकी भराभर वाढतात की जणू काही ती कळ्यांच्या बरोबरच निराळी वाढली आहेत, फुलांशी त्यांचा काही संबंधच नाही. लहानपणी भेंडीची ही फळे जमवण्याचा मोठा छंद होता मला. ही फळे फोडली की आतून गुळगुळीत चकचकीत चिकट असा पिवळा रंग निघतो. त्याचा स्पर्श मोठा मजेदार असतो. लहानपणी बाहुल्यांच्या लग्नात नवरीची अष्टपुत्री आम्ही नेहमी याच रंगाने रंगवीत असू. फुलांच्या मधले ते पाकळीच्या टोकाशी असलेले मखमली चांदवे, ते बाहुलीच्या लग्नातले एक अतिसुंदर पण कल्पित पक्वान्न म्हणून आम्ही उपयोगात आणीत असू. आमचे रुखवत त्याशिवाय कधीच पुरे झाले नाही.

भेंडीच्या झाडाला बहर आला की वालगुंजांच्या झाडाचा पुष्पबहार ओसरू लागतो. या दोन झाडांच्या फुलांत मला कुठले जास्त आवडते ते सांगणे कठीण आहे. त्यामुळे एक नाहीसे होते आहे त्याचे दुःख मानावे, की दुसरे उमलते आहे त्याने आनंदित व्हावे, हेच समजत नाही. मन दोहोंकडे ओढले जाते. वालगुंजांची झाडे भव्य आणि शोभिवंत. शिरीषाच्या पानांसारखीच डहाळीला दुतर्फा लागलेली ती जोडपाने. प्रत्येक पान चवलीएवढेच पण जरा लांबुळके असते. तरीसुद्धा जोडपानांच्या सौंदर्याची सारी भव्यता व नखरा, चिंच, गुलमोहोर, शिरीष, बाभूळ, वगैरे झाडांप्रमाणे यातही भरलेला आहे. पंख्याच्या संथ व डौलदार गतीची झाक या पानात असते. काळे खरबरीत असे ते झाडाचे उंच धूड, त्याला असलेल्या त्या तशाच अगडबंब फांद्या. पाने त्या मानाने फार नाजूक आणि फुले तर किती नाजूक म्हणून सांगावी ? सामर्थ्य आणि कोमलता, भव्यता आणि सूक्ष्मता यांची सांगड घालण्याचे निसर्गाचे कौशल्य अपूर्व खरे ! या कौश-

त्याची खूण वालाच्या या झाडात पुरेपूर पाहायला मिळते. आणि तशीच रंगांची भुलावण ! वैशाखाच्या अखेरीस या झाडावर फुलवंती बहरते. वोटभर लांबीच्या फुलांच्या पिवळ्या केशरी वर्णावर झुकणाऱ्या मंजिऱ्या झाडभर लटकतात. पण त्या इतक्या नाजूक असतात की, मुद्दाम पाहिल्या-शिवाय पानांच्या पसाऱ्यातून नजरेत भरत नाहीत. पानांची संथ गळती आणि मंजिऱ्या फुटण्याची वेळ या झाडाच्या बाबतीत साधारण एकच असते. ऐन वसंतात हे झाड संकोचूनच उभे असते. सबंध ज्येष्ठ व आषाढाच्या आरंभापर्यंत ही फुले दिसतात. मृगाची झड लागली की फुले गळू लागतात; बहर ओसरतो. वालाच्या फुलांचे रूप तुळशीच्या मंजिरी-प्रमाणेच पण निराळ्या रंगाचे असते. तुळशीच्या फुलाएवढेच फूल. तुळशीचे चार पाकळ्यांचे पेल्यासारखे तर हे सहा पाकळ्यांचे आणि तोंडाजवळ अधिक पसरलेले. मधोमध केसरांच्या पुंजक्यात एक मोठा केसर, हिरवट वर्णाचा, बाहेर सोंडेसारखा लोंबत असतो. तीच फिकी पोपटी छटा प्रत्येक पाकळीच्या देठाच्या भागाशी दिसते. फूल अगदी निर्गंध. पण अशी अतिशय लहान आणि मुलायम फुले चहूबाजूंनी धरलेली ती मंजरी अत्यंत डौलदार आणि तितकीच कमालीची नाजूक दिसते. मुद्दाम पाहिल्याशिवाय नजरेत भरणार नाही, असे तिचे हे लाजरे लावण्य मला फार आवडते. फुलाची ती सोंड वाढते आणि तिच्यातून शेंगेचा तंतू लोंबू लागतो. झपाझप ती शेंग वाढीला लागते. पावसाळाभर पाण्याचा मारा खाऊन ती फोफावते आणि पावसाळा संपला की आत जोपासून ठेवलेला आपला तांबड्या टपोर वाटोळ्या सुंदर बियांचा खजिना जमिनीवर ओतून देण्यास सुरुवात करते. सतत आठ दहा महिने हा चेतोहर वर्षाव चालू असतो. वालाच्या सुक्या काळ्या शेंगांचे झुबके उलून आतल्या पिवळ्या अस्तरात लपलेले ते लाल तजेलदार दाणे, शिंपलीत मोत्ये असावी तसे दिसतात. वालाच्या फुलांच्या तुऱ्यापेक्षा हे घोस सहज नजरेत भरतात. लहान मुलांच्या खेळातले हे वाल म्हणजे मोठा खजिनाच असतात. तशाच त्या काळा ठिपका असणाऱ्या शोभिवंत गुंजा.

याच हंगामात त्यांच्या वेलीही शेंगा धरतात. त्यांची फुले घोसात असतात. किंचित पांढरी, पिवळी, निळसर छटा असलेली. विशेष सुंदर नसतात ती. गुंजांची पाने चिंचेसारखी. खायला गोड. स्वराला माधुर्य आणणारी. पण बिया? किती सुंदर त्यांचे रूप! पण किती जहर आत भरलेले! वालांचा आणि या गुंजांचा हा जहरीपणा पाहून नागसापांच्या कांतिमान सौंदर्याची आठवण होते. अनुपम सौंदर्याची सांगड निसर्ग सदैव भयानक विषमतेशी का घालतो बरे? या पाहा अती सुंदर पाकोळ्या; अंगावर लाल, काळ्या ठिपक्यांची मनोहर नक्षी धारण करणाऱ्या. बाकीची फुलपाखरे पावसामुळे दिसेनाशी झाली तरी या अजून डौलात व अती संथगतीने भटकतातच आहेत. बाकीची फुलपाखरे फुलांवर बसली की पंख मिटून घेतात. पण ही अगदी निर्भय. ती पंख उघडूनच बसतात. त्यांच्या पंखावरच्या त्या लावण्य-परिपूर्ण रंगीत आकृती विषमय आहेत असे कुणाला वाटेल? पण हेच जहरी सौंदर्य त्या फुलपाखरांना पक्ष्यांच्या तडाख्यातून वाचवते. सावकाश उडत जाताना ती सौंदर्याबरोबर विषाराचेही प्रदर्शन करीत जातात. ही खूण पाख-रांना समजते. वालागुंजांच्या बियांना पाखरे टोकरीत नाहीत. विषारी बचावाच्या साधनांशिवाय भूल पाडणारे सौंदर्य चिरंजीव होऊच नये, असाच निसर्गाचा संकेत दिसतो.

आषाढ लागला आणि चिंचेचे ज्येष्ठात नव्या पालवीने बहरलेले झाड, जे वसंतात ओकेबोके दिसत होते, ते प्रफुल्लित झाले. त्याची ती शेवग्याच्या फुलांएवढ्याच आकाराची तांबूस पिवळी व राजवर्खी वर्णावर झुकणारी फुले कुठे पानांआड दडून तर कुठे पानांबाहेर डोकावीत हर्षाने डुलू लागली. डहाळ्यांचे ते खरखरीत दांडोरे आपल्या शेंड्यावर पानाफुलांचे गुच्छ मिरवू लागले. पोरांना त्यांचा संकेत समजतो. कोवळ्या चिंचांच्या आशेने येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक शाळकरी पोराची लालचावलेली नजर त्या झाडाकडे जाते आहे. रस्त्यावर मिळणारे खडे उगीचच आतापासून ती पोरे अगदी आपोआप उचलून घेतात आणि मग जणू काही ओशाळून दूर भिरकावून देतात.

वासंतिक पाने गळतीस लागून ज्येष्ठाच्या मध्यावर झाडाझाडांवर नवी पालवी दिसू लागली. या पालवीत वासंतिक पालवीसारखा तांबूस भडकपणा अधूनमधून डोकावतो आहे. आंब्याच्या झाडावर मधून मधून कोवळे अंजिरी पानांचे घोस लटकताहेत. गुल्मोहोराच्या झाडावर नवी पाचूची नितळ छटा पानापानांतून वाहते आहे. बोगनविलाचे किंवा कालेलकरांनी भुवनवेल असे जिचे नामाभिधान केले आहे, त्या फाटकावर तोरणाप्रमाणे लटकणाऱ्या वेलीच्या प्रत्येक डहाळीच्या अग्रावर भडक किरमिजी फुलांचे गुच्छ आश्विनापासून नाचू लागले होते. वसंतात त्यांची कांती अवर्णनीय खुलली. जणू काही सुंदर मस्तकाच्या वनदेवतांचा नाचच त्या डहाळ्यांच्या रूपाने त्या वेलीवर होत होता. पण वसंत गेला आणि ते गुच्छ गळाले. मस्तकाचा आभास नष्ट झाला. पाने गळाली. दांडोरे शिल्लक राहिले. पण आता आषाढात नव्या सुंदर पानांची त्या डहाळ्यांवर दाटी झाली. प्रत्येक डहाळीवर पल्लवासारखी हाल्ताना दिसू लागली. ती वेल आपले ते असंख्य हात हलवून पळून गेलेल्या फुलांना परत बोलावते आहे, असेच तिच्याकडे पाहिले की वाटते.

केसराच्या पुंजाची फणी असलेली केसरचाफ्यांची मोठाली, भडक गुलाबी फुले वैशाखाच्या अखेरीस बहारास आली होती. तो भव्य वृक्ष. ती मोठी फुले. काय त्यांचे रूप वर्णावे ? पण आता आषाढात फुलांबरोबरीने कवठासारखी मोठाली फळेही त्यांवर लटकताहेत. आषाढ लागला आणि पेरूच्या झाडावर पहिलेवहिले फूल धरले. एवढ्या मोठ्या झाडावर एकच एक असे ते केसरमय पांढरे शुभ्र फूल कसे उठून दिसत होते. फूल गळाले. पेरूची बोराएवढी हिरवी गाठ आली. पोपटांचा जमाव जाता येता त्या झाडावर थबकू लागला. फळाच्या मागोमाग दुसरे एकुलते एक फूल आले आहे. फुलचुख्या त्याच्याभोवती नाचताहेत. पारिजातकाचा वासंतिक क्षीण बहार ओसरला असून काही काळ पानेफुले झडलेले ते सांगाड्यासारखे दिसणारे झाड, पावसाळ्याची सूचना मिळताच बारीक कळ्यांच्या तुऱ्यांनी मोहरून

गेले आहे. श्रावणाच्या तोंडी त्याचे वैभव खुलेल. तसेच बकुळीचे झाड. वसंताला विदागी म्हणून काही फुले त्याने दिली, तरी आषाढ-श्रावणात पावसाच्या थेंबोथेंबी ते आपली फुले गाळीत उभे असते.

मुचकुंदाचे भव्य, पळसासारख्या मोठ्या पानांचे, उलट्या बाजूने रुपेरी दिसणाऱ्या पानांचे झाड, तेही असेच. पहिला वासंतिक बहर संपून त्याच्यावर चौधारी करमराच्या आकाराची फळे धरली आहेत, तरीही पावसाळ्याच्या तोंडी ते नव्या कळ्या धारण करते.

मेंदी वसंतात तशीच आताही प्रफुल्लित झाली आहे. मातीकडून घेतलेले गंधवैभव पर्जन्याच्या अर्घ्याबरोबर ही भूमिकन्या मोठ्या भक्तिभावाने तिलाच प्रत्यर्पण करीत आहे. तशीच ती निर्गुंडी. सिंधुवार या नावाने संस्कृतात ओळखले जाणारे हे झाड वसंतात विशिष्ट गंधाचे फवारे वाऱ्याबरोबर फेकीत होते. तपश्चर्येत गढून गेलेल्या पार्वतीलाही याच्या जांभळ्यापांढऱ्या फुलांनी आणि निळ्या मण्यासारख्या कळ्यांनी भरलेल्या तुऱ्यांनी नटायचा मोह आवरता आला नाही. ते तुरे तिने केसांत खोवले होते असे वर्णन कालिदास करतो. त्या फुलांनी भूषित झालेल्या पार्वतीच्या सौंदर्यावर शंकर भुलले. असा काव्यमय, भव्य इतिहास असलेले हे झाड, हरतालिकेपर्यंत फुले धारण करून राहिले नाही, तरच आश्चर्य ! वसंतातल्या पुष्पबहारावर इतस्ततः फुलपाखरे झेपावत होती. लहान आणि मोठी. चंचल आणि जरा संथ. नाना रंगांची अशी. पण आता फुले गेली आणि तीही गेली. पण निर्गुंडीभोवती मात्र पावसामुळे ज्यांच्या पंखांवरच्या सुभग रंगाकृती पुसटून गेल्या आहेत अशा काळ्या व काही पिवळ्या मोठाल्या आणि संथपणे उडणाऱ्या पाकोळ्या गिरक्या घेताहेत.

आषाढ लागला आणि तापलेल्या सुक्या मातीत लहानग्या ढेकणासारख्या मोराची घरे दिसू लागली. ‘ नाच रे मोरा ’ म्हणून पोरे त्यांना नाचवतात. कोण हा मोर ? इतर फुलपाखरांच्या अंड्यातून अळ्या निघतात तसे

चितूरांच्या अंड्यातून हे मोर. काही दिवसांनी मातीतच ते कोश करतील आणि त्यांचे चितूर होतील.

आषाढ लागला आणि पावसाळ्याच्या पहिल्या माऱ्यानंतर ओलेत्या झाडांचा कायापालट कसा झाला तो पाहा. कोरड्या ऋतुमानात वेगवेगळ्या झाडांच्या रंगच्छटा एकाच आकाशाच्या पार्श्वभूमीत, विविधपणामुळे कशा सामावून जाऊनही फिरून अलग दिसत होत्या. पेरूच्या झाडाच्या फांद्यांचा तो किंचित सोनेरी तांबूस वर्ण. भेंडीच्या झाडाची ती निळसर पांढरी छटा, आकाशात किती मिळून गेल्यासारखी वाटायची. तसेच ते अधिक पांढुरके शेवग्याचे झाड, पांगाऱ्याचे, पिंपळाचे आणि गुलमोहोराचे पण. ही सारी झाडे फिक्या निळ्या छटेमुळे कशी नाजूकपणे आकाशाच्या विस्तृत पार्श्वभूमीत एकजीव झाल्यासारखी वाटायची. त्यामुळे त्यांची हिरवी पानेफुले खुल्या आकाशात फार भडकपणे शिरल्यासारखी वाटायची. त्याच्या विरुद्ध ते पेरूचे सोनेरी तांबूस मुलामा असलेले झाड. पानांपेक्षा त्याच्या फांद्याच नजरेत अधिक भरायच्या. शिरीष, आंबा वड या झाडांच्या काळ्या आकृती आणखी निराळ्याच गंभीर सौंदर्याने भारलेल्या वाटत. पण पाऊस आला. झाडे अर्धामुर्धी भिजली. आणि मग हळूहळू वडाच्या झाडावरही काही काही काजळासारखे तर काही जरा चट्टेपट्टे दिसू लागले. तीच काजळी पेरूच्या झाडाच्या गाठीवर दिसू लागली. झाडाचा काळसर रंग गेला. हा काळा रंग प्रत्येक झाडावर वाढत गेला. आणि नंतर सारीच झाडे एकाच तऱ्हेच्या काळ्या बुंध्यांची दिसू लागली. पावसाळा सुरू झाला आणि पानांतले हिरवे द्रव्य अमूप वाढून तीही बरीचशी एकाच हिरव्या रंगाची झाली. पावसाच्या सरींच्या पडद्यांआडून हे काळे सांगाडे व त्यांच्यावरचे ते हिरवे पानांचे डेरे कुठेही पाहा, एकाच तऱ्हेचे वाटतात. पावसाने नाहत असलेली झाडे ही अशी आकर्षक दिसतात.

रात्रभर वादळी वारे पन्नास बावन मैलांच्या वेगाने सोसाटून वाहत होते. भरीला पावसाच्या सरी थांबून कोसळत होत्या. दिवसा काळे पण रात्री

पर्जन्याने ओथंबलेले ते ढग पांढरे दिसत होते. एक प्रकारचा पहाटेसारखाच प्रकाश चहूकडे पसरला होता. त्या प्रकाशात झाडे वाऱ्याच्या झोताबरोबर उलट सुलट हलताना दिसत होती. माडाची झाडे झिंज्या पसरून अंगात आलेल्या माणसासारखी बेभान होऊन संतप्त स्थितीत पिंगा घालताहेतशी वाटत होती. मध्येच एखाद्या झाडाची फांदी काडकन मोडे. अशा स्थितीत उजाडले. प्रथम कावळ्यांनी अती घोगऱ्या बसक्या आवाजात काव काव केले व फिरून ते पेंगत झोपी गेले. थोड्या वेळाने कोंबडा आरवला. आणि नंतर फिरून कावळ्यांचा आवाज झाडाझाडावरून येऊ लागला. चिमण्या नेहमीच कावळ्यांच्या मागाहून जरा उजेड झाला की मग चिवचिवाट करतात. चिमण्यांच्या आवाजातच बुलबुलाचा व साळुंकीचा शब्द मिसळतो. फुलचुख्याचा गोड आवाजही त्यातच मिळून जातो. पण आज असे काही झाले की, कावळ्यांचा आवाज नेहमीपेक्षा अधिक गजबजलेला ऐकू आला; काही तरी विशेष घडावे त्या वेळीं येतो तसा; आणि साळुंकीच्या अत्यंत त्रस्त व क्रुद्ध आरोळ्या आणि फुलचुखीसारखाच पण एक नवा व अपरिचित मंजुळ आवाज त्या कोलाहलात ऐकू येऊ लागला. खिडकीच्या खालूनच हे आवाज येत होते. मी उठून पाहिले. पाऊस थांबून आकाश बरेच उजळले होते. उन्हे पडतील असा रंग दिसत होता. गेले दोन दिवस सकाळीही झाडांतच गुपचूप तोंड खुपसून बसलेले पक्षी आज मुक्त मनाने इतस्ततः विहार करीत होते. समोरच्या आंब्याच्या झाडावर कावळ्यांचे घरटे आहे. मादी पिले बाहेर पडल्यापासून तर जरा सुद्धा ते झाड सोडून जात नाही. नर कुठले तरी घास आणून तिच्या चोचीत घालीत असतो. पण ज्येष्ठाच्या मानाने तिची काया खरोखरच सुकून गेली आहे. पिलांची गोकर्णीच्या फुलासारखी पण आतून गुलाबी अशी सदा पसरलेली ती तोंडे पाहून ती आईबापे त्यांना भरवण्यातच चूर असतात. त्यामुळे नराचा डोळा कुठले भक्ष्य कसे मिळवावे याकडेच लागलेला असतो. आज साळुंकीचे एक पोर -- नवेच फडफडत उडायला शिकणारे --- काल उत्साहाच्या भरात जे आपले जांभळीचे झाड सोडून

उडायला निघाले होते, त्याला परत उडून आपल्या निवाऱ्याच्या ठिकाणापर्यंत जायची ताकद उरली नव्हती. पेरूच्या बेचक्यात ते बसून राहिले होते. त्याची आई समोरच्या झाडावर बसून आकान्त करून त्याला धीर देत होती. शिकारी कावळ्यांपासून त्याचे प्राण वाचवण्यासाठी धडपडत होती. सारखी त्याच्या डोक्यावरून घिरट्या घालीत होती. नराला बोलावीत होती. तो मधूनमधून तिच्या मदतीला धावे. परंतु उडायला सिद्ध झालेल्या त्या अपत्याबद्दल त्याला आता मादीइतका ओलावा राहिलेला नव्हता. कावळे मादी जरा इकडे तिकडे झाली की त्या पोराला टोचायला येत आणि मग ते करुण, मंजुळ चीत्कार करी. मग साळुंकी फिरून पंख फडफडावून आक्रोशाने ती सारी जागा निनादवून टाकी. मग ते पोर तिला साद करू लागे. तेच ते गोड कोवळे स्वर मला फुलचुख्यांचे पण निराळे वाटले होते. आणि हा कोण नवा पक्षी आहे ते पाहण्यासाठीच मी बाहेर पाहत होते. दिवसभर हेच नाटक चालले होते. मादी त्याला मधूनमधून भरवी पण अगदी जवळ अशी मात्र त्याच्याजवळ ती बसली नाही. दोन दिवसांपूर्वी झाडावरून कसे उडायचे याचे शिक्षण ती त्याला देत होती. पण तेव्हाचा तिचा अभिनिवेश आणि आताचा यांत मोठा फरक दिसत होता. आता संकटाने कावून त्याला वाचवायचा निर्वाणीचा प्रयत्न ती करीत होती. ज्या झाडावर तिने त्याला उडायला शिकविले, जे झाड तिचा हक्काचा निवारा होते, त्याच्यापासून ते पोर सुटले होते. त्याला उचलून नेण्याची ताकद तिच्यात नव्हती. इतके उडण्याचे सामर्थ्य आणि तिचा संदेश समजण्याची बुद्धी पिलात नव्हती. सतत आक्रंदन हेच काय ते तिचे व त्याचे अखेरचे शस्त्र. दिवसभर तिने त्याचे रक्षण केले. पण दुसऱ्या दिवशी सकाळी तिने अतिशयच जोराचा हंबरडा फोडला. आज कावळ्यांनी जमावाने पोराभोवती साखळी करून त्याला कोंडले होते. साळुंकीचा तरी जीव त्यांच्यापुढे केवढा ? ते पोर झाडावरून मातीत कोलमडले. कावळे चोची परजून पुढे सरसावले. त्यांनी त्याला वेढले. साळुंकीचा आक्रोश परमावधीला गेला. त्याबरोबर ते शिकारी कावळे मागे सरले. पोर जीव वाचविण्यासाठी धडपडू

लागले. पण आता कावळ्यांचे अवसान वाढले होते आणि साळुंकीचे ओसरू लागले होते. ती आंब्याच्या झाडावर उंच बसून ओरडू लागली. कावळे फिरून मोठा गोंगाट करून त्या पोरावर चालून गेले. तेही मोठ्या सावधपणे. कारण ते भक्ष्य फक्त आपल्याला व आपल्या कुटुंबालाच मिळावे अशी स्पर्धा त्यांच्यांतही दिसत होती. ते पोर आता स्तब्ध झाले होते. इतक्यात एक मांजर तिथे टपकले. सावज पाहून त्याचे डोळे आनंदाने लखलखले. या मांजराला उंदरांपेक्षा चिमण्या पाखरे मारून खाण्याचाच शोक अधिक आहे. त्याने उडी मारली त्याबरोबर कावळे दूर झाले. घाबरलेले ते पोर मात्र आता मांजरापासून दूर उडी मारून कावळ्यांच्या जमावात गेले. क्षणभर कावळ्यांनी त्याच्याभोवती कडे केले. मांजर जरा थांबले व धीटपणे पुढे सरले. इतक्यात तिकडून कुणब्याची एक मुलगी आली आणि तिने अतिशय प्रेमाने ते साळुंकीचे बछडे उचलून धूम ठोकली. किती तरी वेळ कावळे कोकलत होते. मांजर गुरगुरत होते. साळुंकीचा तीव्र आवाज करुण झाला. तेव्हापासून ती सारखी पोराला धुंडाळींत झाडाझाडावरून हिंडतेच आहे. टाहो फोडते आहे.

सकाळच्या वेळी उन्हाची तिरीप फाकली आहे. दोन तीन दिवसांत उन्हाचे दर्शन न झाल्यामुळे पाखरे सुस्तावली आहेत. आकाशात उंच उंच उडणाऱ्या घारी शिरीषाच्या झाडावरच बसून बसून असतात. सारीच पाखरे या दिवसांत पिलांच्या घरट्याच्या ओढीमुळे लांबवर फिरत नाहीत. झाडाझाडांवरच असतात. पण उन्हाची तिरीप आली आणि आनंदाने आरोळी फोडीत पोपटांचा थवा पंख पसरून झाडाभोवती प्रदक्षिणा घालू लागला. बुलबुलाची एकच तान झाडाझाडांतून ललकारली. सारी पाखरे झाडांच्या उंच शेंड्यावर पिसे सुकवीत बसली. घारींनी आपले विशाल पंख पसरले आणि पूर्वेकडे पाठ करून झाडांवर त्या उपड्या निजल्या. आकाशात गिरक्या घेणाऱ्या घारींचे झाडाला हे बिलगणे पाहून मोठी गंमत वाटते. मोठी, संथ उडणारी, पिवळी, शेंदरी आणि काळी फुलपाखरेही बाहेर पडली. किती

मंदावली आहे त्यांची गती ! ते पाहा एक पिवळे फुलपाखरू किती सावकाश उडत आले ते ! पंखांची उघडमीट करीत समोरच्या झोपड्याच्या लाल कौलांवर ते पंख मिटून बसले. अगदी निश्चल. दोन मिनिटे तशीच गेली. मग त्याने पंखांची उघडमीट चार पाच वेळा झपझप केली. फिरून पंख मिटून घेतले आणि मग झोक जावा तसे ते कौलांवर कोलमडून पडले. पंख आपोआप उघडले. प्राण उडाले. आणि इतक्यात नव्याच लाल मस्तकाच्या अंजिरी रंगाच्या फुलचुख्या जोडप्याचे लक्ष त्याच्याकडे गेले. आयते मिळालेले भक्ष्य पाहून त्यांनी आनंदाने आरोळी ठोकीत त्याला चोचीत पकडले आणि पेरूच्या झाडावर बसून एकमेकांना तो शोभिवंत चारा ती भरवू लागली. इतक्यात फिरून सोसाट्याचा वारा आला. ऊन पळाले. ढगांची गर्दी झाली आणि मुसळधार पावसाने हाताच्या अंतरावरचेही काही दिसेनासे झाले.

# श्रावण-सावळी

आषाढापासून भाद्रपद सरता आणि आश्विनाची सुरुवात म्हणजे श्रावण-सावळी. श्रावणातल्या सूर्यालाही पर्जन्य असे नाव पुराणात मिळालेले आहे. शरदृतूचा पहिला महिना आश्विन हा पावसाळी गोतवळ्यातच जमा असतो. श्रावणाची सावळी जमवून खऱ्या अर्थाने चातुर्मास होतो. धुंद, कुंद वातावरणाचा, उन्हाळ्यातून हिवाळ्याकडे खेचून नेणारा हा पावसाळा. इंद्रधनुष्यातून चराचराच्या सौंदर्याचा वेध घेणारा हा ऋतू. मागच्या पुढच्या ऋतूंतल्या महिन्यांना आपल्या मिठीत आवेगाने धरणारा ऋतू. जलबिंदूतून सूर्याच्या सप्त रंगांचे अभिनव दर्शन देणारा ऋतू.

या ऋतूच्या अधिष्ठात्या श्रावणराजाची लाल पताका पिंपळाच्या पानांवर किती डौलाने फडकते आहे. फुलांपेक्षाही नाजूक ! फुले नाहीत म्हणून कुठे अडले या झाडाचे ! वसंतातला पुष्पसंभार आषाढातच कोमेजला. गडद हिरवी पाने व पक्व फळे वृक्षावृक्षांवर दिसत होती. पण या जून पानांचा संकेत या

पिंपळाने कसा साफ मोडून टाकलेला दिसतो आहे. एरवी याची पाने इतर पानांपेक्षा कडक आणि तकतकीत. सूर्याच्या उन्हाच्या तिरीपांत सदा लखलख करायची. जरा वाऱ्याची झुळूक आली की सळसळ सळसळ आवाजाने आजूबाजूचे वातावरण भरून टाकायची. समुद्राच्या लाटा सारख्या ऐकत बसले तर मनावर जो काही गंभीर परिणाम होतो, तोच या पिंपळाच्या पानांच्या आवाजाने होतो. थोडा वेळ किनाऱ्यावर बसले, तर लाटांचा आवाज कसा मन उत्तेजित करतो, तसेच या झाडाचे. मनाला कितीही उदासीनता असू द्या. जरा वेळ, जरासा वेळ, पिंपळाजवळ उभे राहा; त्याच्या पानांच्या थयथयाटाने तुमचे मन सगळ्या चिंता विसरून जाईल. एवढ्या तेवढ्या वायुलहरीनेही उचंबळून येणारा हा पुराणवृक्ष पाहून, एक प्रकारची बंडखोर वृत्ती मनात उपजते. एक प्रकारचा वचकही निर्माण होतो. ना या झाडाला फूल, ना वडासारखे सुंदर फळ. पण तरीही हा वृक्ष भारतीय संस्कृतीत कसा अमर होऊन राहिला आहे. ही भव्यता आणि हा प्रचंड घोष हेच का याचे वैशिष्ट्य ? श्रीकृष्णाला विश्वाच्या अफाट व्यापाराची प्रतिमा या सनातन अश्वत्थ वृक्षात सामावलेली दिसली. त्याचे मूळ स्वर्गात, व फांद्यांचा पसारा आमच्या जगात दिसला. तो का ? पिंपळाची ती लाल लाल पालवी पाहिली आणि मग मला या झाडाच्या अंतरंगाचे निराळेच दर्शन झाले. वसंतात हे झाड सुकी पाने जमिनीवर गाळीत असताना दिसत होते. फुलांचे तर नावच नको. लोककथांत काय ते पिंपळाच्या फुलांचे आणि त्याच्यावर लटकणाऱ्या मोत्यांच्या घोसांचे वर्णन! पण ग्रीष्म उलटला आणि दोन तीन महिने झडलेला हा वृक्ष, लालबुंद पालवीचे मनोहर गेंद माथ्यावर घेऊन खाली अर्धी सुकी पाने असलेला असा सावध उभा राहिला. कोवळी तांबूस पालवी कुठल्या झाडाची सुंदर नसते ? पण खरोखरच इतर झाडे अल्लड व तरुण वाटतात, तसे हे झाड केव्हाच वाटत नाही. मग त्याला सनातन म्हणतात, त्याची पूजा करतात, पिंपळाच्या मुंज्याची धास्ती मनात अहेतुक जागृत असते, म्हणून म्हणा वाटले तर; या झाडाच्या पुराणपणाची कल्पना मनात

खोलवर रुजलेली दिसते. आणि मग ही, बाळाच्या नखाबोटांवरच खुलेल अशी लाली आपल्या अंगाअंगावर, आपल्यापेक्षाही अति वडीलधाऱ्या सृष्टिमातेने चढविलेली पाहून की कांय नेहमीची सळसळ टाकून हा वृक्ष अगदी शांत संकोची वृत्तीने अंग चोरून उभा असतो. श्रावणात हिरव्यागार पर्णराजीत खरोखरच ही लाल पताका मुद्दाम पाहिल्याशिवाय दिसत नाही, जशी वासंतिक पालवी झाडाझाडांवर दिसते. किंबहुना इतर भावंडांनी भरपूर लेवून मग जे उरले असेल ते आपण ल्यावे ही वडील भावाची वृत्ती या झाडाच्या उशीरा दिसणाऱ्या पालवीत दिसून येत नाही का ? एकीकडे वरची पालवी हिरवी होत जाते आणि पावसाच्या सुरात सूर मिळवून पानांची सळसळ सुरू होते, तर दुसरीकडे इतर झाडांच्या पानांबरोबरच पिंपळपाने मातीत मिळून जातात. पण तीही मोठ्या मजेने. पानांचा गर सगळा जातो; आणि मग सबंध जाळीदार पान किती तरी दिवस उन्हापावसाला दाद न देता तसेच पडलेले असते. हिरव्या पानांपेक्षाही हा जाळीदार सांगाडा किती मनोहर दिसतो. अनेक चित्रकारांनी तैलरंगाची सुंदर चित्रे या पानाच्या नक्षीवर काढलेली आहेत. किती भाग्य या पिंपळाचे ! बाकी, आंब्याफणसांची पानेही जाळीदार होतात; पण अर्धीमुर्धी. लवकर कुजतात ती. असा पुराणपणा, सजीवपणा, या पिंपळाच्या झाडात भरलेला आहे.

वडांनाही अशीच पालवी धरू लागली आहे. पण वडाच्या आषाढी लालबुंद फळांचे घोस अजून पक्ष्यांची झुंबड पडूनही डोळ्यांत भरताहेत. आणि म्हणूनच पिंपळाच्या पताकांची सर या पालवीला येत नाही. वडाची फळे खाण्यात पोपट आणि कावळे यांची स्पर्धाच लागली आहे. झाड कसे पाखरांच्या गजबजाटाने भरून गेले आहे ! त्याला स्वतःचे व्यक्तिमत्त्व तो भव्य असूनही उरलेले नाही. लेकुरवाळीसारखी त्रेधा त्याची झाली आहे. मात्र जे काम पाखरांच्या असंख्य चोचींनी केले नाही, ते पावसाच्या सरींनी केले आहे. देठे कुजून फळे खालच्या पाचोळ्यात टपटप गळू लागली, मातीत एकजीव होऊ लागली.

आणि श्रावणातल्या पावसाची आणि ढगांची मजा किती आणि कशी सांगावी ? सूर्यबिंब तर अगदी दिसत नाहीसे झाले आहे. हे पाहा संध्याकाळचे ढगावर ढग पांगताहेत. जरा पाऊस थांबला आहे, वारा खूप सुटला आहे; ढग पांगताहेत आणि दूर जाता जाता सरड्याप्रमाणे रंग बदलताहेत. किती हे रंग ! पश्चिमेच्या क्षितिजाजवळ मोठे जांभळे ढग काळ्याकबऱ्या आकाशभर पसरलेल्या ढगांतून एकदम उसळी मारतात. मग ते पांगू लागतात आणि त्यांतून तांबूस जांभळे ढग निघतात. त्यांच्यांतून तांबडे ढग निघतात आणि मग लिंबी रंगाचे पिवळे जर्द ढग हसू लागतात. ते जरा फाकून एक सुंदर केशरी कडे जांभळ्या ढगात लोळू लागते. पिवळा प्रकाश खुलतो. वातावरण उजळते. जवळजवळ अर्धा तास ही रंगपंचमी चालू असते आणि मग जांभळे ढग फिरून आक्रमण करून लाल पिवळ्या छटा दडवतात. आणि काळ्या धूसर ढगांचे पांघरूण घेऊन पावसाच्या सरींचे गाणे ऐकत ते झोपून जातात. काही क्षण ढगांचा गुलाबी आणि काळा रंग एकत्र होऊन भयाण छटा पश्चिमेला दिसू लागते. नुसता काळा रंग असा भयाण कधीच दिसत नाही. पण काळ्यात गुलाबी रंग घाला, की पाहा कसे काटे अंगावर येतात ते. जणू मृत्यूचीच सावली. भारी उदास वाटते मला तो ढगांचा संध्याकाळचा रंग पाहून. पण लवकरच रात्र होते आणि गडद काळोखाचे तरंग दाट होत होत सारे आकाश एका रंगाचे काळे धूसर होते. वीज चमकली की काळे पांढरे ढग तेवढे अलग दिसतात. आणि एक गंमत पाहा, या ढगांनी व्यापून गेलेल्या आकाशाची. बिजलीची चमक सोडली तर वास्तविक सगळ्या स्वर्गस्थ ज्योती यांनी झाकून टाकलेल्या. त्याच्यामुळेच रात्री काळोख्या असतात. तरी पण आकाशाकडे मध्यरात्री पाहा. पाऊस मुसळधार पडताना सुद्धा, शेजारचे घर एक वेळ सरींच्या पडद्यातून दिसणार नाही, पण आकाश मात्र निराळे आणि पांढरटच दिसते. अंधाऱ्या वातावरणात जरासाही पांढरा रंग अधिकच पांढरा दिसतो. तसेच संध्याकाळी धुरकट वाटणारे ढगच आकाशाला पांढरेपणा देतात. एरवी आपल्या आजूबाजूला

काळोख दिसला तरी आकाशातला उजळा मंद का होईना, टिकूनच असतो.

सकाळ झाली तरी पूर्वेला गुलाबी रंग आता नाचत नाहीत. पांढरेपणाचा उजळाच तिथे दिसतो. रुप्याच्या रंगासारखे तेज ढगांतून कडाकडांनी धावत असते. सोनेरी मुलामा नेहमीप्रमाणे नसतोच. श्रावणातला हा झाकल्या सूर्याचा रुपेरी प्रकाश मला फार आवडतो.

एक दिवस दुपारची वेळ होती. श्रावणाचा मध्य होता तो. पावसाच्या सरी आल्या की झोडपल्याप्रमाणे येत होत्या. पण मध्ये तास तास पावसावाचूनही जात होता. माध्यान्ह टळल्यामुळे सूर्य किंचित पश्चिमेकडे झुकला होता. पावसाची काळोखी जाऊन एकदम रुपेरी प्रकाशाची झळक दिसल्यामुळे मी वर पाहिले तो काय? ढगांच्या सात वेगळ्या आवरणांखाली दडलेल्या, मोत्यासारख्या सौम्य रंगाच्या सूर्याचे दर्शन मला झाले. पहिल्याने भुरकट रंगाचे ढग फाकले. बाजूला गडद निळ्याकाळ्या ढगांच्या राशी जमलेल्या होत्या. मग वाऱ्याच्या झुळकीने ते भुरकट ढग पांगू लागले. अधिकाधिक पारदर्शक होऊ लागले. एकाहून एक छटांनी पांढरी असणारी अभ्रे बाजूला होऊ लागली. आणि मग मध्येच आकाशाची पोकळी थोडी थोडी दिसू लागली. पहिल्याने धुरकट, मग निळी; अभ्रे आणि ऊन एक झाल्यामुळे हिरवी अशी ती लहानशी पोकळी दिसू लागली. बाकी आकाशभर ढग पसरले होते. पण सूर्यबिंबाच्या जवळच्या टीचभर जागेतच हे सारे खेळ होत होते. मग ती पोकळी मोठी मोठी होऊ लागली. ढग विरळ होत होते. अधिक पोपटी छटा तिथे नाचत होत्या. मग त्या पोपटी छटाही विरत गेल्या. शिंपलीसारखे रुपेरी सूर्यबिंब—त्याला सूर्याचे बिंब केवळ वाटोळ्या आकारवरूनच म्हणायचे. किरणांचा पसारा नाही. ते सुवर्णजाल नाही. काही नाही. तरी पण थिजल्यासारखी होऊन मंद झालेली, ढगातच विरलेली ती किरणे या श्रावणातल्या सूर्याला अपूर्व शोभा देत होती. अनिमिष नेत्रांनी तो रुपेरी सूर्य–तो मेघरूप, पर्जन्यरूप सूर्य–मी पाहत होते. जाईजुईच्या झेल्यासारखा हातात धरून त्याला हुंगावे असे वाटत होते. सूर्यबिंब इतके जवळचे,

आपल्या आटोक्यातले, सौम्य आणि हृद्य एरवी कधीच वाटत नाही. पावसाळ्यातले हे पांढरे सूर्यबिंब पाहणे हा माझा एक आवडीचा छंद आहे.

श्रावण म्हणजे हिरव्या रंगाचे मुक्त प्रदर्शन. आषाढात जोराजोराने पाऊस कोसळू लागला की जे जे बीज धरणीत पडले असेल ते ते उगवून वर येते. कोवळ्या तृणांकुरांनी पृथ्वीचे विशाल अंग झाकून तर जातेच, पण ते उघडे बोडके दगडही, त्यांच्या आसपासच्या डबक्यात पाणी साचले की, हिरव्यागर्द शेवाळाची मखमल पांघरून बसतात. उन्हाळ्यात ढग नसल्या-मुळे आकाश उंच उंच जाते. खाली धरणी उघडी पडते. झाडेही पुष्कळशी नागडी उघडी असतात. आता पावसाळ्यात सृष्टीची भव्य नग्नता कुठे कुठेही दिसत नाही. पण हिरव्या रंगांची विशाल वस्त्रे एकावर एक लपेटून चराचर उभे असलेले पाहिले की खरोखरच डोळ्यांचे पारणे फिटले असे वाटते. मऊ माती नटली तर नवल नाहीच; पण ही पानथळे आणि ते रुक्ष कठीण काळे फत्तर, यांना मखमलीचे पांघरूण घेताना पाहिले की मोठी मौज वाटते. अथर्ववेदात शेवाळाला गंधर्वांचे दिव्य अन्न असे म्हटले आहे. ज्या जलाशयात माणूस जाऊ शकत नाही तिथेच हे उगवायचे. माणसाला शेवाळाचा काही उपयोग असू नये, त्याचा हातही त्याला लागू नये, असा हा संकेत पूर्वकालीन कवींनी ओळखला म्हणून का त्यांनी शेवाळाला गंधर्वांचे अन्न बनवले? या अन्नाला पाय लागला की तुम्ही घसरून पडलाच म्हणून समजा. लांबूनच शेवाळाची शोभा पाहायची. किती नाजूक नखरा त्याचा! श्रावणात खरोखर किती तृणे, वनस्पती उगवतात, त्यांची काही गणती? पण या शेवाळाच्या गालिच्याची सर काही कुणाला नाही. आपल्या भारतीयांच्या खाद्यांची वर्णने सगळीं चवीची. क्वचित आकाराची. भ्रमर, फुलपाखरे फुलांच्या पेल्यातून मध पितात. तथापि मधाचे रूप काही मोठे आकर्षक नाही. पण सृष्टीतल्या सर्व सौंदर्याचा भौतिक आणि कलात्मक आस्वाद घेणाऱ्या त्या सौंदर्यमूर्ती, सौंदर्यभक्त गंधर्वांचा आहारही सुंदर व अप्रतिम असावा यात नवल काय?

एवढा मोठा समुद्र, तोही आता काळे कबरे रूप टाकून आपल्या लाटांतून

हिरवट छटांचे प्रदर्शन करतो आहे. सागराचा हा हिरवा रंग काही अलौकिकच असतो. आषाढातला तांबूस काळसर रंग श्रावणात लुप्त होऊन, शुभ्र फेसाने नटलेला हा हिरवा रंगच जणू पातळ होऊन नाचत असतो. मध्येच उन्हाची तिरीप लागली की रुप्याचा वर्ख त्या दाट पाण्याच्या पृष्ठावर बसल्यासारखा वाटतो.

घरासमोरची शिरीषाची झाडे गर्द नव्या पालवीने भरून गेली आहेत. वासंतिक पालवी उघड्या झाडावर फुलते, तर ही जुनी पाने जाऊन त्यांच्या जागी उमटते. किती फरक आहे या दोन ऋतूंतल्या पालवीच्या रंगांत? एकाच झाडावर हिरव्या रंगाच्या तीन चार छटा दिसताहेत. एक दिवस या झाडाच्या खोडाच्या मोठ्या थोरल्या गाठीवर मोठ्या फांदीला लागूनच काहीतरी फडफडताना दिसले. सारखे पंखांसारखे हलत होते. पहिल्याने मला वाटले की पारव्यांचे जोडपे आहे म्हणून. मग काही दिवसांनी तो रंग बदलला व वाटले की पोपटाची पिले असावीत म्हणून. पण ती एकाच जागी दिवस दिवस कशी बसतील ? कुणी त्यांना मारीत, टोचीत कसे नाही ? आणि एक दिवस सकाळी उन्हाची तिरीप आली आणि दिसले की वडाची ती दोन पाने नव्याने त्या झाडावर उगवली म्हणून. बांडगुळे आपण नेहमी पाहतो. वडापिंपळांची रोपे भिंतीतून उगवलेलीही पाहतो. पण झाडावर उगवता उगवता दिसलेले हे नवलपरीचे बांडगूळ पाहून मला मोठे नवल वाटले. पुढे वड टिकेल की शिरीष ? की काही दिवसांनी वडाचे झाड मरेल ?

उन्हाळा हा बीजोत्पत्तीचा ऋतू, तर पावसाळा वाढीचा ऋतू. पाखरांची पिले परांनी झाकून गेल्यामुळे आताच कुठे घरट्याबाहेर तोंड काढून बघू लागली आहेत. मांजराची पिले आईने टाकून दिल्यामुळे बोळाबोळांतून म्याव म्याव करीत आसरा धुंडाळताहेत, तर काही भाग्यवान पिले आईच्या कुशीत दूध पीत पडली आहेत. तशीच कुत्र्यांची पोरे पण. आणि या वेळी मोठे कुत्रे व बोके कसे मजेत हिंडताहेत. हे दोन लठ्ठ बोके उन्हाळ्यातले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ४८३२५ १।३।६१

आपले वैर विसरून कसे एकमेकांच्या कुशीत बिलगून झोपले आहेत. एकाचा पंजा दुसऱ्याच्या गळ्यात, तंगडे अंगावर, असे. आणि मलबार हिलच्या जरा खालच्या बाजूच्या दाट झुडपात काजव्यांची कशी दाटी झाली आहे! संध्याकाळी कसे ते चमचम करताहेत. आषाढात पक्षी गाभण होतात. फुलपाखरे अंडी घालून नाहीशी होतात. ज्या वेळी त्यांचा प्रणयरंग संपतो, त्या काळी काजव्यांचे प्रेमाराधन सुरू होते. नर काजवे आपल्या चंद्रज्योतीसारख्या सुंदर निळ्या रुपेरी पेटत्या पुच्छांनी प्रेयसीला आकर्षू पाहतात. श्रावणात ही प्रेमज्वाला पेटलेलीच असते.

आणि श्रावणाचा हा असा बहर पूर्ततेला येतो तो नव्या फुलांच्या आगमनाने. फुलांच्या रूपातच तो भाद्रपदात विलीन होतो. ग्रीष्मात झडलेली शिरीषांची फुले फिरून अधिक टपोरी होऊन झाडांवर दिसू लागतात आणि पारिजातकाच्या मोत्यांपोवळ्यांच्या राशीतून श्रावणाचे हसू फुटते. आकाशातून पळून गेलासा वाटणारा सोनेरी रंग सोनचाफ्याच्या फुलांवर नाचू लागतो. सुफलित सृष्टीचे कृतार्थतेचे, सुखाने थबथबलेले अश्रुबिंदू बकुळीच्या फुलांच्या रूपाने टपटप टपटप रात्रंदिवस गळू लागतात. कृतार्थतेच्या भावनेमुळेच काही फुले चिरसुगंधी झाली असतील! सुवर्णपुष्पीची किंवा सोनटक्क्याची अति नाजूक आणि विलक्षण सुवासिक पांढरी पिवळी फुले उमलण्याचा हाच काळ. या फुलांच्या पायघड्यांवरूनच भाद्रपद भूतलावर पदार्पण करतो.

## पुष्पमंडित भाद्रपद

श्रावणसाखळीतला, आश्विनात गुंफला गेलेला, भाद्रपद महिना हा शेवटला दुवा, श्रावणात लपलेली सोनेरी उन्हे बाहेर आणणारा, पावसाच्या माऱ्याने धुऊन जाणाऱ्या फुलांना हळुवार हाताने कुरवाळणारा, जोपासणारा. कुशल माळ्याप्रमाणे हवे तेवढेच पावसाचे पाणी शिंपणारा, हवे तेवढेच ऊन झाडाझुडपांना देणारा, वादळी वाऱ्यांना रोखून धरणारा, असा हा महिना. या महिन्यात इंद्रधनुष्ये दिसू लागली की पावसाने आवरते घेतले असे समजावे. म्हणून ढगांचा रंग आणि आकार कापसाच्या ढिगांसारखा किंवा लोकरीने भरलेल्या मेंढरासारखा होऊ लागतो. जाई, जुई, चमेलीच्या, सायलीच्या फूलांचा वास श्रावणात धुऊन जात होता. पण पावसाचा मारा कमी झाल्यामुळे मातीतून निघालेला सुगंध आता लगेच पाण्याबरोबर मातीत जिरत नाही. फुलांत स्थिर होतो. तरी पण अजूनही वसंतातल्याप्रमाणे वातावरणात फुलांचा सुगंध दरवळत नाही. पारिजातकाचा घमघमाट आश्विनातल्या रात्री

येऊ लागेल असे मात्र आता निश्चित वाटते.

सर्व ऋतूंचे सार या महिन्यात येते. वसंताचे पुष्पवैभव, ज्येष्ठाचे फलवैभव, श्रावणातला हिरवेपणा, आश्विनातली वातावरणाची खुलावट आणि धान्यलक्ष्मीच्या मंगलमय पावलांची चाहूल, हेमंतातल्या गार वाऱ्याच्या झुळका, शिशिरातली थंडीची लहर, सारे काही माफक प्रमाणात या महिन्यात अनुभवायला मिळते. श्रावणातल्या कुंद गारव्यात कोवळ्या उन्हाची ऊब मिसळत असते. जरा उन्हाच्या झळा वाढल्या की, जमिनीतून कधी कधी वाफाही येताना दिसतात. मधूनमधून पावसाच्या झडी आल्या तरी चिखल रपरपीत राहत नाही. तो दाट चिकट होत जातो. आणि मग लहानसहान गवते, अगदी नाजूक अंकुरासारखी जमिनीवरच सरपटत वाढणारी रोपटी, जी श्रावणसरींच्या माऱ्याने टिकू शकली नसती, ती आता निःशंकपणे जिथे खुली जागा असेल तिथे ऐसपैस उगवलेली दिसताहेत.

भाद्रपदातले माळरानाचे वैभव खरोखर अवर्णनीय असते. जरा मोठ्या बागबगीच्यातून दृष्टी काढून घेऊन जमिनीवरच्या सदा पायदळी तुडवल्या जाणाऱ्या या रोपट्यांकडे लावा. दुर्वांनाही आपण जपतो. पण ही क्षुद्र वनस्पती सृष्टी सदाच उपेक्षित! किती रंग भरले आहेत तिच्यात. अगदी लहानातल्या लहान वनस्पतीसुद्धा कशा बहराला आल्या आहेत. सणासुदीच्या प्रसंगी गरीबातल्या गरीब स्त्रियासुद्धा काचेच्या मण्यांचे का होईना पण दागिने घालून मिरवतात, जुन्या लुगड्याचाच का होईना पण लफ्फेबाज पदर काढून डौलाने चालतात, तसेच या गवती वनस्पतीचे आहे. ही पाहा माक्याची भुईसरपट झाडे. पांढऱ्या केसरमय फुलांनी भरून गेली आहेत. त्यांच्या शेजारी दुसरी अगदी तशीच पण अधिक लांबट निमुळत्या पानांची झाडे जमिनीवरच वेटोळी करीत पसरली आहेत. त्यांची फुले तर पांढरी आणि मोहरीएवढीच आहेत. पण आकार मात्र पाकळीपाकळीचा किती निखोड आणि फुलाचा अगदी पेल्यासारखा.

बाजूला खापरीची झाडे, मोठ्या लांबट आणि पसरट, किंचित काटेरी

पानांची पसरली आहेत. त्यांना एकेरी शेवंतीसारखी बारादळी पांढरट पिवळी पैशाएवढ्या आकाराची फुले आली आहेत. आणि हे जरा वीतभर उंच वाढलेले रोप पाहा. त्याच्यावर केसरांचा वाटाण्याएवढा जांभळा पुंजकाच फुलांच्या मिषाने उभा आहे. हे असेच दुसरे गवती फूल. चार पाकळ्यांचे, पेल्यासारखे, गोकर्णीच्या फुलाच्या आकाराचे. एक पाकळी गर्द जांभळी, बाकीच्या फिक्या. आणि या दोन्ही फुलांचा आकार केवढा म्हणाल तर माशी-एवढासुद्धा नाही. दुसरे एक तिळाचे निळे जांभळे फूल गोकर्णीपेक्षा जरा लहान असे दिसते. लांबट गोल हिरव्या पानांच्या पसाऱ्यात ते फूल फुग्याच्या फुलासारखेच दिसते. आकारही तसाच, पण एक पोकळी चोच फुटल्याप्रमाणे बाहेर पडलेली, लांबट आणि गर्द काळ्याजांभळ्या मखमली रंगाची. लहान मूल फुरंगटून वरचा ओठ बाहेर काढते तसेच वाटते हे फूल पाहून. आणि ही गवती भिंगरीची रोपे. त्यांना पाहा अगदी गोल आणि केशरी वर्णावर झुकलेली सहा दळांची पसरट फुले लागली आहेत. हे दुसरे तिळी गवत. त्याच्या लांबच लांब देठावर पांढऱ्या पाकळ्यांची मध्ये पिवळा परागपुंज असलेली फुले वाऱ्याबरोबर डुलताहेत. सोनावळीची फुले नुकतीच अधून-मधून डोकावताहेत. आश्विनात त्यांना अमूप बहर येईल.

ही दुसरी गवते पाहा. एकाला मोरपंखी तुरे आले आहेत, तर दुसऱ्याच्या अंगावर पोह्याची लेणी, तर तिसरे काटेरी चिकटे हिरवे तुरे धारण करणारे, तर हे सुगंधी. नागरमोथ्याचे गवत फुलांशिवाय नुसतेच पुंजक्यापुंजक्यांनी, पात्या दाट झालेले असे वाढले आहे. इतर गवती फुलांना नसलेला सुगंध आपल्या मुळ्यात भरून ते मातीत पुरून ठेवीत आहे. जणू काही कुणी चोरून नेईल तो ! फुलांचे लेणे घातले तर आपले सुगंधसंपत्तीचे रहस्य उघडे पडेल अशीच त्याला धास्ती वाटते जणू ! आणि गवतांची ही भाद्रपदी शोभा पाहूनच मला वाटते निसर्गाच्या कुशीत रमणाऱ्या वैदिक ऋषींनी गवताच्या प्रतिमेत विराजमान होणारी कृषिदेवता सीता पाहिली. गहू, तांदूळ, जव, राळे, सारे गवताचेच संपन्न आविष्कार वाटले त्यांना, आणि त्यांनी तिची

स्तोत्रे गाइली.

गवताकडून दृष्टी काढून आता इकडे तिकडे पाहा. ही तेरड्याची ठेंगणी ठुसकी झाडे कशी पांढऱ्या, तांबड्या, जांभळ्या, गुलाबी, किरमिजी रंगांच्या फुलांनी डवरून गेली आहेत. एका पिवळ्या रंगाशिवाय सारे रंग या फुलात आहेत. भाद्रपद गौरीची मूर्तिमंत प्रतिमा म्हणजेच ही झाडे. किती शोभिवंत ही फुले! उग्र आंबट पण जीवनाच्या उन्मादाने भरलेल्या वासाची, गवताच्याच गोतवळ्यात वाढणारी. तशीच ती हाताच्या पंज्यांसारखी पाच लांबट व कातरल्यासारख्या लाल शेंदरी पाकळ्यांची बचनागाची सुंदर फुले भुईवर इतस्ततः फुलली आहेत. कोकणात गौरीचे हातच समजतात त्यांना. उमलताना कुंकवाच्या रंगाचे, कोमेजताना हळदीच्या रंगाचे. आणि जरा वर दृष्टी फेका की तगरीची फुले दिसतील. आपल्या धवलकांतीने आणि पाकळ्यांच्या सुंदर मुरडीने तुमचे मन ती ओढून घेतील. वासही अति मंद पण हृद्य. आणि त्यांच्या बाजूला हे पाहा शंखासुराचे लाल पिवळे ताठ तुरे. फुलांच्या त्या लांब लांब मिशा पाहूनच का या फुलाला शंखासुराचे नाव मिळाले? आणि ही मोठी मोठी गडद लाल जास्वंदीची फुले कशी झाडावरून वाटेल तशी डौलाने लोंबताहेत. आणि ती सदा खाली तोंड करून वाकणारी आणि परागांची सोंड खाली सोडणारी झिपऱ्या जास्वंदीची छत्रीसारखी फुले. ही पिवळी कण्हेर आणि पिवळी रानभेंडी कुणाला माहीत नाही?

हे कसले झाड? अगदी कडुनिंबाच्या झाडासारखे. तशीच कातरलेली पाने, तशीच पण वाटोळीशी फळे. आणि तसेच निळेजांभळे सुंदर फुलांचे घोस. पहिल्याने मला वाटले की या दिवसांत निंब कुठून फुलला? आणि फुलला तर त्याचा सुवास कुठे गेला! माणसासारखी माणसे पाहून आपण फसतो. पण झाडासारखे दिसणारे हे झाड पाहून मात्र मी खरेच फसले. निरखून पाहिले तो ह्या झाडाची पाने निंबासारखी तडतडीत, चकचकीत व राठ नाहीत. मऊ व पातळ आहेत असे दिसले. पानांचे देठही निंबाप्रमाणे पिवळसर नसून जरा तपकिरी वाटले. मी चौकशी केली, तेव्हा कुणब्यांत त्या झाडाला गवंडा

हे नाव आहे असे कळले. निंबापेक्षा याची फुले जास्त मोठी आणि ठसठशीत असतात. निंबाची फुले सुगंधाने दरवळणारी, तर ही निर्गंध.

पांढऱ्या, पिवळ्या, किरमिजी फुलांनी दाट भरलेली ही गुलबाशीची झाडे, भर दुपारी आपल्या डोळ्यांसमोर फुलणारी. बाकीची फुले पहाटे किंवा संध्याकाळी लाजत लाजत फुलतात, केव्हा फुलली ते कळतही नाही. पण ही धिटुकली फुले मात्र भराभरा एकामागून एक पाहता पाहता फुलत असतात; अर्ध्या तासात शेदोनशे कळ्यांची फुले सहज होतात. भाद्रपदातल्या फुलांत मुलींची अत्यंत आवडती फुले असतात ती. त्यांच्या लांबसडक मऊ देठांची वेणी किती सहज गुंफता येते. फुलांच्या वेण्या करण्याची पहिली संथा मुलींना ही फुलेच देतात. आणि ह्या पाहा रंगी बेरंगी कर्दळी, पुष्पगुच्छ मस्तकावर घेऊन कशा ऐटीत उभ्या आहेत.

पण ह्या रस्त्यात गळून पडलेल्या पिवळट तपकिरी केसाळ मखमली जाडसर पात्यांच्या मुचकुंदाच्या फुलांकडे कसे कुणाचे लक्ष जात नाही ? पावसाच्या माऱ्याने ही फुले उंच झाडांवरून खाली गळून पडली आहेत. वीतभर लांब फूल, आत पांढरे आंतरपुष्प. दिसायला एकंदर फूल काही आकर्षक नाही. पण याचा वास किती गोड ! बाहेरच्या राकट पाकळ्याही सुगंधाने थबथबलेल्या आहेत. पुष्कळ बायकांना हे फूल डोकीत कसे घालावे तेच कळत नाही. याच दिवसांत येणाऱ्या केवड्याच्या तऱ्हातऱ्हा करून आम्ही डोकीत माळतो. पण मुचकुंदाचे फूल मोडून त्याच्या बाहेरच्या जाड पाकळ्याच बहुधा केसांत खोवतात. पण काही तास सुक्या कपड्यात गुंडाळून ठेवून पात्यांचा ताठपणा गेला की मग त्या पात्या वर्तुळाकार एकमेकीत गुंतवून त्यांची दोऱ्यांत गुंफून वेणी केली, तर ती खरोखरच सोन्याच्या कड्या एकमेकीत गुंफल्यासारखी दिसते. ती गुंफायला कौशल्य लागते. मुंबईच्या खत्री स्त्रियांचे ते वैशिष्ट्य आहे. पण अभ्यासाने ते कुणालाही येण्यासारखे आहे. बकुळी – केवड्याप्रमाणेच मुचकुंदाचा केसांना लागलेला सुगंध दिवस दिवस टिकतो.

भाद्रपदात नुसती फुलेच नाहीत तर कोवळी फळे आणि शेंगाही

झाडांवर दिसतात. फळे म्हणजे शरदऋतूचा सुफलतेचा आविष्कार. ही पाहा डाळिंबी. लालबुंद फुले आणि छोटी शोभिवंत गोल फळे तिच्यावर एकदम लहडली आहेत. तशीच ती पांढऱ्या वाटोळ्या पाकळ्यांची नाजूक केसरांनी भरलेली पेरूची सुंदर फुले व लहान हिरवी फळे. तसेच ही फिक्ट पिवळ्या रंगाची, नयनरम्य, उग्र वासाची पपईची फुले आणि ती लहान कठीण फळे. सीताफळीची आंबट ओल्या वासाची हिरव्या चाफ्याच्या फुलांसारखी फुले आणि खवल्याखवल्यांची शोभिवंत चिमुकली फळे. शेवग्याची झाडे पांढऱ्या शुभ्र पुष्पगेंदानी खच्चून भरली आहेत, कोंवळ्या शेंगा लोंबताहेत आणि फुलांवर काळे भुंगे रुंजी घालताहेत. या फुलांवर हे भुंगे जसे लुब्ध आहेत तसे दुसऱ्या कुठल्याही आसपासच्या फुलांवर असलेले मी अजून पाहिले नाहीत. आंब्याच्या मोहोरावर वसंतकालीसुद्धा मुंबईत तरी निदान भुंगे मी कधीच पाहिले नाहीत. पण शेवगा फुलू दे की ते आलेच धाऊन. गुलमोहोराच्या झाडावरही हिरव्या तरवारी लटकताहेत. आणि ज्याचा, पान आणि पान खुडलेले असताना फुलांचा बहर आषाढात उतू जात असतो त्या पांढऱ्या खुरचाफ्याची फुले अजूनही झाडावर पर्णसंभारात गुरफटलेली रेंगाळताहेत. जणू ते या झाडाचे डोळेच असावे. सासरी जाता जाता मागे वळून आपल्या माहेरच्या गोतवळ्याकडे वारंवार बघणाऱ्या ग्रामकन्येसारखे हे झाड आता वाटते आहे.

लाकडाची फुले ! कुणी पाहिली आहेत ? सुक्या फळीच्या अंतरात का कुठे फुले निर्माण करील असा ओलावा असतो ? पण आजूबाजूचे सारे हिरवे हिरवे पुष्पमंडित वनस्पतींचे जग पाहून श्रावणात दगडांनी शेवाळांच्या शाली पांघरल्या आणि ही पाहा सुताराने तासलेली पाण्याच्या पिंपावर झाकण घातलेली देवदाराची फळी. किती दिवसांत ऊन नाही. वातावरण कसे सर्द आणि कुंद झाले होते. श्रावणभर ओलाव्यात राहून हिच्यावर बुरशीसारखे पांढरे डाग आले; मग त्यांचे मोहरीएवढे पांढरे कळकट दाणे झाले. मी ती फळी धुणार, तो काय चमत्कार ! त्या मोहरीच्या दाण्यातून

एक अतिसुंदर पाकळी पांढऱ्या तपकिरी मखमलीसारखी दिसू लागली. माझे मन मोहित झाले. वाटले की पावसाळी भूछत्रांसारखे काही तरी उगवत असेल. बुरशीचीच मौज काही दिवस पाहावी म्हणून ती फळी मी तशीच ठेवली. रात्रंदिवस तिच्यावर पाणी सांडे आणि पाचसहा दिवसांत ते पांढरे मळकट दाणे फुलले, पसरले. मध्ये दाट तपकिरी छटा फुलाच्या परागांची असावी तशी आणि आजूबाजूने नाजूक फाळ ओढल्यासारख्या रेषांच्या अलग अलग पाकळ्या; काही पसरट, काही निमुळत्या, काही मोठ्या, तर काही लहान. प्रत्येक फुलाचा आकार वेगळा. कडेला पांढरा होत गेलेला. पण प्रत्येक पाकळीतले ते रेषांचे नाजूक नक्षीकाम खरोखरच अव्वल दर्जाच्या कलाकृतीत मोडण्यासारखे होते. आणि मी एक गंमत पाहिली की जेव्हा या फुलांचे चित्र काढून त्याचा भरतकामात उपयोग करावा म्हणून ती फळी मी बाजूला काढून ठेवली तेव्हा संध्याकाळपर्यंत ती फुले कोमेजली. फिरून मोहरीएवढे गोळे झाले. आणि फिरून फळीं पाण्यात बुडवली तर दोन तासांत जपानी कागदी फुले पाण्यात फुलतात तशी ती फुलली होती. ही फुले सूर्याभिमुखी असतात, रात्री मलूल होतात, दिवसा मात्र टवटवीत. कोकणातल्या कुणबी लोकांना तिथल्या अतिवृष्टीमुळे ही फुले परिचित आहेत. 'लाकडाची फुले' हे त्यांनीच दिलेले नाव.

दुसरा एक भाद्रपदातला अति मनोहर नैसर्गिक कलाविष्कार मी पाहिला तो नेच्याच्या रांगोळीचा. नेच्याची झाडे स्वभावतःच मनोहर, किती तऱ्हेची ! भुईसरपट पसरलेला तळहाताएवढाच पदकाच्या आकाराचा हिरवा तुकडा मला दिसला. या दिवसांत अनेक वनस्पतींच्या मंडलाकार रांगोळ्या जमिनीवर पसरलेल्या असतात. पण हिची शोभा काही न्यारीच. जरा सुद्धा रेखाप्रमाणात बदल नाही. मध्यावर तांबूस मोठा ठिपका. मध्ये लहान, कडेला रुंदावलेली, दोन्ही बाजूला हिरवी, मोहरीच्या आकाराची पाने धरलेली, अशा चोवीस नाजूक शाखा निघालेल्या दिसल्या. प्रत्येक शाखा अलग असली तरी दुसरीला चिकटून उभी आणि चुकून मध्ये कुठे फट राहू नये म्हणून पाच-

सहा लहान बारीक उपशाखा. या नेच्यांतले ते आकृतीचे सौष्ठव आणि दाणेदारपणा पाहून भाद्रपदातल्या गौरीगणपतींच्या पुढे निसर्गाने ही सुंदर रांगोळीच घातलीसे वाटले. या दिवसांतला चिखल जरा घट्ट आणि चिकट पण मऊ. खडेही धुतलेले स्वच्छ. तेव्हा याच दिवसांत जीवनसृष्टीचा आधार असलेल्या त्या ओल्या धरित्रीचा किंवा मातीचा गोळा घेऊन त्याचा गणपती करावा; तेरड्यांच्या किंवा खड्यांच्या गौरी कराव्या आणि सारी पाने फुले त्यांना अर्पण करावी. हा भारतीयांचा विधी म्हणजे निसर्गाच्याच या विविध आविष्कारांचे रूपक नाही तर काय ?

हा पाहा हादगा. पानोपानी कारंजीच्या आकाराच्या सुबक मोठ्या पांढऱ्या कळ्यांनी भरून गेला. हस्तनक्षत्र लागले वाटते ! अगस्त्याचा उदय झाला की कळ्या फुलतील, आणि भाद्रपदाचा हात धरून ही ‘ पोपटाची फुले ’ त्याचे विसर्जन आश्विनात करतील. आश्विनाच्या पताकाच आहेत ह्या.

भाद्रपदाचे नाव सार्थ करण्यासाठी आषाढात लुप्तप्राय झालेल्या रंगी-बेरंगी पाकोळ्यांनी पुन्हा परतून आपली नाचरी पावले ठेवण्यास सुरुवात केली. आश्विनाचे स्वागत करण्यासाठी त्यांचा वाढता गोतवळा स्वच्छंद व चोहीकडे वावरतो आहे. पाखरांची घरटी मोडून पडू लागली. ती बाहेर येऊन मिळेल ते खाण्यासाठी धडपडू लागली. कावळ्यांची नवी पोरे आई-बापांच्या देखरेखीखाली झाडावरून खाली उतरून उडायला, स्वतंत्र संचार करायला शिकताहेत. त्यात कुठे पाय दगावला, तर मग सारे आप्त त्या पोराला टोचतात आणि त्याला मृत्यूच्या द्वारी लोटून देतात. कावळ्यांच्या या उड्डाणविद्येच्या इतिहासाखेरीज भाद्रपदाची कहाणी पुरी होत नाही. आश्विनात सारी सृष्टी सुफळ, कर्ती सवरती झालेली असते, पूर्ततेचा एकच ध्यास आश्विनाला असतो, तर संगोपनाचा भाद्रपदाला.

# सोनेरी
## आश्विन

भाद्रपद सरला. नक्षत्रांचे तेज आश्विनात झळाळू लागले. अधूनमधून मेघांचे आवरण आले तरी त्याची शोभा वाढतीच आहे. विशेषतः उगवत्या आणि मावळत्या नक्षत्रांचे दर्शन काही निराळेच वाटते. हादग्याची फुले म्हणजेच अगस्त्याची पार्थिव निशाणी. आश्विन लागला आणि पानोपानी हादगा फुलला. कारंज्याच्या आकाराच्या आपल्या चिमुकल्या मुठी त्या झाडाने उघडल्या आणि आश्विनाचे रहस्य खुले केले. हात पसरून धरणीकडे धावत येणाऱ्या सुफलतेचेच रूपक म्हणजे हे हादग्याचे झाड, असे मला वाटते. वास मंद पण हृद्य; रूपही इतर फुलांपेक्षा वेगळेच. झाडाची पाने बारीक पण फुले मोठी असून नाजूक डोळ्यांना आनंद देणारी, भुकेची तृप्ती करणारी. धान्यलक्ष्मीचा, अन्नपूर्णेचा हा पुष्पमय आविष्कार महाराष्ट्राच्या संस्कृतीत विशेष महत्त्व पावला आहे. अगस्त्य मुनींनी वैदिक प्रथेचे लावलेले रोप अवैदिक महाराष्ट्रात जगले व वाढले. त्याचीच ही खूण, महाराष्ट्राला अखिल

भारतीय विचारधारेत सामावून घेणारी ही निशाणी. किती तरी अर्थ भरला आहे या झाडाच्या मागे. हादग्याच्या गाण्यांची परंपराच याची साक्ष आहे. अगस्त्याची पाने लहान पानांचीच झालेली मोठी गुलमोहरासारखी जोडपाने. पानांच्या हिरव्या हातांनी हे झाड वर्षाराणीला निरोप देत असते. आणि फुलांच्या उमलल्या हातांनी आश्विनाला कुरवाळीत असते.

पश्चिमेकडे नक्षत्र झुकले की त्याचे तेज जरा मंद होते; किंचितसा तांबूसपणा त्याच्यावर चढतो. तोच पाहायला मला फार आवडते. आकाशभर लखलख करणाऱ्या सोनेरी-रुपेरी तारकांत तांबूस तारे जरा मंद पण निराळेच दिसतात. मंगळाचाच गोतवळा जणू. एरवी मंगळापेक्षा वेगळ्या रूपाची नक्षत्रेही त्याच्याच रंगाची थोडा वेळ तरी होतात हे पाहून मौज वाटते. एवढा मोठा शुक्र, स्वतःच्या दिव्य प्रभेने युक्त असा; एरवी कुठल्याही ग्रहापेक्षा आपल्या झगझगाटाने व मोठ्या आकाराने कुणाचेही मन खेचून घेणारा हा सायंतारा, क्षितिजाचीच चिरसंगती धरणारा; पण आपल्या तेजाने आकाशाच्या मध्यापर्यंत असणाऱ्या सर्व ग्रहांना, ताऱ्यांना फिका पाडणारा हा ग्रह, पश्चिमेला अधिकाधिक कलंडताना जरा तांबूस झालासा वाटतो. पेंगू लागतो. आपले वेगळेपण तो विसरतो. तेज आखडून घेतो. इतर चांदण्यांबरोबर मिसळून जातो; आणि असा मिसळता मिसळताच एकदम दृष्टीआड होतो. सूर्याचा अस्त संध्याकाळीं नेहमीच विलोभनीय असतो. पण शुक्राचा रात्रीच्या पहिल्या प्रहरी होणारा अस्त, हा निसर्गाचा एक लहानसाच पण मोठा हृद्य आविष्कार आहे. शुक्र मंदावतो आणि पूर्वेकडून दाटीदाटीने आकाशात येणाऱ्या नक्षत्रांचे तेज खुलते. उत्तरेचा अगदी लहान ध्रुव सुद्धा नजरेत भरू लागतो. रात्रभर क्रमाक्रमाने ध्रुव, सप्तर्षी, शर्मिष्ठा, ध्रुवमत्स्य या मोठ्यामोठ्या तारकापुंजांना आपल्याभोवती फिरायला लावतो. लहान बालका-भोवती मोठ्या माणसांचा गराडा पडला तरी मूल जसे त्यांच्याहून वेगळे पडते, त्याची शोभिवंत छबी जशी खुललेलीच राहते, तसेच या ध्रुवाच्या ताऱ्याचे होते. कदाचित त्याच्या अढळपणाचा आणि त्याची ती अतिसुंदर

कथा लहानपणीच आपल्या मनावर ठसल्याचाही हा परिणाम असावा. तो कधीच भडक वाटत नाही. उगवणे, मावळणे इतरांसारखे त्याला माहीतच नाही. अंधार झाला की तो उगवला असे समजायचे. फटफटले की तो मावळला असे म्हणायचे.

भाद्रपद सरला आणि आश्विनाची वातावरणाची खुलावट वाढीस लागली. ढग अजूनही आकाशभर रेंगाळत असले, बहुरूप्यासारखी वर्षाकाळची काळी सोंगे त्यांनी आणली, एखाद्या दिवशी खूप गरजले गाजले, बिजलीच्या नागिणी कडाडत त्यांनी भूतलावर सोडल्यासारख्या केल्या, तरी देखील निसर्गाने वर्षाकाळचा धुरकट पडदा दूर करण्यास सुरुवात केली आहे. दररोज ढग विरळ व पांढरे होताहेत. चित्रेचे ऊन्ह ढगाआडूनही आपला प्रभाव दाखवते आहे. आश्विनाचा उष्मा दुपारी जाणवतो आहे. ग्रीष्मासारख्या झळा येताहेत. रस्त्यावर, खुल्या मैदानात ऊन्ह पडले की मृगजळे लाटांलाटांनी धावताना दिसताहेत. निरभ्र दुपारी घरांच्या कौलांवरूनही मृगजळाच्या मंद व सूक्ष्म लाटा खाली कोसळताहेतशा वाटतात. आश्विनातली सकाळ लांबते आणि दुपार मात्र किती छोटी. दोन अडीच वाजताच उन्हाचा कडाका एकदम आखडतो. पाच वाजताच सांजावते आणि साडेसहा वाजता रात्रीची चाहूल लागते. लांबच लांब रात्री होताहेत. आश्विनात उन्हाचा रंग पिवळा धमक झालेला जाणवतो. रात्रीही सबंध पावसाळ्यात झाकल्या गेलेल्या चांदण्या तोंड पसरून हासतात. हेमंतात चांदणीचांदणीचा रंग वेगळा वाटतो. पण आता बऱ्याच दिवसांनी झालेले हे नक्षत्रांचे दर्शन नव्यासारखे वाटते. सोनेरी छटांचीच बरसात हे नक्षत्रपुंज करताहेतसे वाटतात. भाद्रपदातल्या हिरव्या, रुपेरी छटा अजूनही दिवसा ढगांच्या सावल्यामुळे रेंगाळताना दिसतात. निसर्गातला हिरवेपणा अजून ताजा आहे, तरी त्यावर पिवळा मुलामा चढू लागला आहे. ही पाहा गुलमोहोराची झाडे. त्यांच्यांत पाहा पिक्या पानांचे सोने पिकले आहे. आभाळ आले असले तरी गुलमोहोरातल्या या पिवळ्याधमक छटा उन्हाची तिरीप पडावी तशाच दिसतात. पिकताना,

गळतानाही सोनेरी स्मित ही पाने करतात. तसेच पिंपळाची पावसाळ्यात धरलेली पाने केव्हाच जून होऊन पिकुटली आहेत. पण त्यांना गुलमोहोराची शोभा नाही. पिवळे कबरे ठिपके त्यांच्यावर पडले आहेत. सळसळ मंदावली आहे. गुलमोहोराची, शेवग्याची बारीक पाने अगदी आवाज न करता खाली पडतात. एका अहिरी लोकगीतात बाभळीच्या गळत्या पानांचे सुंदर वर्णन आहे. 'बाभळीची पाने गळताहेत पण ती पाने नसून मोत्याचे दाणेच आहेत असे वाटते.'

पानामें पाना बंभुरस पाना ।
एक एक पाना गिरे मोतियन दाना ।

गुलमोहोर शेवग्याची पाने गळताना पाहून तसेच वाटते. हेमंतात तर ही पडझड खूपच होते. जणू काही मण्यांचे विरळ पडदेच झाडापासून जमिनी-पर्यंत नवे नवे असे लोंबताहेत. त्या पानझडीची सुरुवात आताच कोठे सुरू झाली आहे. हा पिंपळ पाहा, वड पाहा, नाही तर आंबा, अशोक पाहा. सारी झाडे पावसाळ्यात हिरवी दिसत होती. पण पावसाळा गेला आणि तो पोषाखही त्यांनी बदलायला सुरुवात केली. पावसाळ्याचा साज वेगळा. तो उष्टा साज शरदतूला चालणार नाही. प्रत्येक ऋतू नवीन रूप सृष्टीला देत असतो. कुणी तिला लेणी चढवीत असतो, तर कुणी ती काढून तिच्या परम गंभीर नग्नतेचे दर्शन देत असतो, जसे साज क्रमाक्रमानेच चढतात व उतरतात; तसेच नग्नतेचे आहे. एकेक शृंगार उतरून सृष्टीच्या गाभ्याचे दर्शन आपण घेतो. खूप नटण्याचे आणि अजिबात न नटण्याचे, प्राकृतिक साधेपणाचे रहस्य अंती एकच आहे, हेच ऋतू शिकवतात. निर्मिती, वाढ, पूर्णता आणि विनाश आणि विनाशातूनच फिरून उत्पत्ती, हे चराचराच्या अस्तित्वाचे रहस्य हरघडीला प्रत्येक ऋतू आपापल्या रंगीत लिपीत लिहून दाखवतो. धुळींत, खडकावर, आकाशात, झाडापानांवर, पशूंच्या पक्ष्यांच्या अंगाअंगांवर, कीटकांच्या पाठीवर, ते निरनिराळ्या रंगांत व हजारो आकृतींनी ही रेषामय लिपी लिहितात; समुद्रांच्या, नद्यांच्या व तळ्यांच्या पृष्ठभागांवर तरंगाची लिपी

लिहितात. मानवाने हे हरघडीचे ताजे नवल पाहावे म्हणून पाने सळसळतात; वारे वाहतात; धूळ वर उडते; माती रूपे बदलते; पाण्यातले तरंग वाटोळे होत होत फुटतात; लाटा घोष करतात; पाखरे किलबिलतात; पाकोळ्या व चितूर भिरभिरतात; पतंग दिव्यावर जाळून घेतात; भुंगे गूंगूं करतात; फुले रंगांनी नटतात, गंधाची बरसात करतात. रसमय आणि रसहीन जीवनाचे सारे सारे आविष्कार आपल्या भोवतीच सृष्टिमाता प्रत्यही उवडे करीत असते. "माझे भांडार कधी कधी रिते नसते. डोळ्यांनी पाहा, कानांनी ऐका, मला हुंगा, जिभेने चाखा, हातांनी लुटा, पायांनी हवे तर तुडवीत जा." असेच जणू ती हमेशा सांगत असते. आणि तिची ही भाषा वसंतात व आश्विनात दयाळ पक्षी बोलू लागला की जितकी जाणवते तितकी इतर वेळी जाणवत नाही. चिमणीहून मोठ्या वाटोळ्या गरगरीत पोटाचा, काळ्या तुकतुकीत रंगाचा, शेपटाजवळून दोनच पांढरी पिसे असणारा हा सुंदर दयाळ पक्षी झाडावर येऊन बसला आणि आपले ते कारुण्य व आनंद यांनी काठोकाठ भरलेले एकाच तानेचे गीत गाऊ लागला की मी सारे विसरते आणि सारे काम टाकून तो कुठे बसला आहे ते पाहाते. कोकिळा कुहू कुहू करू लागली की आपल्याला स्वाभाविकच तिची नक्कल करावीशी वाटते. पण दयाळाचे तसे नाही. त्याने बोलावे व ते स्तब्ध होऊन आपण ऐकावे, असेच नेहमी घडते.

दयाळाच्या बोलक्या सादीने जे वाटते तेच आश्विनात बगळ्यांचा रांगेत उडणारा थवा पाहिला की वाटते. पावसाळ्यात कोंडून एका झाडावरच डांबलेली जवळजवळच हिंडणारी ती पाखरे फिरून मुक्त मनाने आकाशात दूरदूरच्या पण ठराविक ठिकाणी उडायला निघतात. सकाळी पूर्वेला सूर्यबिंब वर येण्याच्या आधी ढगांनी शेंदरी सोनेरी रंग पांघरले की, बगळ्यांचा म्होरक्या झाडावरून आरोळी फोडून उड्डाण करतो. लगबगीने पंचवीसचाळीस बगळे, एकामागून एक असे त्याच्या पाठीमागून एकाच्या शेपटीला दुसऱ्याचे तोंड लागेलसे वाटावे, अशा तऱ्हेने आकाशात उंच उडू लागतात. त्यांच्या साखळीचे आकार कधी अर्धत्रिकोणासारखे, तर कधी उभी रांग, तर कधी

आडवी रांग असे दिसतात. शरदतूत जलाशयात कमळे व आकाशात सकाळी आणि संध्याकाळी ही फुलाप्रमाणे वाटणारी पांढरी शुभ्र पाखरे दिसतात. संध्याकाळी परतून येतानाही तीच शिस्त, तीच ओढ त्यांच्यात दिसते. बगळे म्हणजे तृप्तीचे मूर्तिमंत प्रतीक. बगळे उडू लागलेले दिसले, की पावसाळ्यात ठेंगणे झालेले आकाश फिरून उंच गेलेसे वाटते. श्रावणाच्या भरात धरणीच्या हिरव्या कडांवरच खिळलेले डोळे आता दूरवर खुललेला सृष्टीचा पसारा पाहू लागतात. जग विशाल दिसते.

बगळे तर हा हा म्हणता नजरेआड होतात आणि इकडे सूर्यबिंब पण पूर्ण उगवलेले असते. त्याचे ते नाचरे लाल पिवळे रंग जाऊन एकच एक सोनेरी रंगाचा तो परिचित सूर्य आपल्या किरणांनी दिसेल ते कवटाळीत सुटतो. अशा वेळी थोड्या वेळापूर्वी होते तसे क्षितिजाजवळ पाहण्यासारखे आता काहीच राहिलेले नसते. तेव्हा क्षणभर मन शून्य होते आणि नजर हाताच्या अंतरावरील नेहमीचीच दृश्ये टिपू लागते. हे पाहा पेरूचे झाड. पाने काही दाट नाहीत त्याची. सकाळच्या वेळी ऊन खाण्यासाठी तीन कावळे त्याच्यावर बसले आहेत. तिन्ही एकाच आकाराचे आहेत. पाहा ते कसे काव काव ओरडताहेत. पण हे काय ? त्यांचे आवाज पाहा शेवग्याच्या झाडावरच्या कावळ्यापेक्षा कसे बसके व घोगरे येताहेत. आवाजाचा पल्लाही आखूड आहे. आणि त्यांच्या चोचींच्या कडेला पाहा कसा गुलाबी मांसाचा मिऱ्याएवढा गोळा चिकटलेला दिसतो आहे. आणि त्यांनी तोंड उघडले की आतली जीभ व टाळाही कसा तसाच भडक गुलाबी दिसतो आहे. काळा आणि गुलाबी रंग क्वचितच एकत्र खुलतात. या कावळ्यांची तोंडेही जरा विद्रूपच दिसतात. इतर कावळ्यांतला तरतरीतपणा त्यांच्यात नाही. त्यांचा रंगही पाहा कसा अजून भुरका वाटतो आहे. चोची फुगीर ओल्या दिसताहेत. वाढलेल्या कावळ्यांच्या चोची आतूनबाहेरून काळ्या. जीभ जांभुळकी. पण हे अजून तान्हेपणातून पूर्ण बाहेर न पडलेले पण स्वतःच्या पोषणाची जबाबदारी स्वतःवरच पडलेले जीव. इतर कावळ्यांपेक्षा या पोरांची बुबुळे

भराभर पांढरी होत असतात. त्यामुळे ती अधिकच भाबडी वाटतात. ती चोची झाडाच्या फांदीवर मोठ्या कावळ्यांप्रमाणेच घासू पाहतात. पण अजून त्या कृतीत सफाई व डौल आलेला नाही. ती उडतात तीही जवळजवळच. फांद्यांना धरताना त्यांचा तोल अजून पुरा सावरत नाही. टुणटुण उड्या मारतानाही ती पोरे बोजड दिसतात. आईबाप कुठे केव्हाच पसार झाले. तेव्हा ही तीन भावंडेच एकमेकांना संभाळून असतात. केव्हाही पाहा तिघे एकत्र. कावळ्यांबरोबरच जन्माला आलेली चिमण्यांची पोरे, आता वाढलेल्या चिमण्यांच्या मेळाव्यात केव्हाच सामावली. किती भराभर वाढतात ती. पण कावळ्यांचे तसे नसते. कावळ्यांची पोरे सावकाश वाढतात. त्यांचे प्रेमाराधनही फार उशीरा सुरू होते आणि त्यांचा प्रणय चोचींनी गंभीर मुद्रा करून आळीपाळीने एकमेकांची डोकी खाजविण्याचा किंवा घास भरवण्याचा सोडला तर इतर पाखरांपेक्षा फार शालीन असतो. त्यांचे मीलन इतरांच्या दृष्टीस क्वचितच पडते. मार्गशीर्षापासून त्यांच्या जोड्या जमतात. जुने कावळे अगोदरच या विद्येत प्रवीण असतात. पण नवी जन्मलेली पोरेही त्या वेळी सहा महिन्यांत पूर्ण वाढ होऊन विचकत विचकत आपली नाती जमवतात आणि मग निसर्गाच्या सहज प्रेरणेने लवकरच एकमेकात पूर्ण रंगून जातात. जाणती होतात.

आश्विन हा पूर्ततेचा महिना. पिवळ्या धमक उन्हात झाडापानांचे, फुलांचे रंग कसे जितके गर्द आणि पूर्ण खुलायचे तितके खुलताहेत. प्रत्येक रंगाची छटा फुलाफुलांतली सुद्धा वेगळी उठून दिसते आहे. झेंडूची फुले पाहा कशी ठिकठिकाणी कुठे एकेरी, तर कुठे गरगरीत चेंडूसारखी फुलली. कोकणात कुणबी त्यांना मखमलीची फुले म्हणतात, तर देशावर गेंदाची. आश्विनाचा मुकुटमणी जो दसरा त्याची सजावट तर झेंडूशिवाय होतच नाही. ‘फुललंय झेंडू, भरलंय पाव्या’ ही एका आगरी कुणब्याच्या गीतातली ओळ, दसऱ्याच्या दिवशी नेहमी माझ्या मनात घोळत असते. देशावर मांगांच्या एका कहाणीत शेषाच्या मस्तकावरचे गेंदफूल शेषकन्या उलूपी हिच्यावर

लुब्ध झालेल्या अर्जुनाने कृष्णाच्या सांगीवरून तोडून आणले. आणि दुसऱ्याच्या दिवशी त्याने या प्रतिज्ञेची पूर्तता करून उलूपीशी लग्न लावले. तेच ते गेंदफूल आता दारोदारी फुलते आहे. तोरणातोरणांत झुलते आहे. पारिजात स्वर्गातला तर झेंडू पाताळातला. देशावर तरवडीच्या पिवळ्या साध्या निर्गंध फुलांशिवाय नवरात्रात घटांची पूजा कुणब्यात पूर्ण होत नाही, हे समजल्यानंतर आजूबाजूला पाहिले तो खरेच तरवडीची झाडे पिवळ्या बहराने नटून गेली होती. मुंबईतसुद्धा पाहा! रस्त्यावरचे ऑस्ट्रेलियन तरवडीचे प्रचंड वृक्षही याच सुमाराला एकामागून एक फुलताना दिसतात. आपट्याच्या झाडालाही जांभळ्या गुलाबी आणि पांढऱ्या फुलांचा भर येतो आहे. हा भर दहापंधरा दिवसांवर टिकत नाही.

भाताच्या शेतांचा रंग पाहा कसा पिवळा पडला आहे तो. आश्विनात एखादी पावसाची झड आली की दुसऱ्या दिवशी दुपारी उन्हात भाताच्या शेताजवळून जा. भाताचा सुवास वातावरणात कोंदलेला आढळेल. या दिवसांत मुंबई ते कल्याण एकदा तरी मी जाते. आणि ठाणे ते मुंब्रा, भातशेते रेल्वे-लाईनजवळ पसरलेली असतात, त्यांचा दरवळणारा गंध गाडीत बसूनच हुंगण्याची मजा अनुभवते. वळवाचे पाऊस आले की मातीचा सुवास जसा उत्तेजक वाटतो तसाच हा शेतातल्या भातांचा गंध. आश्विनात हा पाहा, दारातल्या मोहरीच्या झाडांना कसा बहर आला आहे. चार दळी पिवळे धमक लहान फूल, किती नाजूक आणि गोड सुवास आहे त्याचा. जवळ जाऊन हुंगल्या-खेरीज काही उमगायचा नाही. मोहरीच्या तिखट झाडाला, निंबाच्या कडू झाडाला इतक्या अवर्णनीय गंधाची देणगी देणाऱ्या सृष्टीची समता व योजकता पाहून मन गुंग होते. मुंबईतील ही मोहरीची झाडे फुललेली पाहिली आणि कित्येक वर्षांपूर्वी छत्तीसगढात बिलासपूर जिल्ह्यातील एका जंगलातल्या शेतातला एक अविस्मरणीय देखावा माझ्या डोळ्यांपुढे नाचू लागला. मोहरीचे शेत फुलून पिवळे जर्द झाले होते. वारा आला की पिवळ्या रंगाच्या लाटा नाजूकपणाने शेतभर हालत आणि मग त्यांतून पाचूसारखी

खालच्या पानांची छटा दिसे; एवढेच नाही, तर निळ्या सुंदर रंगाची लहान फुलपाखरे असंख्य अशी त्या फुलांवर झेपावत होती. खाली फुलांच्या पिवळ्या लाटा, वर फुलपाखरांच्या निळ्या लाटा असा तो देखावा दिवसभर मी पाहातच बसले होते. वाऱ्याच्या झुळकांबरोबर फुलांचा सुवासही उसळून येई. वाटे की प्रत्येक वेळेला हा वास काही निराळाच येतो आहे.

तशीच ही निरगुंडीची फुले दारात फुलली आहेत. त्यांचे ते निळेजांभळे तुरे किती शोभिवंत दिसताहेत. वासही उग्र असला तरी अप्रिय वाटत नाही. मेंदीही भराला आली आहे. आपले सुवासिक शुभ्र तुरे लेवून तीही आश्विनाच्या शोभेस पूर्णता आणीत आहे; आणि ही मधुमालतीची वेल आपले ते गुलाबी गेंद अंगावर लेवून डुलते आहे. शेवंतीची पिवळी फुले म्हणजे तर शरदृतूची पायघडीच. आश्विन मध्यावर आला तरीदेखील अभ्रे मधून-मधून आहेतच. कोजागिरीची पौर्णिमा. पण ही पाहा ढगामुळे मधूनमधून भाद्रपदी नारळीपौर्णिमेसारखी वाटते आहे. हे शरदृतूतले पूर्ण चंद्रबिंब ढगाआड लपल्यामुळे पाहा कसे पोपटी दिसते आहे. ढगही रुपेरी झाले आहेत.

समुद्राचा रंगही आता बदलला, नेहमीसारखा झाला आहे. निळानिळा पाण्यावरचा फेस कमी झाला आहे. दिवसा सूर्यफुले फिरून पाण्यावर चमचम करू लागली आहेत. रात्री पौर्णिमेला चंद्रफुले, चंद्र ढगांआडून बाहेर आला की पाण्यावरती नाचताहेत.

# संध्यारंजित कार्तिक

आश्विन संपला आहे. ठिकठिकाणी साचलेली लहान तळीं उन्हाच्या वाढत्या माऱ्याने, वाऱ्याच्या अखंड वाहत्या झुळकांनी थरथरू लागली आहेत. संकोच पावून नाहीशी होऊ लागली आहेत. ती पांढरी, गुलाबी कमळे आणि ती मोठाली वाटोळीं कमलपत्रे आता नावालाच कुठे कुठे दिसताहेत.

आश्विनात जातो जातो म्हणून हुलकावणी दाखविणारी अभ्रे अजूनही आकाशात वेळी अवेळी येतात. अभ्रे दाटली की ती आकाशाला खाली ओढतात; पण आता ढगांचे पांढरे पुंजके खांद्यावर घेऊनच जणू काही आकाश वर उंच उभे असल्यासारखे वाटते. खोडकर पोरे पायाला झोंबली की, वत्सलतेने मोठी माणसे त्यांना वर उचलून घेतात, तशीच ढगांच्या भाराने वाकणारी, पावसाळ्यात त्यांच्याच तंत्राने अहर्निश चालणारी आकाशदेवी — ती अदिती — आता हसत हसत त्यांना आपल्या काबूत ठेवते आहे. पळवून लावते आहे. आणि ढगही उजळ हसरी तोंडे करूनच हुलकावण्या देत पळून जाताहेत.

विरळ होत चाललेल्या कापसाच्या ढिगाऱ्याप्रमाणे फुललेल्या त्या शुभ्र अभ्रखंडांची शोभा या कार्तिकात नुसती उतू जात असते. एरवी ते कुठे असोत वा नसोत, पण सकाळी सूर्योदयाच्या वेळी पूर्वेला ते अचूक हजर असतात आणि संध्याकाळी पश्चिमेला. या महिन्यात या ढगांमुळेच संध्यारागांना अपूर्व खुलावट येते. संध्याकाळी पंधरा मिनिटे, फार तर अर्धा तास, सूर्य बुडू लागला की ही अभ्रखंडे एकदम सोनेरी होतात. किती सोनेरी व तेजस्वी म्हणून सांगू ! मावळत्या सूर्याचा लाल गोळा झगमगीत सोन्याच्या ढिगात ठेवल्यासारखे वाटते. पण हे सोने ढिगासारखे असूनही वाहते आहे. त्याचे प्रवाह त्या ढगांच्या पुंजक्यातून अनिर्बंध धावताना दिसताहेत आणि क्षणात पाहा ! त्या तांबड्या गोळ्याचा रंग, तो बुडताना साऱ्या ढगात जणू विरघळून गेला आहे. तांबड्या रंगाच्या साऱ्या छटा लाल, शेंदरी, गुलाबी आणि किरमिजी ढगांतून उमलताहेत, गरगरा फिरताहेत, क्षणोक्षणी बदलताहेत. सोनेरी रंग फिका होत होत पिवळा होतो. मग पिवळ्या रंगात तपकिरी झाक मारते. मग आकाशाचा निळा रंग त्यात मिसळतो. ढगाचा पांढरेपणा फिरून डोकावतो आणि लगेच फिरून तांबडा झार रंग त्या साऱ्या रंगांत भिनतो आणि एकदम सांजावते. काळ्या अंधाराची पुटे साऱ्या रंगछटांवर चढतात आणि त्या छटांच्या माथ्यावर शुक्राची चांदणी स्थिरपणे उभी राहिलेली दिसते.

आखूड दिवस असलेला आणि म्हणूनच अंधाराची श्यामल छाया अंगावर धारण करणारा हा महिना. सावळ्या रंगाचे आकर्षण त्याला. आश्विनाचे मानचिन्ह पांढरे कमल तर कार्तिकाची लाडकी झाडे आवळी आणि तुळस. तुळस हिरवी-काळी आणि आवळीची तर सदा सावळी म्हणून प्रसिद्धीच आहे. या वेळी तुळस मंजिऱ्यांनी नटलेली, तर आवळी पानांचा पसारा कमी करून फळांचे पोपटी-गुलाबी घोस अंगावर लेवून उभी असलेली. या दिवसांतल्या आवळीकडे पाहिले की मला लेण्यातल्या कटिखांद्यावर, हातांत, पायांत व गळ्यात ठसठशीत अंलकार घालून डौलात उभ्या असलेल्या

गंभीर व नग्न स्त्रीमूर्तींची आठवण होते. चिंचेचे साधे सावळे झाडही पानाफळांनी बहरले आहे.

कार्तिकात झाडांचा कायापालट होतो. कोशकीटकांचा होतो. उघड्या वातावरणाची खुलावट, थंडीची प्रसन्नता याच महिन्यातली. भरपूर ओलावा साठल्याने सुखावलेली धरित्रीची गात्रे म्हणजेच जणू या वृक्षवनस्पती वाटतात. ही झाडे या प्रसन्नतेला नवपल्लवांनी कवळीत असतात. फाल्गुन—चैत्रातली पालवी, बऱ्याचशा वृक्षांची पाने अगोदर पूर्ण झडली गेली असल्यामुळे आपल्या स्मरणात दीर्घकाळ राहते. परंतु कार्तिकातली ही नवी पर्णभूषा न्याहाळून पाहिल्याखेरीज मनात भरत नाही. ऋतुराज वसंताचा सखा, हा आम्रवृक्ष इतर ऋतूंतही आपल्या अस्तित्वाची निशाणी प्रारंभीच देत असतो. कार्तिकात पावसाळ्यातली ती गर्द हिरवी जून पाने उन्हाने अति जल्द सुकली. पावसाळी पानांना ओलाव्याची सवय. पावसाळ्यातले वनस्पतींतले हरित द्रव्य, ती विशिष्ट हिरव्या रंगाची परमावधी, आश्विनातच ओसरू लागली. फिक्या रंगांच्या छटांची निसर्गाने मागणी केली. त्याबरोबर आंब्याच्या झाडाने आपली पाने भराभर गाळली आणि अति सुंदर किरमिजी, अंजिरी रंगाचे घोसदार तुरे अंगभर लेवून, बाकीच्या आता पिकलेल्या आणि पौषापर्यंत पूर्ण उघड्या होणाऱ्या झाडांना हसत ते उभे राहिले. एवढेच नाही, तर कार्तिक सरायच्या आतच कुठे तांबूस, तर कुठे पोपटी, तर कुठे पांढरे शुभ्र मोहराचे तुरे, आपल्या फिकट हिरव्या किंवा तांबूस देठांवर फुलवीत ते उभे राहिले. माघापर्यंत आजूबाजूची वृक्षसृष्टी मुकी व सुकी असेल, तोपर्यंत ते असेच फुललेले राहील. आंब्याची या दिवसांतली ती खाली झुकणारी नवी पाने आणि तितक्याच ताठरपणे वरती ताठ मान करून उभे असणारे ते मोहोराचे गुच्छ आणि त्यांचा तो दरवळणारा मादक गंध, ही सारी आपल्याला बाकीची दृश्ये विसरायला लावतात आणि वसंतागमाची प्रेरणा तेवढी जागृत ठेवतात. पहाटेच्या काळोखात दिवस आल्याची साद घालणारा कोंबडा, आणि शरद्—हेमंतांत वसंताच्या आगमनाची वर्दी देणारा हा वृक्ष मला

एकाच प्रेरणेची दोन रूपे वाटतात. मोहोराची नाजूक फुले टपटप गळून त्यांच्या ठिकाणी कैऱ्यांचे हिरवे मणी चिकटलेले दिसतात आणि पाखरे त्यांच्यावर झेपावतात.

आंब्याला साथ देणारे दुसरे झाड फणसाचे. फणसाचे झाड उघडे कधीच दिसत नाही. त्याची पालवीही इतर झाडांप्रमाणे तांबूस कोवळी दिसत नाही. तरी पण कार्तिकात जसा फणसाच्या नव्या तजेलदार पानांचा आणि त्याच्या ऊर्ध्वगामी डहाळ्यांचा नूर दिसतो, तसा तो एरवी कधीच दिसत नाही. कारण आंब्याप्रमाणेच तेही आता फळे धरण्याच्या तयारीत आहे. फुले नसली तरी त्याची पाने सुंदर गर्भछाया अंगावर धारण करून गंभीर-पणे उभी आहेत. वरवर जाणाऱ्या याच्या नाजूक डहाळ्या, दोन्ही बाजूंनी पानांनी लादलेल्या आणि शेंड्यावर पानांचा झुबका धारण करणाऱ्या अशा, आंब्याच्या खाली तोंड करून लोंबणाऱ्या पानांच्या डहाळ्यांहून किती वेगळ्या दिसताहेत. आणि जवळच्या शंखासुराचे सदा उमलते तुरेही असेच अगदी ताठ वर जाणारे. पाने सरळ रेषेत आडवी हलणारी. आणि त्याच्या बाजूची सीताफळ — फांद्या व पाने आडवी पसरून मग शेंड्याकडे किंचित वर झुकणारी. मागची ती जांभूळ — तिची पाने खालीच लोंबणारी, तर शेवग्याची कार्तिकी पालवी प्रथम वर चढून नंतर खाली झुकल्यासारखी दिसते आणि फुलांचे तुरे मात्र वरवरच चढताना दिसतात. बाजूची केळीची पाने, अजून वारा चढायला सुरुवात झालेली नाही, वातावरण कसे निवांत आहे, म्हणून न फाटलेली अशी पूर्ण शोभेने भरलेली दिसताहेत. आणि मधली ती नव्या पानांची उंचच उंच ताठ सुरळी अतिशय डौलदार दिसते आहे. कार्तिकात नव्या पानांच्या व झाडाझाडांच्या नाजूक डहाळ्यांच्या वर, खाली आणि बाजूला पसरण्याच्या विविध तऱ्हा जशा पाहायला मिळतात तशा एरवी मिळत नाहीत. कारण ही नवी पाने फुटणारी झाडे या काळी थोडी असल्यामुळे त्यांचे मनसुराद निरीक्षण करता येते. पालवीच्या या दर्शनामुळे, भारतासारख्या उष्ण देशात ऋतू वेगवेगळे असले, तरी ते

एकात एक कसे मिळून गेलेले असतात हे चांगलेच कळते. युरोपात किंवा इतर शीत प्रदेशात झडतात तेव्हा साऱ्याच झाडांची पाने एकदम झडतात, पालवतात तेव्हा सारी झाडे एकदम. जेव्हा एका तऱ्हेचे झाड कळ्या धरते, तेव्हा आसमंतातली सारी झाडे तशाच कळ्या धरतात. आणि त्यामुळे ऋतूऋतूंतले वृक्ष-वनस्पतींचे जीवन विषम होते. त्यांच्यांतले भेद स्पष्ट दिसतात. सौंदर्य व कुरूपता एकदम जाणवते. पाखरांच्या हालचाली मन अधिक खेचून घेतात. आपल्याकडे तसे होत नाही. आंबा तीन महिने मोहरत असतो. पुढे चार महिने फळत असतो. एक शेवरीचे झाड अगदी उघडे असेल, त्या वेळीं दुसरे फुलांनी डवरलेले दिसेल. ते फुलायला महिना लागेल. पक्षी तर नेहमीच इथल्या उष्ण हवेत येतजात असतात. पिंपळासारखे वृक्षही दर दोन-तीन महिन्यांनी कधी संपूर्ण तर कधी अर्धवट पालवतात. कार्तिकात, चैत्रात, श्रावणात तर ती पालवी चांगलीच नजरेत भरते. परंतु यामुळे, झाडाझाडांतल्या जीवनविकासाचे सूक्ष्म स्वरूप अधिकच मनोज्ञ बनते.

आश्विन ओसरला आणि कार्तिकात शुभ्र शारदीय फुलेही गळतीस लागली. आकाशलिंबांची, आकाशचमेलीची, किंवा बुचाची ती उंच झाडे आपली ती मंदमधुर वासाची सुंदर पांढरी फुले रात्री जमिनीवर टपटप गाळायचे विसरून गेली. ते पुष्पभांडार आश्विनाकरिताच राखलेले होते. भाद्रपदातले व आश्विनाच्या प्रारंभीचे फुलपाखरांचे दाट थवेही फुले कमी होताच विरळ होत चालले. त्यांचा प्रणयाचा हंगाम संपत आल्यामुळे त्यांची गती मंदावली आहे. ती उडतातही थांबत थांबत, हळूहळू; आणि म्हणूनच की काय, त्यांच्याकडे माझे लक्षही जास्त जाते आहे. त्यांच्या हालचाली कशा मनात भरताहेत. त्यांच्या जीवनाची किती तरी कोडी आता त्यांची संख्या विरळ झाल्यामुळेच प्रतीत होताहेत. कीटकसृष्टीचे विविध चमत्कारांनी नटलेले जीवन उष्ण देशात बारमहा जवळजवळ तसेच पाहायला मिळते. ऋतुमानाप्रमाणे आविष्काराची उत्कटता आणि संख्या यांतच काय फरक पडेल तो. या पाहा काळ्या मोठ्या पाकोळ्या. पंखावर लालपिवळे ठिपके असलेल्या. निंबाच्या

झाडाभोवती त्या कशा पिंगा घालताहेत. आता कुठली फुले नि कुठला मध तिथे ? तशाच त्या तपकिरी रंगाच्या पण चित्रविचित्र किनारी पंखावर असलेल्या ' चित्रकोरी ' पाकोळ्या आंब्याच्या राठ जून पानांत लपून बसल्या आहेत. एरवी पाऊल कुठे ठरायचे नाही. पण आता तास तास त्या पंख मिटून समाधी लावून बसल्या आहेत. फुले नसलेल्या झाडावर फुलपाखरांची वसती का असते, ते मला पुष्कळ दिवस समजत नव्हते. पण आता त्या विरळ झाल्याने त्यांचा मागोवा घेता आला; आणि मग समजले की त्या झाडावर ती फुलपाखरे अंडी घालतात म्हणून.

मीलनाची आणि अंडी घालण्याची पद्धत तरी या कीटकसृष्टीतली किती वेगळी. सर्वांत मनोज्ञ मीलन चितूरांचे, हवेत उडता उडता होणारे. तसेच फुलपाखरांचे. पण ते मध खाताखाताना मध्यंतरातल्या उड्डाणात होत असते. पतंग व फुलपाखरू यांच्यांतला फरक ती उडताना सहजासहजी लक्षातही येत नाही. किती सारखी दिसतात ती. पण फुलपाखराला दिवसा उडावेसे वाटते, तर पतंगाला रात्री. ज्योतीचे आकर्षण पतंगाला फार. तसेच फुलपाखरू सारखा मध भक्षीत असते, तर पतंगाला केवळ प्रेमसाफल्याची ओढ असते. अंड्यातून बाहेर पडल्यावर चार-एक महिने कीड असताना जो काही चारा खाल्ला असेल तेवढेच त्याचे अन्न. पतंग केवळ निराहार प्रेमसाधन करीत असतो. टोळ कसा खादाड; मिळेल त्याचा फन्ना पाडतो. पण एका बाबतीत मात्र पतंगाचे आणि त्याचे मोठे साम्य. त्या दोघांचे मीलन फुलपाखरासारखे हवेत होत नाही. एका जागी बसून होते. अंडी घालण्याचीही तऱ्हा तशीच. फुलपाखरू हळूच खालचा भाग ( ज्या झाडाच्या पानांवर त्याच्या अळ्यांचे पोषण होते, त्या झाडाच्या ) फांदीला टेकवते आणि मग रांगेने एका दमात अंडी घालते. पतंग इतका शिस्तशीर नसतो.

दिवाळीनंतरचीच ती हकिगत. दुपारचे बारा वाजून गेले होते. आमच्या सज्जात काही तरी मांसाच्या गोळ्यासारखे वळवळत होते. बाजूनी मुंग्या धरल्या होत्या. मला वाटले की, कावळ्यांनी काही घाण आणून टाकली,

आणि मांसाच्या तुकड्याला मुंग्या डसल्यामुळे तो हलल्यासारखा वाटला म्हणून केरसुणी घेऊन तो झाडायला मी खाली वाकले. पण नंतर जे काही दिसले, त्याने स्तिमित होऊन मी पाहातच राहिले. काही तरी भव्य, करुण, भयंकर व तरीही परमसुंदर असे आकस्मिक दिसले म्हणजे चित्तवृत्ती जशा थरारून उठतात, तसे माझे झाले. जो मला मांसाचा तुकडा वाटला होता, ते एका पाकोळीचे धड होते. तिचे डोके कुणी तरी खाल्ले होते. मानेचा उघडा भाग नळीसारखा पोकळ असून त्यातून चिकट द्रव वाहत होता. पाय, पंख, डोके — सारे अवयव नष्ट झाले होते. केवळ पिवळ्या पंखाचा लहानसा पापुद्रा तेवढा त्या देहाला चिकटून होता, म्हणून ती पाकोळी असे ओळखू येत होते. मानेच्या नळकांड्यापासून मुंग्या आत शिरत होत्या. त्या धडाच्या बाजूला अंड्याच्या इंच दीड इंच लांबीच्या पाचसात पट्ट्या पडल्या होत्या. लहान साबुदाणे एका पट्टीला दोन दोन चिकटवावे त्याप्रमाणे दोराएवढ्या तपकिरी मखमली पट्टीवर अंडी रांगेने चिकटलेली होती. काही अंडी बाजूला विखरून पडली होती. मला वाटले की, कुणी पाखराने या पाकोळीला मारून टाकले आणि त्यामुळे तिच्या पोटातील अंडी बाहेर पडली. म्हणून मी मुंग्या झटकल्या आणि त्या पाको-ळीला उताणी केली, तो काय चमत्कार! स्प्रिंग उडावी तशी ती एकदम पोटावर उपडी वळली. तिचे शरीर स्पंदन पावत होते, आणि मोठ्या कष्टाने तिचा खालचा भाग पोटाच्या आकुंचनामुळे हळूहळू उघडून त्यातून अंड्यांची रांग फिरून बाहेर पडू लागली. सुमारे दोनशे अंडी तिने अगोदरच घातली होती — या स्थितीत घातली होती हे उघड होते. आणि पुरी अंडी घातल्या-शिवाय मरायचे नाही, असा ठाम निश्चय त्या देहाने केलेला दिसला. अगदी तालबद्ध आकुंचन आणि प्रसरण होऊन केवळ नळीवजा दिसणाऱ्या इंचभर लांबीच्या त्या देहातून अंड्यांची माळ सावकाश सरकत बाहेर पडत होती. पन्नास-साठ अंड्यांच्या आणखी दोन पट्ट्या बाहेर आल्या आणि मग किती तरी वेळ एक अंडे अर्धे बाहेर अर्धे आत असे अडकून बसले. दहा

मिनिटे झाली. मला वाटले, मेली ती आता. पण हात लावल्याबरोबर फिरून एक शिरशिरी त्या मादीच्या अंगातून गेलेली माझ्या हाताला जाणवली. झटक्याने मी हात काढून घेतला. ते अंडे बाहेर आले आणि दुसरे तिथे अडकून बसले. पहिला वेग संपला होता. जीवन व मृत्यू त्या देहाच्या उंबरठ्यावर पाय ठेवून उभी होती. पाच पाच मिनिटांनी तो देह स्पंदन पावे आणि एक एक अंडे बाहेर येई. अशी वीस अंड्यांची पट्टी बाहेर आली. आणि मग काही वेळ तो देह निश्चेष्ट पडला. त्यानंतर फिरून एक व अखेरची उसळी त्याने घेतली. पहिली अंडी दूर लोटली गेली, तीन अंड्यांचा त्रिकोण त्या एकदम मोठ्या उघडलेल्या गुलाबी अंगातून बाहेर पडला आणि मग ते द्वार एकदम मिटले. स्पंदन थांबले. धडधड थांबली. ती पाकोळी त्याच क्षणी मेली. तिचा तो देह क्षणापूर्वी अंडी घालताना फुगलेला वाटत होता, तो एकदम सुरकुतला आणि झपझप वाळत चालला. ही पाकोळी पतंगी होती. तिच्या अंगावरची ती मखमली लव निस्तेज दिसू लागली.

जननाचा देखावा नेहमीच करुण, भयावह आणि विस्मयजनक असतो. पाकोळ्या, पुष्कळ कीटकांच्या माद्या नेहमीच अंडी घातल्याबरोबर मरतात हेही खरे. पण या जखमी पाकोळीचे ते मृत्युपथावर नेटाने जीवनाची पावले रुतवून जाणारे बाळंतपण मी कधी विसरणार नाही. मेंदू गेला तरी तिचा नारीदेह संज्ञाहीन झाला नाही. दोनशे नव्वद अंड्यांना प्रसवायचे हा संकल्प तिची इंद्रिये विसरली नाहीत. डोके गेले तरी प्रजानिर्मितीची घटका विफल होऊ नये म्हणून तिने अखेरच्या क्षणी केवढी धडपड केली असेल! दिवसा पतंगांना नीट दिसत नाही. घराचा आसरा त्यांना आवडतो. याही स्थितीत हा संकेत तिच्या देहाने कसा अचूक पाळला, कोण जाणे. अन्नपाण्यावाचून जीवन पणाला लावून पतंग प्रणयाचा खेळ खेळतात. मीलनानंतर नर मरायचा हे तर पाकोळ्यांच्या जगात ठरलेलेच. कोंबडी अंडी घालताना कलकल करते. पशू विताना विव्हळतात, ओरडतात. या मुक्या जीवांचा सारा खेळ, साऱ्या वेदना केवळ निःशब्द. पण त्या निःशब्द म्हणूनच मला या पतंग-

पाकोळीच्या विण्याचा आणि मरण्याचा प्रसंग पाहून शहारल्यासारखे झाले. तिच्या मानेच्या भोकातून मृत्यू आत घुसत होता, खालच्या इंद्रियातून जीवनाची शुभ्र रसरशीत बीजे बाहेर पडत होती. तो वात्सल्याचा प्राकृतिक आविष्कार नाही, ते अंडी उबवणे नाही, घरकुल नाही, काही नाही. त्या अंड्यांना आसरा खालच्या मऊ मखमलीचाच काय तो होता. दोन आठवडे अंडी, मग त्यांतून अळ्या निघायच्या, अळ्यांची रूपे तीनदा दर तीन महिन्यांनी पालटायची. मग दोन तीन महिने कोशातले निद्रिस्त कायापालटाचे जीवन आणि या तीनशेसाठ दिवसांनंतर जास्तीत जास्ती आठ दिवस, बहुधा तीनच दिवस, फुलपाखरू किंवा पतंग होऊन धुंद प्रणयाचा खेळ. काय हे अद्भुत जीवन ! तीन दिवसांचा संसार, की लगेच मृत्यू आणि मृत्यूचा स्पर्श होत असतानाच अपत्यनिर्मितीचा भीषण, दुर्दम्य आणि जणू काही देहातीत असा तो आविष्कार. हेच कीटकसृष्टीचे भव्य रोमहर्षक नाट्य तुम्हाला तृणातृणावर, पानापानावर, झाडाझाडावर, धूळीत, खडकावर, अनंत आकृतींत, अनंत रंगांत, अनंत सुरूप-कुरूप स्वरूपांत, सूक्ष्मातल्या सूक्ष्म जीवजंतूच्या रूपानेही सतत प्रकट होत असल्याचे आढळून येईल. त्यांच्या मूकतेतही ब्रह्मांडाच्या कानठळ्या बसाव्यात असे आक्रंदन, त्याच्या त्या चिमुकल्या देहातला तो अमर्याद जीवनोत्साह आणि ती जगण्यामरण्यातली अटीतटीची ओढ पाहून तुमच्या कानांत घुमले नाही असे व्हायचे नाही.

हे पाहा जास्वंदीचे पान. त्याच्या मागच्या बाजूला पाहा कसा, पांढरा कोळिष्टिकासारखा तवंग दिसतो आहे तो. दुसऱ्या पानांवर नुकतेच काळे चकचकीत ठिपके खसखशीएवढे चमचमताहेत. अंडीच आहेत ती. त्यांतल्या अळ्यांनी पाने खाल्ली आहेत. त्या अळ्यांचे सामुदायिक कोश म्हणजेच तो पानावरचा पांढरा भुरा. मावा म्हणतात त्याला. या माव्यातून पांढरी, उन्हात हेलकावे घेणारी केंबरे निघतात. आणि ते पाहा, समोरच्या आंब्याच्या झाडाच्या बुंध्यावर पांढरी लांबुडकी अंडीच जणू बोराएवढाली चिकटली

आहेत. पण ती अंडी नसून मुंग्यासारख्याच एका कवच्या कीटकाचे कोश आहेत. गेले तीन महिने ते कोश हळूहळू फुटताहेत. आता मात्र बहुतेक सारे कोश फुटून मुंगे कुठे गायब झालेले दिसतात !

## प्रशांत आणि प्रक्षुब्ध
## मार्गशीर्ष

हेमंताचा पहिला महिना मार्गशीर्ष. असे काय आहे या महिन्यात की श्रीकृष्णाने ' मासानां मार्गशीर्षोऽहम् ' म्हणून यालाच गौरवावे ? तसे पाहिले तर बाह्य आकर्षणांनी नटलेला हा महिना नाही. पण खरोखरच यातले ते थंड, आणि गात्रांना शांतविणारे वातावरण, ते छायाप्रकाशाचे नाट्य आणि त्यातून प्रतीत होणारे रमणीय भ्रांतिजाल आणि यात आढळून येणारी प्राण्यांतली जीवनाची भीषण ओढ, ती क्रूर पारध पाहा. किती परस्परविरोधी गोष्टी, किती वेगळ्या संवेदना, स्तब्धता आणि तीव्रता याच्यात चमत्कारिक तऱ्हेने गुंफल्या गेल्या आहेत. शांती, भ्रांती आणि अत्यंत वास्तव व वेगवान अशी जीवनाची ओढ या महिन्यात तुम्हाला जाणवली नाही असे व्हायचेच नाही. आणि ती जाणवते तीही अशा तऱ्हेने की शांतीतून संभ्रमात व संभ्रमातून वास्तवात आपण केव्हा उतरतो, हेही तुम्हाला कळणार नाही. स्वप्न व जागृती दोन्ही सारख्याच तीव्रतेने रात्रंदिवस तुमचा पाठलाग करीत असतात. छायाप्रकाश,

स्तब्धता व नाद, खरे व कल्पित बेमालूमपणे एकात एक मिसळून जाते. या चमत्कारिक त्रिवेणी संगमातच मार्गशीर्षाचे रहस्य दडले आहे, असे मला वाटते.

मार्गशीर्षाची सुरुवात मोठी मोहक असते. दिवस लहानलहानच होत जाताहेत. कामाच्या भानगडीत कुठे इकडेतिकडे करावे न करावे, तोच सांजावते. संध्याकाळच्या छाया दाटल्यानंतर एकदम रिकामे वाटू लागते. रात्रीची ओढ, रात्रीच्या सौंदर्याची मोहिनी, आकाशाची दीप्ती आता मनाला चांगलीच जाणवू लागते. ही पाहा, बीजेची कोर गुलाबी पश्चिमेस कशी शोभून दिसते आहे. किती नाजूक आणि आकाराच्या मानाने बारीक व रेखीव आहे ती. इतकी बारीक की तिच्या त्या मोतिया रंगाच्या छटाही दिसून न दिसेशा वाटताहेत. निरभ्र आकाश किती मोठे. तारे तर अजून उगवलेच नाहीत. शुक्राची चांदणी तेवढी जवळच चमकते आहे. पण ही नाजूक कोर किती साधी असूनही पाहणाराची नजर आपल्याकडे वेधून घेते आहे. चतुर्थीच्या चंद्रकोरीचा नखरा हिच्यात नाही. मादकता नाही. न नटलेले आणि म्हणूनच अत्यंत भूषित झालेले सौंदर्य कसे असते असे मला कुणी विचारले तर, मी या द्वितीयेच्या चंद्रकलेकडे बोट दाखवीन.

तृतीयेला हीच चंद्रकोर जरा अंगाने भरलेली दिसते. हीही पश्चिमेकडे पण कालच्यापेक्षा जरा वर आहे. दोन तीन तास सूर्यास्तानंतर ती दिसते. झपझप खाली उतरताना ती रंग भराभर बदलीत जाते. सूर्य डुबताना पश्चिमेच्या लालीत ती अगदी फिकी पांढरी, बगळ्याच्या पिसासारखी दिसते. मग बाकीच्या आकाशाचा नीलिमा अधिकाअधिक गर्द होत चालला की तिचे तेज खुलू लागते. एकेक छटेने उजळत जाते ती. पूर्णपणे उजळून मोत्यासारखा तिचा प्रकाश होण्यासच सुमारे तास लागतो. मग हा रंग अर्धा तास तसाच एकसारखा असतो आणि मग कोर अस्ताळा लागली की परत तिचे रंग भराभर बदलू लागतात. मघाशी पूर्ण तेज चढायच्या आधी हे विविध रंग तिच्यात नव्हते. एकाच तेजाने पाणी वाढत होते, अगदी हळूहळू. पण आता पाहा, तिच्या कडा जरा पिवळट दिसू लागल्या. पिवळट

मोत्यासारख्या. मग मधला रंग किंचित पोपटी झाला, आणि मग कडांचा पिवळा रंग हळूहळू बदामी होत होत, मधला रंगही किंचित गुलाबी झाला. या उतरत्या कोरीची एक मजा मी पाहिली ती ही की, एवढ्याशा त्या कोरीत मध्यभागाचा आणि कडांचा रंग कधीच एकसारखा नसतो. मधला फिका असतो त्या वेळी कडा लालसर दिसतात. मधला रंग अस्ताच्या वेळी गडद होतो तेव्हा टोके फिकट दिसतात.

षष्ठीपर्यंत पश्चिमेला झुकलेल्या चंद्रकोरीचे हेच देखावे दिसतात आणि मार्गशीर्षातले सर्वांत मोठे आकर्षण मला हेच वाटते. हा पाहा षष्ठीचा चंद्र वर चमकतो आहे. अगदी मंद असा त्याचा प्रकाश आहे. जमिनीवर ते चांदणे काही खुलत नाही. पण समुद्राच्या पाण्यावर रात्रीच्या पहिल्या प्रहरात ओहोटीला सुरुवात झालेली असूनही, पाहा, अगदी काठाजवळच्या लाटांत कसा थोडासाच भाग चमचम करतो आहे तो. समुद्राच्या दोन्ही बाजूंना, क्षितिजाकडची खुली बाजू सोडली तर दोन्ही बाजूच्या विजेच्या दिव्यांची प्रतिबिंबे लांबच लांब पाण्यात झुकलेली दिसताहेत. त्या पट्ट्यांहून हा चंदेरी तुकडा किती वेगळा दिसतो आहे. आणि या रोषणाईमुळे ते पश्चिमेकडचे क्षितिज आणि खालचा तो काळानिळा समुद्र किती भयाण वाटतो आहे. पण वरती शुक्राची चांदणी विलक्षण चमकते, आणि तिच्या चांदण्याचा एक अरुंद व सौम्य रुपेरी असा लांबच लांब पट्टा क्षितिजापासून तो थेट किनाऱ्यापर्यंत पोचलेला असा, पाण्यावर तरंगताना दिसतो आहे. शुक्र मावळला म्हणजे मात्र हा पट्टा जाऊन काही काळ काळोख पश्चिमेला दाटतो. आणि मग चंद्र क्षितिजाकडे कलंडला की फिरून क्षितिजाच्या जवळ एक लहानसा तुकडा अति मंद रुपेरी रंग धारण करतो. त्या वेळी गंमत अशी होते की, किनाऱ्यावरचा तो चमचमणारा भाग व क्षितिजाजवळचा भाग यांच्यावर एकाच चंद्राचे वेगळ्या तऱ्हेने होणारे तेजाचे खेळ पाहायला मिळतात. थोड्याच वेळात हे तेज जाते; समुद्रावर काळोखाच्या दाट छाया पसरतात; त्यातून एखाद्या मोठ्या माशाने वर

उडी मारली की तेजाचा झोत दिसेल तेवढाच. वाढत्या रात्रीच्या थंडीबरोबर मार्गशीर्षातल्या त्या नैर्ऋत्येकडच्या थंड वाऱ्याच्या झुळकांनी शरीर कापू लागते. थंडी हाडांना कापीत जाते. जणू काही शरीरातले ऊबदार मांसाचे थर नाहीसेच झाले आहेत. दात घट्ट आवळले जातात, अवयवांचे आकुंचन होते. पोटातूनही वाढत्या थंडीबरोबर गार गोळा उठलासे वाटते. श्वासोच्छ्वास एरवी कुणाला जाणवतो? पण या वातावरणात तोही जास्ती थंड, जाड भासतो. उबेला व सौम्य शीतलतेला सोकावलेले शरीर या सुक्या, तीव्र थंडीपासून दूर पळू पाहाते. पण मन? ते आता काळोखाने दाटलेल्या थंड शांतीत एकजीव होते. पुढे दिसणाऱ्या अफाट काळोखी शांतीचा एक बिंदू म्हणजेच आपले शरीर, मन, आत्मा असे वाटते. साऱ्या भावना आटतात. क्षणभर सारे विचार थांबतात. स्वतःचे विस्मरण पडते. काळोखाच्या थंड घनदाट आवरणासारखे हाडाच्या गाभ्यापर्यंत जाणारे शांतीचे साधन दुसरे नाही, असे मला वाटते. पौर्णिमेच्या रात्रीपेक्षा थंडीच्या दिवसांतल्या काळोख्या आणि शुक्लपक्षातल्या षष्ठीपर्यंतच्या रात्री मला फार आवडतात. काळोखात आकाशाचा काळसर नीलिमा अति भव्य आणि अनुपम शोभेने नटलेला असतो. चांदणी न् चांदणी आपले तेज पूर्णत्वाने फेकण्यासाठी धडपडत असते. गुरू, शनी, मंगळ, व्याध हे मोठाले तारे तर सोडाच पण लहानसहान चांदण्याही थरथरत, जणू स्वतःचे तेज व सौंदर्य प्रकट करण्याच्या दुर्दम्य आवेगाने कंपित होत असतात. निळसर, पिवळसर, लालसर, शुभ्र अशा वेगवेगळ्या रंगच्छटांची बरसात करीत असतात. घटकेघटकेला पुढे सरकून डोळ्यांदेखत अदृश्य होणाऱ्या चांदण्यांकडे बघता बघता रात्रीची पहाट झालेली मी पाहिली आहे. मृगनक्षत्राचा प्रभाव म्हणा, काही म्हणा, पण हे ओळखीचे मोठे व सुंदर नक्षत्र पाहिले की, त्याच्यामागून माझे मन लहान पोराचे हात चंद्र धरायला धावतात तसे धावू लागते. काळोख्यां थंड रात्री तेजःपुंज अशा त्या परिचित नक्षत्राकडे उघड्या खिडकीतून रात्रीबेरात्री अनेक वेळा बघणे हा माझा छंदच होऊन

बसला आहे. थंडीने गात्रे कापतात पण डोळे वातावरणातल्या शीतलतेने सुखावतात. थंड श्वास प्रथम त्रासदायक वाटले, तरी एकदा फुप्फुसे ताज्या हवेने भरली की गात्रागात्रातून एक प्रकारची शांती वाहू लागते. झोप पूर्ण उडून जाते. सगळे ज़ग झोपले असताना जागण्याची विद्या साधावी व चिंतन करावे, असे मला कधीच वाटत नाही. झोपेचे जबरदस्त आकर्षण मला आहे. तरी पण थंडीच्या रात्री ताज्या काळोखाची शांतता मला पुष्कळदा झोपू देत नाही. निद्रेच्या बेहोशीने भरलेली, शांतीने रंगलेली जागृती अनुभवीत मी बाकी सारे सारे विसरून खिडकीतून दिसणारे जग पाहात बसते. ताऱ्यांची धावपळ पाहून प्रथम गंमत वाटते. पण वर पाहून मान ताटकळली की आजूबाजूच्या झाडांच्या छायामय आकृती ताऱ्यांच्या ज्योतीं-पेक्षाही मनोरम वाटतात. झाडावर पंखात चोच खुपसून निजणारी पाखरे अधूनमधून धडपडतात, पंख फडफडावून मध्येच आंधळेपणाने उडल्या-सारखे करतात. त्या वेळी झाडांच्या डहाळ्या खूप हलल्याचा भास आणि मग पानांच्या अधूनमधून, ठिपक्यासारखे दिसणारे आकाश खूप मोठे दिसते. त्यानंतर ते सबंध झाड व आकाशाची ती विस्तृत पार्श्वभूमी एवढेच दृश्य मन खेचून घेते. आकाशाचा तो नीलिमा या वेळेस इतका गंभीर आणि मोठा वाटतो की पुष्कळदा मला वाटते, चांदण्या अजिबात नसत्या, नुसता आकाशाचा हा मखमली निळा घुमटच असता तर किती छान झाले असते. समुद्राच्या काळ्या सौंदर्याला, अमर्याद शांतीला ज्याप्रमाणे विजेच्या दिव्याचे झोत फिके करून टाकतात, त्याचप्रमाणे मर्यादित आकाराचे, मर्यादित तेजाचे, आपल्यापासून खूपच दूर असणारे हे तेजस्वी ठिपके, आपल्या अवतीभोवती वेष्टून राहणाऱ्या, आपल्याला प्रत्यक्ष स्पर्श करणाऱ्या आणि इतके असूनही अथांग असणाऱ्या आकाशाच्या अनंतत्वाला बंधन घालताहेतसे वाटते.

छायेची शांती, छायेचा स्पर्श, छायेचे सौंदर्य मार्गशीर्षातल्या लांबच लांब रात्रीत जसे भासते तसे इतर वेळी भासत नाही. पहाटेचा काळोखही किती

तरी वेळ रेंगाळतो. रात्र संपल्याचे जाणवते ते एका संवेदनाक्षम कोंबड्याला. तो काळोखात जागृतीची साद घालीत निरलसपणे फिरतच असतो. कोंबडा ओरडला की मला पेंग येते, आणि शांतिमय जागृती संपते; जागे व्हावे तर सकाळच्या वेळी उन्हे पसरलेली असतात.

थंडीच्या दिवसांत अधिक दाट मोठ्या वाटणाऱ्या सावल्या नकळत तुमचे मन खेचून घेतात. सावल्यांचा सर्व तऱ्हेचा वेधकपणा पाहावा तर याच दिवसांतला. कारण दिवस सर्वांत आखूड असल्याने उन्हे लवकर कलंडतात. त्यामुळे वस्तूभोवती असणाऱ्या छायाही भराभर आपल्या आकृती व दिशा बदलतात. पश्चिमेला सकाळी झुकणारी सावली मध्यावर स्थिर होऊन गोळ्यासारखी दिसू लागते न लागते तोच ती पूर्वेकडे खेचली जाते. सकाळपेक्षा दुपारनंतरच्या सावल्या जास्त लांब, पण कमी काळ्या भासतात. त्या पुष्कळ वेळ टिकल्याचाही भास होतो. अंगणातल्या आंब्याच्या झाडाची सावली, जणू काही त्याला प्रदक्षिणा घालते आहे असेच वाटते.

थंडीच्या दिवसांतले ऊन्ह तर हवेहवेसेच असते, पण या दिवसांतले सूर्य-प्रकाशाबरोबर येणारे छायेचे खेळही मोठे गमतीचे असतात. वारे वाहत असतात. त्यामुळे झाडे, पाने सारखी हलत असतात. पाने झाडांवरून टपटप गळतच असतात. पाखरे झाडाझाडावरून चंचलतेने उडत असतात, थव्याथव्याने गोळा होतात आणि पांगत असतात. ही सगळी दृश्ये नुसतीच पाहिली तरी मन रंजते. पण या साऱ्यांच्या निरनिराळ्या छाया जमिनीवर, घरांच्या भिंतींवर कौलांवर, खिडकीच्या तावदानावर पडल्या की त्यांतून एकाच रंगाच्या कमी-अधिक गर्द अशा काळ्या छटांच्या अतर्क्य आकृतींचे अनंत प्रकाराचे नर्तन किती रिझवणारे असते. आकृतीआकृतींच्या मागे किती सूक्ष्म विनोदाची लहर पसरली आहे हे किती जण पाहात असतील? निसर्गाच्या या वाकुल्या, हे छायानाट्य पाहणे मला फार आवडते. आकाशातले ढग पावसाळ्यात भराभर बदलणारे निरनिराळे चमत्कारिक आकार धारण करतात; भिंतीवरचा रंग उडत चालला की त्या उडालेल्या खपल्यांच्या विलक्षण आकृतीतून

आकृतींचे विसंवादी अभिनव नाट्य चाललेले आपल्याला दिसते. ढगांतले ते काल्पनिक चेहरे व ते प्रत्यक्षात कधी न दिसणारे व म्हणूनच आकर्षक वाटणारे मनःकल्पित आकृतींचे हावभाव या सावल्यांच्या खेळातही दिसून येतात. आणि गंमत अशी की, खरोखर प्रत्यक्षात असे विचित्र आकार दिसत नसले तरी कुठल्या तरी साहश्याला चिकटून आपण एका कुठल्या तरी परिचित वस्तूचे किंवा प्राण्याचे नाव त्या आकृतीला सहज देऊन जातो. नामरूप आमच्या जगात किती अभिन्न आहे हे या छायांचा खेळ पाहिल्यावर मला चांगले उमगून आले.

सकाळी नऊ-दहाचा सुमार आहे. पूर्वेकडच्या खिडकीची काचेची चारी तावदाने गढूळ सफेत रंगाची, अपारदर्शक अशी आहेत. खिडकीच्या पलीकडे मोठे बदामाचे झाड आहे आणि त्या बदामाच्या हलत्या पानांची छायामय दृश्ये सूर्याच्या किरणांमुळे पाहा, कशी चारी तावदानांत चार वेगळ्या मुक्या सिनेमांची दृश्ये असावी तशी दिसताहेत. किती विचित्र या आकृती! स्वप्नात खूप विचित्र गोष्टी आपण पाहतो, पण या छायांच्या विक्षिप्त आकारांची बरोबरी कुठल्याच स्वप्नाने व्हायची नाही, असे मला वाटते. आणि या आकृती सारख्या हलत असल्यामुळे तर त्या विचित्रपणाच्या विविधतेला सुमारच राहत नाही. हा पाहा एक अगदी पोट आत गेलेला, शेपूट जाडजूड असलेला, दोन पायांचा उंदीर सारखे तोंड उघडतो आहे, मिटतो आहे. त्याच्या मागे तीन शिंगे असलेला लांबच लांब बारीक शेपटाचा एक मोठा ससा आपल्या लठ्ठ हातांनी त्याला पकडू पाहतो आहे. दोघांची तोंडे फिरतात ती मागेपुढे एकाच दिशेने. सापडला उंदीर सशाच्या तावडीत. आणि मग उंदीर मोठा होऊन त्याचे हरिण झाले—दोन लठ्ठ बुटके पाय असणारे. मागच्या सशाचा रंग फिका होऊन त्यातून एक भव्य पण लठ्ठ चेहऱ्याची केस कापलेली मुलगी निघत आहे. ते हरिण तिच्या कुशीत घुसले. आणि मग विचित्र पाखरे पंख फडफडावू लागली. दुसऱ्या तावदानात एकाच बाजूला तोंड वळवलेले दोन पक्षी दिसताहेत. एकाचे मानेपर्यंत मोठेच्या मोठे तोंड

व त्यात तोंडभर नाचणारा डोळाच दिसतो आहे, दुसऱ्या पक्ष्याची आकृती पंखासकट पण पायावर उड्या मारणारी दिसते आहे. हा पाहा, अस्वलासारख्या अंगाचा आणि बगळ्याच्या तोंडाचा एक प्राणी झाडाच्या आडव्या फांदीवर नागमोड करून उभा असलेल्या लांब सापाला आपल्या पंजात मधूनमधून पकडून चोचीचे नाजूक प्रहार त्याच्यावर करतो आहे. अशा आकृती, सावली पडेल तिथे नाचताना दिसताहेत. तसे म्हटले तर कुठल्याही प्रकारचे चित्रातले सौंदर्य व प्रमाणबद्धता या आकृतीत नाही. तसे पाहिले तर मिसर देशातल्या विचित्र लिपीप्रमाणे त्या आकृती आपल्यापासून किती तरी दूरच्या वाटतात आणि दुसरे म्हणजे आपल्या परिचित देखाव्यांपेक्षा त्या अगदीच निराळ्या व उलट्या असल्याने मनाला त्या पाहून एक प्रकारचा विसावा मिळतो, बालसुलभ आनंद होतो, हे काही खोटे नाही. पण ही झाली आपली गोष्ट. सावल्यांचा काळा गंभीर रंग, प्रकाशाच्या आधाराने वस्तूवस्तूला चिकटलेले त्यांचे स्वरूप, वस्तूंतून निघणारा पण त्या वस्तूपेक्षा अगदीच वेगळा व बेढब आकार, वस्तूचा पाठलाग करण्याची वृत्ती, सावल्यांतले ते निराळेच चांचल्य, निराळेच स्थैर्य, प्राचीनांच्या मनावर खोल परिणाम करते झाले. मर्त्यलोकातल्या प्राण्याची सावली म्हणजे याच्या आत्म्याची प्रतिकृती त्यांनी ठरवली. देव व पिशाच्चे यांना सावल्या नसतात असे त्यांनी ठरवून टाकले. देव म्हणजे केवळ दीप्ती. पिशाच्च म्हणजे केवळ अंधार. अंधाराउजेडाचा मिश्र खेळ पृथ्वीतलावरच्या वस्तूवस्तूतून भरला आहे. अंधाराची पटले बाजूला सारून आज हजारो वर्षे मानव प्रकाशाकडे, ज्योतीकडे जाण्यासाठी धडपडतो आहे. पण त्याला दिसणाऱ्या प्रकाशमान वस्तूची काळी सावली कुठे ना कुठेतरी दडलेली आहे.

मार्गशीर्ष हा पारधीचा महिना. आकाशातला तो मृग व तो तेजस्वी व्याध यांचीच हुकमत सध्या दुनियेवर आहे असे वाटते. कुणी तरी कुणाचा तरी पाठलाग करीत असते. जीवनाचा भीषण उन्माद या महिन्यात ओसंडून जात असतो. क्षुधेने चेतावलेले जीव एकमेकांवर तुटून पडताना दिसतात.

पाखरांच्या, पशूंच्या जोड्या जमून त्यांचा प्रणय अधूनमधून दिसत असला तरी अजून त्यांच्या प्रणयरंगाने वातावरण भरून गेलेले नाही. त्यांच्या सादी आर्त झालेल्या नाहीत. जगण्याची तीव्र धडपड या काळात चाललेली स्पष्ट दिसते. कावळ्यापोपटांची भांडणे लागली आहेत. चितूरांच्या मागे नाचण पक्षी धावताहेत. फुलचुख्या आंब्याच्या मोहरावरच्या किड्यांचा फडशा पाडीत आहेत. घारी चिमण्यांना घाबरवताहेत. टोळ दिसेल त्याचा फन्ना पाडताहेत. आणि हा पाहा, एक चांगला चिमणीएवढ्या तोंडाचा टोळ जीव घेऊन विमानाच्या वेगाने धावत पळत येतो आहे. किती बसके व विद्रूप त्याचे तोंड. किती कळकट हिरवा रंग. कावळ्यांची झुंड काव काव करीत त्याचा पाठलाग करते आहे. पाहता पाहता तो एकटाच कळपातून वाट चुकलेला टोळ केळीच्या रुंद पानात शिरून बसला. त्याच्या रंगामुळे आणि निसर्गाच्या रंगगोपनाच्या कौशल्यामुळे आंधळे कावळे फसले. आंब्याच्या झाडावर बसता बसता त्यांनी त्याला हुसकले होते. पण आता मात्र रंगसादृश्याचा फायदा त्या टोळाला मिळाला. धडधडत्या काळजाने शरीराचा संकोच करून तो केळीच्या पानांच्या मुळात घुसला. पुढे त्याचे काय झाले कोण जाणे!

आणि टोळांची ही पारध चाललेली असताना पलीकडे दुसरेच काही घडते आहे. ही कबऱ्या रंगाची परंतु पुष्ट व सुंदर मांजरी त्या कावळ्याकडे कावेबाजपणाने पाहत दुपारचे ऊन खात बसली आहे. इतक्यात आमच्या घरात शिरलेले व पूर्ण माणसाळून तिच्यापासून केव्हाच सुटे झालेले तिचे पोर, तिला पाहून शेपटी वर करून नाचत नाचत तिच्याजवळ गेले. ते गोंडस पोर तिच्या पोटात घुसले. आमच्या नेहमी मनात येई की, इतके लहान पोर आम्ही घरात आणले तर त्याची आई त्याला घेऊन जाईल की काय? पण आजवर ती कधी इथे फिरकली देखील नाही. तरीही आज पोराने तिला ओळखले. ते तिला बिलगले. त्याला दुधाची हुक्की आली, तशी ती मांजरी क्षणभर घुटमळल्यासारखी दिसली, तिची जीभ जबड्यातून नकळत बाहेर पडली. पिलाच्या पाठीवर फिरू लागली. पण दुसऱ्याच क्षणी आपले चुकले

अशाच भावनेने जणू ती उठून उभी राहिली. तिने कान टवकारले, शेपूट उभारले आणि मग तिची नजर दुसऱ्या दोन हुकमी लाचार आणि उन्मादक डोळ्यांना भिडली. प्रणयरंगांना सरावलेली ती प्रौढ मांजरी त्या बोक्याच्या उलट दिशेने धावली. एकदोनदा मागे वळून तिने नराकडे पाहिले आणि पळण्याचा वेग वाढवला. या वेळच्या तिच्या धावण्यात एक प्रकारचा छद्मी-पणा भरलेला दिसत होता. नराला आपल्या मागे पळायला लावण्यात दिसणारी नारीजातीची धूर्तता तिच्यात दिसत होती. बोक्याने आपली गती वाढविली. लांब लांब उड्या टाकीत त्याने तिला गाठले. भिंत व लाद्यांच्या ढिगाऱ्याच्या मधल्या स्वच्छ जागेवर मांजरी क्षणभर घुटमळली, आणि तिथेच ती नराच्या मिठीत गुरफटली गेली. क्षणभर दोघांची भयंकर गुरगुर झाली. ती त्याला बोचकारू लागली. पण आता बोक्याचा आवेश वाढला होता. आधीच तो बोका काळाकभिन्न. अगदी दुसऱ्या रंगाचा कुठे कुठे संपर्क नसलेला रंग जनावरातही एकच एक असा विरळा असतो. तसा याचा रंग आहे. खूप उंच, एखाद्या कुत्र्यासारखा आहे तो, तसाच लठ्ठ आणि खूप माजलेला आहे तो. त्याचे तोंड बसके आणि गालांच्या बाजूने गुबगुबीत. गर्दन भरलेली. पंजे पोलादी शक्तीने भरलेले. नखे म्हणजे जणू बरच्याच आहेत. डोळे या बोक्याचे असे भयंकर की पुसूच नका. हिरवेनिळे असे ते डोळे त्याच्या काळ्या रंगात फार भयंकर दिसतात. ती भाटी साध्याच रंगाची असली तरी डौलदार दिसते, सौम्य दिसते. तिच्या उलट हा बोका. त्याची मुद्रा क्रूर. भाटीची लहान पोरे खाण्यात याचा पहिला नंबर. मस्ती, रग त्याच्या अंगाअंगात भरलेली. त्याची नजर कुठल्याही मादीला हुकूम करणारी, नमवणारी आहे. केव्हाही पाहा, हा कुठल्या तरी मांजरीची पारध करण्यात गढलेला असतो. एरवी मांजरे जवळ आली की मादी नराच्या स्वाधीन होईपर्यंत किती वेळ त्यांचे भांडण, गुरगुर चालते. पण इथे एकदोन गुरकावण्यातच मादी शांत होते. याही मांजरीचे तसेच झाले. आणि इकडे तिचे ते पोर क्षणभर म्यावम्याव करीत भिरभिरले आणि मग जवळच झाडाची लहान डहाळी पडली होती

तिच्याशी खेळण्यात रमून गेले. तान्हेपण, गोंडसपण त्याच्या डोळ्यांत, त्याच्या पंजांच्या मनोहर हालचालींतून प्रतीत होत होते. खेळून खेळून दमल्यावर गंभीरपणे पंजे आपल्या लालचुटुक पातळ जिभेने चाटीत उन्हात अंग तापवीत ते पोर किती वेळ तरी बसले होते. मधूनमधून पेंगत होते; इतक्यात भिंतीच्या बाजूने फिरून एक कर्कश किंकाळी व गुरगुर ऐकू आली. तो बेगुमान बोका धन्याने गुरकावले की लाचारीने दूर जाणाऱ्या लोचट चाकराप्रमाणे मोठ्या नाखुषीने पण इलाज नाही म्हणून तिला मिठीतून मोकळी करून बाजूला झाला. फिरून एकदा ती मांजरी वसकन ओरडून त्याच्या अंगावर धावली. बोका आणखी चार पावले मागे सरला. पण त्याची धगधगती नजर अद्याप तिच्यावर रोखलेली होती. फिरून ती गुरकावली तशी त्याने अंतर अधिक वाढवले. काही वेळ ती मांजरी उलथी पालथी धुळीत लोळली. आणि मग बोक्याकडे बिलकूल लक्ष न देता पलीकडच्या बाजूला आली. पंजे चाटून तिने आपले तोंड चोळून चोळून साफ केले. अंग, शेपटी सारे चाटून चाटून साफ केले. बोका मागोमाग आला होताच. तिची ही साफसफाई तो न्याहाळून बघत होता. क्षणभर तिला नजरेआड होऊ देत नव्हता. पण ती आपल्याच गुर्मीत होती. गंभीर होती. लवकरच ती बोक्याकडे पाठ करून झोपी गेली. बोकाही पलीकडे पसरला. पण मधूनमधून मांजरी निसटून गेली की काय हे तो मान फिरवून पाहतच होता.—आणि ते पोर? आता अर्ध्या घटकेच्या अनुभवानेच ते शहाणे, सुटे झाले होते. आता ते आईजवळ फिरकले पण नाही.

आणि मग दहापंधरा दिवसांत तर ते पोर झुरळे, पाली मारून खायला इतके सरावले की दिवसभर पारधीच्या छंदातच ते असे. त्याची आई आता गाभण झाली होती. मायलेकरात विस्मृतीचा कायमचा पडदा पडला. गर्भस्थ बालकांनी तिच्या सर्व स्मृतींचा, संवेदनांचा संपूर्ण कबजा घेतला. आपल्या वडील भावंडालाच नव्हे, तर त्या बलिष्ठ बोक्यालाही त्यांनी पार दूर हुसकावून लावले. प्रतिदिवशी ती मादी जड होते आहे. अधिक निर्बुद्ध दिसते आहे.

काही काळ नराने आपल्या बलाने तिला वाकवावे, मोहवावे; काही काळ गर्भातल्या पिलांनी आतून लाथा झाडीत झाडीत तिला पुरते आपल्या काबूत ठेवून तिचे जीवनसत्त्व शोषावे. मग जन्मलेल्या पिलांनी दूध पिण्यासाठी हैराण करावे. काय दहा पंधरा दिवसांचा सुटेपणा तिला मिळेल तेवढाच. नारी जातीचा हा बोजा अलंकार मानून ही मांजरीही गंभीर मुद्रेने वावरत असते— नव्हे, त्यातच तिचे समाधान आहे.

याप्रमाणे रात्रीच्या आकाशातली तेजोमय व युगायुगांना व्यापून टाकणारी शांती, पृथ्वीकडे नजर वळवल्यास लगेच जीवनाच्या दुर्दम्य आसक्तीत परिवर्तन पावते आणि प्राणिमात्राच्या नियतीत विलीन होते. चराचरातली शांती, भ्रांती, जीवननिष्ठा सारी नारीभोवती गुंतून पडल्यासारखी वाटते. मार्गशीर्षातल्या छायानाट्याच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेला जीवनाचा आविष्कार हा असा आहे.

# तालबद्ध
## पौष

पौष हा संक्रमणाचा महिना. थंडीचा कडाका यातलाच. दिवस मोठे होण्याची निशाणी याच दिवसांत मिळते. रूढ समजुतीप्रमाणे हेमंताची अखेर या महिन्याने होते. रामायणात ' इष्ट ऋतू ' म्हणून हेमंताला गौरविले आहे. आपल्या उष्ण देशात थंडीच्या महिन्यांना, विशेषतः गव्हाची हिरवीगार सुंदर पिके शेतात डोलती ठेवणाऱ्या ह्या महिन्याला पुष्टीचा महिना मानावे, यात काहीच नवल नाही. पावसाच्या मारझोडीत शेतातल्या डुलत्या पिकांचे सौंदर्य मनमुराद डोळ्यांत भरत नाही. चिखलाच्या डबक्यांनी माणूस व पिके यांच्यांतले अंतर वाढते. पण हिवाळीं पिकांचे तसे नसते. आकाश धरणीला धुक्याच्या मिषाने चहूबाजूंनी सांजसकाळ कवटाळीत असते. धुक्याचा जीवनदायी ओलावा आणि गारठा शेताशेतांतून हिरवा काटा तिच्या अंगावर फुलवीत असतो. सूर्याचे किरणही धुक्यातून आरपार जाताना धडपडतच गेलेसे वाटतात.

या दिवसांत सूर्यप्रकाशाच्या कांबी सकाळच्या वेळीं धुक्याच्या पसाऱ्यातून मार्ग आक्रमीत असताना जशा स्पष्ट व रमणीय दिसतात तशा धुके ओसंडलेल्या हंगामात दिसत नाहीत. सूर्य वर आला आणि धुके विरलेसे वाटले तरी झाडांच्या मधून जे उन्हाचे कवडसे जमिनीवर वा घरांच्या छतांमधून, झरोक्यांमधून भिंतींवर पडतात, ते सारे या किरणांच्या शलाकांमधूनच पडलेले दिसतात. जणू काही हिवाळ्यात आपल्यापासून दूरदूर जाणाऱ्या धरणीला, आकाशाने धुक्याने लपेटून टाकली असता आपल्या हातांनी चाचपडत चाचपडत सूर्य स्पर्शीत असतो. तिचे आकाशाच्या मिठीत दडलेले मुख प्रकाशाकडे वळवीत असतो. अगदी नाजूक सुखावह असे त्याचे किरण अनुनयाची कला कशी असावी, हे जणू काही प्रत्यक्ष दाखवीत असतात. मोठ्या रात्रीचा गारवा व विश्रांतिसुख अनुभवून तुष्ट, पुष्ट झालेली पृथ्वी आळसत आळसत सूर्यसंमुख होत असते.

पौष महिन्याचा विचार मला आदिवासींच्या एक दोन कथांशिवाय आता करताच येईनासा झाला आहे. पृथ्वीचा अनुनय आकाश व सूर्य दोघेही करतात. पृथ्वीचे खरे प्रेम आकाशावर पण दैवयोगाने लग्न होते सूर्याबरोबर. आकाश रडते, ते पावसाच्या रूपाने. त्याची मिठी मेघांच्या व धुक्याच्या रूपातली. पृथ्वीशी सूर्याचे मीलन सांजसकाळीं होते. त्यावेळीं आकाश तळमळते आणि सकाळीं दहिवराचे अश्रू गाळते! पौषातले उगवते तांबडे लाल सौम्य सूर्यबिंब उगवताना, झाडांवर कुंदाची ती पांढरी शुभ्र फुले दवाचे थेंब पाकळ्यांवर झेलून आपल्या सुगंधाचा श्वास रोखून निश्चलपणे उभी असलेली पाहिली, की खरोखरच वरचे रूपक सार्थ झालेसे वाटते, आणि म्हणूनच पौषातला सूर्योदय पाहणे मला फार आवडते.

ते पाहा सकाळी धुक्याचे ढग पूर्वेला दाट साचलेले आहेत. चौफेर क्षितिजाजवळचे धुके गहिरे काळसर, तर हे पूर्वेकडचे कसे दाट पांढुरके वाटते आहे; पडद्यामागून पडदा पांढरा होतो आहे आणि मग सात पापुद्र्यांच्या आतून शेंदरी रंग पातळ होऊन धुक्याच्या अभ्रांवर पसरतो

क्षणाक्षणाला तो अधिकाधिक लाल होत जातो. शेवटी इतका लाल होतो की त्यातून कोरीकोरीने प्रगट होणारे लाल सूर्यबिंबही थिजल्यासारखे व जरा फिकेच वाटते. किरणांची प्रभा या लालीतच जिरलेली आहे. पण मिनीट दोन मिनिटांतच सूर्यबिंबाचा तांबडेपणा खुलू लागतो आणि आजूबाजूच्या धुकेरी वातावरणात सोनेरी छटा मिळाल्याने बाजूचा लाल रंग फिका पडत जातो. आणि किरणाचे फाटे सरळसरळ पृथ्वीपर्यंत पोचतात. कधीकधी सूर्यकिरणे आवरून लाल स्थितीत असताना, आकाशातून उडत जाणारी पाखरे धावत जातायेताना त्या गोळ्याच्या आड आली, की एका लाल पण पारदर्शक तावदानासारखा, गवाक्षासारखा तो सूर्य दिसतो आणि मग ती पाखरे त्या गवाक्षातून दूर अंतराळात तरंगल्यासारखी भासतात.

पौषात कधी कधी ढग आले तर सूर्योदयाच्या वेळी ते ढग रुप्याच्या पिंपळपानावर बारीक सोनेरी नक्षी काढावी तसे दिसतात; कधी हुबेहूब रुपेरी शिंपलीच्या आकाराचे; आणि मग त्या शिंपलीच्या आत सूर्याचे लालसर मोती बसल्यासारखे वाटते. कधी ते सूर्यबिंब ढगाआड दडले की फेसाळ समुद्रातून चालणाऱ्या सोनेरी नावेसारखे भासते. नुसता सूर्योदयच नव्हे, तर ढग आले असताना पौषातला सूर्यास्तही मोठा गमतीचा दिसतो. भाद्रपदापेक्षा अगदी वेगळा. पश्चिमेला सूर्यबिंब बुडू लागले म्हणजे ढगांच्या दोनच हिमशुभ्र शिखरांवर कडाकडांनी विलक्षण तळपते, सोनेरी तेज खेळू लागते, जणू काही एरवी चंचल असणारी विद्युल्लताच स्थिररूप घेऊन ढगावर झोपून राहिली आहे. थोड्याच वेळाने हे तेज मंदावले म्हणजे सकाळी जशा किरणांच्या कांबी दिसतात तशाच काळोखाच्या तुळया ढगांतून जमिनीकडे येताना दिसतात. या दिवसांत ढग आले असले आणि विशेषतः डोंगराच्या माथ्यावर ते स्थिरावले की भर दुपारीही याच काळोखाच्या कांबी अशाच धावत येताना दिसतात. धुक्याचीच ती लीला असावी. धुक्यामुळेच सूर्यकिरणे अडल्यामुळे या लोंबत्या सावल्या अधांतरी तरंगत असलेल्या दिसत असाव्या. जशी श्रावणातली रंगसुशोभित इंद्रधनुष्ये, तशीच ही कृष्णवर्णी वलये.

जसे ज्येष्ठातले मेघमंडळ तसे पौषातल्या धुक्याचे धूम्रवलय ! इथून पुढे ते धुके अधिकाधिक दाट होत जाईल आणि पुष्कळदा सांजसकाळी नेहमीची परिचित व जवळची दृश्ये सुद्धा ते झाकून टाकील. आणि मग उगीचच खिडकीत उभे राहिलो की आपली नजर, एरवी चिरपरिचित असलेली, पण ज्यांच्याकडे आपले विशेष लक्ष लागत नाही अशी ती दृश्ये, ती घरे, ती झाडे, ती माती, ते दगड अट्टाहासाने धुक्याआड लपली आहेत, म्हणूनच शोधण्याचा प्रयत्न करील. इतकेच नव्हे तर उन्हातही फिरून ती हरवली नाहीत ना, म्हणून पुन्हा दृष्टी त्यांना सारखी चाचपीतच राहील. लांबचे पाहण्यापेक्षा जवळचेच निरखीत बसायचे हा माझा पौषातला नेहमीचा चाळा असतो. समोरचीच गंमत पाहाना.

हे खच्ची केलेले उंच गुलमोहोराचे झाड. ना त्याला पान ना डहाळ्या. त्यामुळे उघड्या पडलेल्या बुंध्यावरची ढोली अधिकच नजरेत भरते आहे. परवा त्या ढोलीची मजा झाली. नेहमी कावळे, साळुंक्या आणि पोपट त्या ढोलीशी खडमडत असतात. रात्रीची वेळ. पौषाची द्वितीया तृतीया असेल. रात्र काळोखीच. मी खिडकीतून बाहेर पाहिले. तो ढोलीतून काही चकचकताना दिसले. मांजराचा डोळा तर नसेल ? की काजवा ? चंद्रज्योतीसारखी निळसर ठिणगी दिसत होती. मांजराचा डोळा कसा असेल ? ते तर दोन दिसायला पाहिजेत; की कुणी जिवाणू असेल ? पण साप असता तर झाडावर चढलेल्या वेलीच्या वेटोळ्यात कावळे रात्री झोपतात त्यांनी लगेच कावकाव करून सगळा मोहल्ला जागा केला असता. शत्रूची चाहूल कावळ्यांना लागते तशी दुसऱ्या कुणाला क्वचितच लागत असेल. काजवा म्हणावा तर तो अकाली कसा आला आणि एवढा स्थिर कसा ? मग लक्षात आले की पारशी लोक मासे खाऊन त्यांचे खवले रस्त्यावर टाकून देतात. माशांच्या टाकलेल्या भागांपैकी मुंडी कावळ्यांनी उचलून झाडाच्या ढोलीत टाकली असावी. मासे रात्री फॉस्फरसमुळे फार चमकतात, तीच ही चमक त्या तुकड्यावरही दिसत होती. हा तर्क. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे कावळ्यांची कावकाव नेहमीपेक्षा वेगळीच

ऐकून मी जागी झाले. पहाटेच्या धूसर प्रकाशात, ते झाड व ते पक्षी काळेपणानेच जास्त दाट छाया असल्यामुळे वेगळे दिसत होते. दोन कावळ्यांची ढोलीशी झटापट चालली होती. बाकीचे बवे कावळे आजूबाजूच्या झाडांवरून उडत होते. येरझारा घालीत होते. घोगऱ्या आवाजात कावकाव करीत होते. आणि मग तीरासारखा विजयी कावळा तो माशाचा तुकडा घेऊन पंख फडफडावीत दूर उडाला आणि त्याचा प्रतिस्पर्धी त्याच्या मागे धावला. क्षणभर बघ्यांनी कावकाव केली आणि सर्व सामसूम झाले ! पहाटेचा प्रकाश फाकू लागला होता. चिमण्यांची किलबिल सुरू झाली होती. क्षणभर विसावा घेतल्यानंतर कावळ्यांच्या नेहमीच्या सादी त्यांच्यांतच मिसळल्या. त्यातच घारीची आनंदाची कर्कश आरोळी आणि उच्च स्वरात साळुंक्यांचे किनऱ्या आवाजातले स्वर मिसळले. पलीकडे कोंबड्यांची छाती फुगवून फुगवून आकाशाकडे तोंड करून मुक्त स्वराने काढलेली बांग, या सर्व आवाजांना आपल्यात मिळवून घेऊनही सर्वांवर मात करीत होती. पहाटेची आरोळी खरी माझीच असेच जणू त्यांचे आरवणे सांगत होते.

दिवस वर आला. पानाफुलांचे, वस्तूवस्तूंचे रंग स्पष्ट वेगळे दिसू लागले. शिरीषाच्या हिरव्यागर्द डेरेदार झाडांत मोठी हालचाल झाली. आणि मग दोन कर्कश आरोळ्या फोडून दोन पोपट त्यातून बाहेर पडताना दिसले. आता वरच्या फांदीवर असल्यामुळे त्यांचा हिरवा रंग व आकार झाडाहून वेगळा दिसत होता. फिरून दोन आरोळ्या त्यांनी फोडल्या. पण त्यांत क्रोधाचा आविर्भाव नव्हता. ती पाखरे स्वतःचा आनंद आणि उत्साह अंगात न मावल्यामुळेच जणू काही एकमेकांना प्रेमाची साद घालीत होती. मग ती दोघे उडाली आणि त्या गुलमोहोराच्या बिळापाशी आली. झरझर पंख पसरून दोन तीन फेऱ्या त्यांनी झाडाभोवती घातल्या. मग तो मोठ्या शेपटाचा पाकचंदनी नर झाडाच्या एका गाठीवर बसला. मादी त्याच्यापासून हातभर अंतरावर असलेल्या बिळाच्या तोंडाशी बसली. अशा तऱ्हेने की तिचे तोंड त्या बिळात लपले. पाठ बाहेर राहिली. क्षणभर ती तोंड बाहेर काढी, मग

त्या घरकुलात खुपशी. घरकुलाची नारीला असणारी स्वाभाविक ओढ आता मूर्तिमंत या पोपटिणीच्या रूपाने माझ्या पुढे होती.

ती नराला विसरली. अजून ती गाभणही नव्हती, तेव्हा पिलांचाही प्रश्न नव्हता. पण हे घर तिथे होते. आंतरिक प्रेरणेने भावी निर्मितीच्या जाणीवेनेच ती त्या घराकडे ओढली गेली होती. अर्धा पाऊण तास ती अशी बसली होती. पोपट आपला तिच्या भोवती भोवती करीत होता. पण ती जणू काही काहीतरी महत्कार्यात गुंग झाल्यासारखी दिसत होती. तिच्या या कृत्याला नराचीही मनोमन संमती दिसत होती. तो तिच्या आजूबाजूला टेहळत होता. पण तिला स्पर्श करून किंवा नुसता आवाज करूनही तिचे लक्ष आपल्याकडे ओढून घेण्याचा प्रयत्नसुद्धा त्याने केला नाही.

हे मुके दृश्य किती किती बोलके होते म्हणून सांगू ? आणि मग ती मादी पंख पसरून उठली आणि झपाट्याने आकाशात उडाली. नरही आरोळी फोडीत तिच्या मागोमाग धावला आणि मग ती दोघे बघता बघता दिसेनाशी झाली. हे त्यांचे जीवननाट्य बघून झाडांच्या पानांच्या हालचालीत, वाऱ्याच्या मागोमाग येणाऱ्या थंडगार झुळकांत, उगवत्या सूर्याच्या तुळई-सारख्या दिसणाऱ्या किरणांच्या धावेत, इतकेच नव्हे तर किरणांच्या गाभ्यात तरंगणाऱ्या त्या असंख्य व सतत चळवळणाऱ्या परमाणूंतही अशाच जीवनसंकेताचे सतत नाट्य चालल्याचा भास मला होऊ लागला. या साऱ्या सचेतन अचेतन वस्तूंची ही हालचाल म्हणजे सृष्टीच्या तळाशी असणाऱ्या अदम्य जीवनस्रोताच्या तालावर चालणारे नर्तनच वाटते. या भव्य विश्वात्मक लयबद्धतेची जाणीव पौषात होते तशी इतर वेळी क्वचितच होते. या जाणी-वेची सुरुवात पौषात होते. म्हणून ती फार जाणवते. कारण पौष हा निष्पर्णतेचा काल. झाडांची पाने, आंबे, फणस, शिरीष व वड सोडल्यास, सर्व गळून उघडे दांडोरे शिल्लक राहिले आहेत. उघड्या आकाशाला उघडी झाडे वाऱ्याने कापतकापत अधिकच घट्ट बिलगल्यासारखी वाटतात. धुक्याच्या आवरणाखाली सांजसकाळ आकाशही त्यांना घट्ट पोटाशी धरू पाहाते, ओलावा

देते. त्यांच्या अंतरातला पाने फुटविण्याचा ओलेपणा कायम ठेवते. पाने टपटप गळतात. तीही विशिष्ट लयबद्धतेत. झाडे उघडी पडल्याने पाखरे त्यांचा आसरा सोडतात. जीवनाचा आविष्कार काही काळ अगदी थांबलासा वाटतो. पण ही स्तब्धता, हा काही न होण्याचा काळ जीवनस्रोताच्या लयबद्धतेला सर्वांत महत्त्वाचा काळ. दोन सुंदर सुरांमधले स्तब्धतेचे अंतर असते, तसेच हे मध्यंतर आहे. झाडावर पालवीचा पहिला अंकुर फुटतो त्या वेळी जीवन-स्रोताचा पाझर झाडाच्या सर्वांगांतून अनिर्बंधपणे वाहू लागतो. हवेतला कडक थंडपणा, धुक्यातली कापविणारी शीतलतेची धार आणि दृष्टीला अंध करणारा, धुकटपणा ही सारी पुढे येणारा हृद्य जीवनाविष्कार प्रकट होण्यासाठी अवश्य असणारी अभावात्मक तंत्रे आहेत.

सृष्टीची सारी हालचाल एका तालासुरावर बांधलेली आहे, हे जिथे जिथे काही गती दृग्गोचर होते, तिथे तिथे आढळून येते. प्रत्येक जीव स्वतंत्रपणे वावरल्यासारखा वाटला, तरी त्याची प्रत्येक हालचाल कोणत्या तरी हेतूला जुळलेली असून तो हेतू दुसऱ्या कुठल्या तरी वस्तूला जुळलेला असतो. असे हे रहाटगाडगे अखंड चालू असते. गतिमानतेमुळे वस्तूंवस्तूत आलेला सुसंवाद व एकतानता कशी असते पाहा. पौषात अगदी बारीक मुरकुटे हवेत असंख्य उडत असतात. उन्हात ती पांढऱ्या गवती फुलांप्रमाणे चमकतात. ही मुरकुटेही उडताना स्वत:भोवती गिरक्या घेतात. जरा पुढे जाऊन परत त्याच झटक्यात मागे फिरतात. वरती आंब्याच्या मोहरावर ज्या रंगीत माश्या घोंगावताहेत, त्यांची गती पण अशीच झटक्याझटक्याने उलटसुलट फिरण्याची आहे. पण त्या वरखाली अशा गिरक्या घेतात तर मुरकुटे उभीआडवी हालतात. बागेत फुलपाखरांच्या फुलांकडे धावत जाणाऱ्या गतीच्या लयीत या दोहोंची गती विरोधामुळेच जणू मिसळल्यासारखी वाटते. त्यात भर चिमण्यांच्या हालचालींची. चिमण्यांनंतर इतर पक्ष्यांच्या, झाडांच्या, किरणांच्या आणि सूर्याच्याही गतीची संगती जमते. असा हा तालबद्ध हालचालींचा मेळ वाटतो. एकामागून दुसरे यायचे हे ठरलेलेच जसे. वृक्ष

पर्णभाराने झाकून गेले की ही गतिमानता तितकी तीव्र भासत नाही. ( जशी आता व माघात दोन महिने ती भासेल. ) उंच आकाशात आरोळ्या फोडीत गिरक्या घेणाऱ्या घारी, उंच माडांचे ते डुलणारे शेंडे, कावळे, चिमण्या, पोपटं व इतर पाखरे व मुरकुटे, सारी एकाच गतिमानतेच्या लयीने भारल्यासारखी वाटतात.

काटेसावरीचे निष्पर्ण झाड वसंतात फुलले की किती सुंदर दिसते. पण आता या झाडाचे रूप नुसते त्याच्या काटेरी फांद्यांत पाहायचे. पण नीट निरखून पाहा ! या झाडाचा नूर रडवा नाही. त्याचे काटे त्याच्या अंगातून थरारून उठणाऱ्या हर्षाच्या लहरींचे मूर्त स्वरूप आहेत. गुळगुळीतपणापेक्षा हे खडबडीतपण किती जिवंत वाटते ! या झाडाच्या ऊर्ध्वगामी डहाळ्या कशा कलात्मकतेने मुरडल्या आहेत ! जणू एखादी कुशल नर्तकी सस्मित वदनाने कमरेला किंचित बाक देऊन एक हात कमरेवर ठेवून दुसऱ्या हाताच्या मुद्रेने ‘ पुढे काय ’ अशा तऱ्हेचा खेळकर अभिनयच करते आहे, असा मला नेहमी भास होतो. ‘ पुढे काय ? पुढे काय ? ’ हेच प्रश्नचिन्ह, या झाडाचे अनुकरण म्हणून इतर झाडांच्या निष्पर्ण डहाळ्यांच्या आकारातून सर्वत्र प्रतीत होतेसे वाटते. निसर्गाच्या चिरसंगतीत राहणाऱ्या आदिवासींनी उगीच नाही यौवनोत्सव या महिन्याच्या पौर्णिमेला करायची प्रथा पाडली. सावरीच्या काटेरी फांदीला उगीच नाही त्यांनी प्रणयोत्सुक कौमार्याचे प्रतीक बनविले. संपूर्ण निष्पर्णतेचा, संपूर्ण पुष्पमय विकसनाशी असलेला चिरंतन संबंध दाखविणारी झाडे सावरी चाफ्याचीच. केशवसुतांनी कंपायमान झालेली सुकुमार संगमोत्सुक कलिका पाहिली. पण सावरीच्या रूपाने काटा अंगावर फुललेले उघडे यौवन, फुलण्यास उत्सुक पण तितकेच भिणारे शालीन यौवन आदिवासींच्या प्रतिभेने जागते ठेवले, हे किती जणांना माहीत असेल ?

## मायावी माघ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

माघाचा महिना लागला. सकाळची उन्हे वाढीस लागली आहेत. पण झाडांच्या सावल्या पाने गळतीस लागल्यामुळे पूर्वीसारख्या भरदार राहिलेल्या नाहीत. हवा कुंद व धुंद आहे. धुक्याचा रंग सर्वत्र भरून राहिला आहे. झाडांच्या उघड्या बोडक्या फांद्या, पानांचे तपकिरी पिवळ्या छटांचे विशीर्ण रंग, तो भकास सुकेपणा, एक प्रकारचा चमत्कारिक अस्ताव्यस्तपणा, कुठेही पाहा, तुम्हाला दिसेल. तरी पण थंड वातावरणामुळे ऊन्ह विशेष आल्हादकारक वाटू लागल्यामुळे एकंदर देखावा उदास वाटत नाही हे खरे. थंडीच्या उत्तेजकपणामुळे ही विशीर्णता, उत्तरोत्तर वाढत जाणारी शुष्कता, पुढे येणाऱ्या वसंतवैभवाची पार्श्वभूमीच होय, हे मनाला आतून सारखे जाणवत असते. कोमल पल्लवांवर, पुष्पबहारांवर मोहीत होऊन बाकीचे काही पाहू न शकणारी नजर आता चहूकडे सौंदर्याच्या, सुफलतेच्या आशेने फिरू लागते. वर्षाकाळात तर हिरव्या रंगाच्या गर्द लाटांनी दृष्टीचा पल्ला अगदीच आखूड केला होता;

ढगांमुळे आकाशही किती ठेंगणे वाटत होते. पण आता हिरवेपणा उडत चालला. हिरवा रंग, आंबा, चिंच, वड, फणसांचा दिसतो आहे तो अपवाद म्हणूनच. बाकी झाडांवरची पाने बरीचशी मातकट झाली आहेत. या रंगात झाडाच्या काळ्या कबऱ्या खडबडीत फांद्यांत स्वतःचे म्हणून जे चिवटपण व सामर्थ्य प्रतीत होते, ते नसते. पाने सर्वस्वी ऋतूंच्या आधीन, मातीच्या स्वाधीन अशी असतात. जिथवर मातीचा ओलावा मिळेल, तिथवर हिरव्या रंगाने नटायची, डुलायची. जोवर माती ओलाव्याने फुगलेली, मऊ झालेली, तोवर यांचा भर; पण ती मातीच सुकली, तिचा वरचा थर संकोचला की मग तिचा सारा ओलावा मुळांना पोसण्याकडे खर्च होतो. थंडीच्या माऱ्यात धरणी आपले औदार्य आखडून घेते. निसर्ग जितका उधळ्या तितकाच कंजूष आहे. पानांत वाहणारा रस आता रोखला जातो. पृथ्वीच्या अंतर्गर्भात या वेळी जे खोल जीवनरहस्य दडलेले असते, त्यात सळसळणाऱ्या चंचल पानांना निसर्ग सामील करून घेत नाही. हे रहस्य उघडे न व्हावे म्हणून ती पाने तो मातीसपाट करीत असतो. मातीत खोल शिरलेली मुळे व अचल गंभीर वृक्षांची जडे यांनाच जणू या गंभीर रहस्याचा सारा भार उचलायचा आहे, अशा तऱ्हेने सारी झाडे एक गंभीर भाव दर्शवीत उभी असतात. प्रत्येक झाड—आंबाफणसासारखे अपवाद सोडले तर या वेळी विरळ होत चाललेले दिसते. या विरळपणातच माघाचे सारे वैशिष्ट्य भरलेले आहे. झाडाचा विरळपणा माणसाच्या डोकीवरच्या टकलासारखा विद्रूप नसतो; त्यात एक निराळीच गंमत आहे. कशी ती पाहा. झाडाच्या विरळ झालेल्या माथ्यावर उडत्या पाखरांच्या सावल्या तरळताना किती मजेदार दिसतात. एवढासा पक्षी असला तरी त्याची सावली किती मोठी दिसते. जमिनीवर पडणाऱ्या सावल्यांपेक्षाही या झाडावरच्या सावल्या वेगळाच परिणाम मनावर करतात. पाखरू काळे असो, पारवे असो, हिरवे असो, सावली आपली एकाच रंगाची फिकट काळी दिसते. बाकीच्या वस्तूंच्या सावल्या दाट काळ्या. पण या उडत्या चंचल सावल्यांचा रंग पातळ. रंग एकाच तऱ्हेचा असूनही सावल्यांच्या भिन्न

आकृती आणि त्या आकृतींची एकमेकीत मिसळण्याची, आणि फिरून भिन्न दिसण्याची ती अजब तऱ्हा, व या सावल्यांत दृग्गोचर होणारी गतिमानता यांनीच, आधीच्या महिन्यासारख्या बाह्य सौंदर्याचा आविष्कार नसूनही माघाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण होते. एक प्रकारची स्तब्धता आणि त्याच्या उलट विलक्षण वेग या महिन्यात भरलेला आढळून येतो. झाडे तर बरीचशी पर्णहीन झालेली असल्यामुळे पानांचा डौल, हालचाल, सबंध झाड वाऱ्याबरोबर हालल्यासारखे वाटणारे दृश्य, सारे सारे थांबले आहे. झाडांचे सांगाडे स्वस्थ उभे आहेत. पाणी आटल्यामुळे जलाशयाची हालचाल तर थांबलीच. पण मोठ्या नद्याही अंग चोरूनच चालल्या आहेत. पाण्याची गती अजिबात नाहीशी झाली आहे. त्यातल्या त्यात झाडांवर, पानांवर, बघाल तिथे धुळीचें थर जास्त जास्त साचत चालल्यामुळे एक प्रकारचा जडपणा साऱ्या वस्तुजाताला आल्यासारखा वाटतो आहे. तारुण्य गेल्यामुळे उताराला लागलेल्या स्त्रीपुरुषांच्या मुखावर येतात तसेच करुण भाव वनस्पतींवर उमटलेले दिसल्याचा भास होतो. वातावरणात उल्हासमय गारवा नसता, तर खरोखरच या वरवरच्या कारुण्याचे रहस्य, पृथ्वीत भरलेल्या चैतन्याच्या अदृश्य कोंबाहून दुसरे नाही, हे पटले नसते. पौषात चाफा, शेवरीची झाडे सर्वांआधी पाने गाळून मोकळी झाली. आता हळूहळू वाढत जाणारा, अधिक झोंबरा होणारा वारा त्या निश्चल झाडांना हलवू शकत नाही. त्यांच्या गंभीर आकृती टाळूनच जणू काही तो वाहत असतो. मोठ्या मोठ्या पानांनी भरलेल्या वृक्षांवर झेप घालतो. उन्हाने नसेल इतकी पाने या शिशिरातल्या हिवाने व वाऱ्याने कोळून जातात. ती टपटप खाली पडू लागतात. भराभर पिवळी तपकिरी होऊन खाली गळतात. माघापर्यंत वातावरण शांत होते. वारा वाहत नसल्याने स्तब्ध होते. त्यामुळे सावरी चाफ्याची मोठी पाने कशी गळली हेही कुणाला उमगले नाही. मग शेवग्या-चिंचांच्या बारीक पानांची दखल कोण घेणार ? शिवाय ती झाडे काही एकदम चाफ्याशेवरीसारखी उघडी होत नाहीत. नवी पालवी लागत लागत जुनी गळायची असे होत

असते. मात्र नवी पालवी हळूहळू फुटते व जुनी पाने भराभर गळत जातात, म्हणून ती झाडे विरळ वाटतात. माघात वारा वाढतो, थंडी वाढते, ऊन्हही भासत नाही, तरी असते तेव्हा कडक; त्या वेळी पाने खरीखुरी जलद सुकतात. तपकिरी रंगाची मृत्युच्छाया, झाडांवर बघावे तिथे स्थिर झाल्यासारखी वाटते आणि डोळ्यांना हा रंग सुखकर वाटत नसल्याने, मन अजाणतेपणे वसंताची मार्गप्रतिक्षा करते; पावसाळ्याला आवाहन देते. पण अधिक बारकाईने माघाचे कर्तृत्व पाहायचे म्हटले, तर खरोखरच झाडाझाडाचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांवर घडणारे पक्ष्यांच्या जीवनाचे इतिहास दुसऱ्या कुठल्याही महिन्यात क्वचितच इतके स्पष्ट पाहायला मिळतात. हे पाहा समोरचे शिरीषाचे झाड. वसंतात कोवळी पालवी, वर्षाऋतूत गर्द पोपटी पालवी आणि शरदृतूत हिरव्या गर्द पानांचा डेरा मस्तकावर धारण करून राहणारा हा भव्य वृक्ष. बुंध्यापासून दोन अलग झाडांप्रमाणे याच्या दोन मोठ्या फांद्या आपल्या स्वतंत्र शाखा विस्तारासकट दुभागल्या आहेत. तरीही आतापर्यंत पाने अति दाट व हिरवळ काळसर रंगाची, फांद्यांच्या रंगाचीच असल्यामुळे सारे झाड एकच घुमटासारखे वाटत होते. वर्षानुवर्षे तोच आकार, तोच बदल. या झाडाची एका बाजूच्या फांदीची एक शाखा दुसऱ्या फांदीपर्यंत अशा तऱ्हेने बरीच उंचावर एकदम लवली आहे की, दोन्ही शाखांच्यामध्ये एक लंबवर्तूळ पोकळी सदैव असते. त्यामुळे हे झाड जेव्हा पानांनी गर्द भरलेले असते तेव्हा या बाजूच्या झाडाच्या भागाचा आकार एका मोठ्या अजस्र बदकाच्या डोक्यासारखा दिसतो आणि ती पोकळी म्हणजे हुबेहूब डोळ्यासारखी वाटते. आणि मग या झाडामागचे आकाश ठिपक्याठिपक्यांनी पानांतून, फांद्यांतून दिसू लागते त्यामुळे झाडामागची आकाशाची पार्श्वभूमी अधिक जिवंत आणि उठावदार होते आणि गळत्या पानांच्या काळसर तपकिरी रंगामुळे एरवी झाडावर मृत्यूची भीषण सावली पसरली असती, ती नाहीशी होऊन आकाशाची मिठी चारी बाजूंनी त्या झाडाभोवती पडते. आकाशाचा धुरकट निळा रंग,

ते मादक, उत्तेजक, धुंद धुके, सकाळी टपकणारे ते दहिवर, त्या झाडाची पानगळती कुठच्या कुठे दडवून टाकतात. सकाळच्या वेळीं रोज विरळ होणाऱ्या त्या फांद्यांकडे पाहा; आता प्रत्येक फांदीची कमान, तिची वळणे, किती एकमेकींहून भिन्न दिसताहेत. किती कमनीयता प्रत्येक डहाळींत भरली आहे. पानांच्या डौलापेक्षा ओबडधोबड फांद्यांच्या बाकदार व नाजूक मुरके घेणाऱ्या आकृती, पाने अर्धीमुर्धी गळली असतानाच पाहून घ्याव्या. ही ती पूर्वीची शिरीषाची बगळ्याची फांदी आता कशी मोराच्या पिसाऱ्यासारखी वाटते आहे. साळुंक्यांच्या जोड्यांनी त्या फांदीचा कबजा घेतला आहे. जोडीजोडीने बसणाऱ्या त्या पिवळ्या चोचींच्या, काळसर माथ्याच्या तपकिरी साळुंक्या डौलाने टुणटुण उड्या मारीत फांद्यांवरून चालत आहेत. मध्येच एकदम स्थिर होऊन जोडीदारासमवेत शेजारी बसताहेत. त्या वेळीं मोर-पंखांतल्या डोळ्याप्रमाणेच त्यांच्या आकृती वाटतात. साळुंकीच्या अंगावरच्या चढत्या-उतरत्या छटा आता लांबूनही नजरेत भरताहेत आणि विरळ पानांचे झाड पाखरांच्या सौंदर्याच्या आविष्काराला मुक्त अवसर देत आहे. हे पाहा पोपट. एरवी पानांचा आणि त्यांचा रंग एकसारखा. पण आता पाने जास्त काळवंडली, तपकिरी झाली; विरळ होऊन गळून पडू लागली. त्यामुळे पोपटांचा रंग ती लपवू शकत नाहीत. मोठ्या शेपटांचे डौलदार असे हे पोपट आता जोड्याजोड्यांनी पाहा कसे पिंजऱ्याच्या दांडीवर पायांच्या नखांच्या आधारा-वर सरकावे, तसे डौलदार लांबलचक शेपटे खाली सोडून या मोठमोठ्या फांद्यांवरून सरकत सरकत ऐटीत चालले आहेत. ते आता नेहमीप्रमाणे टुणटुण उड्या मारीत नाहीत; डावीकडून उजवीकडे, उजवीकडून डावीकडे सावकाश सरकत जायचे हाच त्यांचा आता छंद. उडून दुसरीकडे जातील तोवर हा खेळ बंद असतो. त्यांच्या किंकाळ्याही आता दमदार झाल्या आहेत. जोड्या जमल्यामुळे भांडाभांड कमी आहे. निवाऱ्याच्या जागा मुक्रर झाल्यामुळेच त्यांच्या हालचालीत असा हा स्थिरपणा व आत्मविश्वास आलेला आहे. समोरच्या गुलमोहोराचे एक मोठे खिंडार व वरचे लहान

उथळ बीळ दोन्हीही जागा पिलांना ठेवायला सुरक्षित नाहीत असे गेले महिना–दोन महिने हेरून माद्यांनी त्यांचा नाद आता अजिबात सोडलेला दिसतो. घराच्या वळचणी व शिरीषातील ढोलीच त्यांनी पसंत केली आहे.

मार्गशीर्षात आईने लाथाडल्यामुळे स्वतंत्र जगू पाहणारे हे मांजराचे पोर पाहा, आता इकडेतिकडे पडलेली मासळी, गटाराच्या बाजूने धावणारी झुरळे, घरातले लहान उंदीर खाऊन वाढीस लागले आहे. अजून ही मांजरी वयात आली नाही तरी आता पूर्ण सावधगिरीने व आत्मविश्वासाने ती वावरू लागली आहे. गेले दोन महिने उंच उंच भिंतींवर, झाडांवर चढण्याच्याच प्रयत्नात ती गुंग आहे; अजून तिला खाली उतरताना भय वाटते. कधी कधी ती अडकूनच बसते व मग ओरडत सुटते. तेव्हा तिला कुणी तरी तिथून काढून आणावे लागते. उंच झाडांवर चढून झालेल्या फजितीने शहाणी होऊन ती आता समोरच्या पेरूच्या झाडावरच अर्ध्या उंचीपर्यंत चढून जाऊन बसते आणि चिमण्यांची शिकार करता येईल की काय याचा अंदाज घेते. पेरूचे झाडही विरळच होते आहे. त्याच्या काड्या उघड्या पडलेल्या पाहून कावळे त्या तोडण्याचा अभ्यास आतापासून करीत आहेत. पण अजून त्या सुकल्या नसल्याने तुटत नाहीत. पण कावळे दीर्घप्रयत्नी; चोची घासूनघासून ‘कावकाव’ करीत ते फांद्या कशा तोडाव्या ते शिकतच असतात. आणि हे काम करीत असता घरटे बांधायला सुयोग्य स्थळही शोधीतच असतात. परवाचीच गोष्ट. मांजर असेच चढून ऊन्ह खात बसले होते. वर होता एक कावळा! त्याला या शत्रूचे आगमन सहन झाले नाही. तो पंख फडफडावीत इकडून तिकडे झाडावर उडत कावकाव करीत इशाऱ्याचे स्वर काढू लागला. शत्रूला हुसकून लावण्याचा त्याचा निश्चय त्याच्या प्रत्येक उद्गारात व हालचालीत दिसत होता. मांजराला चोच मारण्याचा तो आविर्भाव करीत होता. जवळ मात्र फार जात नव्हता. अंतर राखूनच सारे चालले होते. मांजरातलाही कावेबाजपणा आता जागृत झाला होता. टक लावून ते आपल्या शत्रूकडे पाहत होते, पण आपण लहान

आहो, मारामारीचा पवित्रा आपणास झेपणार नाही हे पुरतेपणी ओळखूनच जणू त्याने आपला शिकारी बाणा आवरून धरला होता. पंजाही ते उचलीत नव्हते, मग नखे बाहेर काढणे दूरच. केवळ नजरेतला मिस्कीलपणा हेच काय ते त्याचे शस्त्र होते. मधूनमधून पाठीला बाक आणून, अंग फुगवून केस फुलवून ते शत्रूला दोन पावले मागे सरायला लावीत होते. कावळ्याची कावकाव ऐकून त्याचा जोडीदार आला. ते जोडपे आता पिलाच्या डोकीवर घिरट्या घालून चोच मारण्याचे भय दाखवून त्याला हुसकावून लावण्याची शिकस्त करू लागले. त्यांची ती गडबड ऐकून तिसरा एक बघ्या कावळाही त्यांच्यांत मिसळला व तिघांनी तीन बाजूंनी त्या मांजरावर हल्ला करण्याचा आव आणला. एवढेसे पोर ते, पण तरीही त्याला चोच मारण्याची हिंमत त्यांना झाली नाही, हे नवल. एका कावळ्याने डोकीवर घिरटी मारावी व मांजराचे लक्ष वेधून घ्यावे व मागाहून दुसऱ्याने चोच मारण्यास यावे, असे चाले. पण मागचा कावळा जवळ येई आणि दचकूनच माघारी जाई. तिसरा कावळा आणखी वर घिरट्या घाली. ते पिलू मात्र इतके जबरे की जरी त्याच्या डोळ्यांत आता भयाची छटा आली होती तरी ते माघार घेईना. बचावाचे धोरण अट्टाहासाने त्याने अमलात आणले. फांद्यांच्या बेचक्यात पानांच्या आडोशाला ते बसले. पानांच्या व डहाळ्यांच्या गुंतागुंतीत जाणे कावळ्यांना इष्ट नव्हते. पाच-सात मिनिटे झाली आणि मांजराला आपणाला सुरक्षित स्थान मिळाल्याचा आनंद झाला. किलकिले डोळे करून ते शत्रूंकडे बघू लागले; पहिले जोडपे वरच्या फांदीवर बसले; त्यांनीही हे झाड पुढच्या संसाराच्या तयारीसाठी हेरून ठेवले असावे; आणि त्याचा कबजा जाऊ द्यायचा नाही म्हणून त्यांनी ही चढाई आरंभली असावी; कारण आता तो तिसरा कावळा त्या दोघांमध्ये येऊन बसताच त्यांनी त्याची मदत विसरून त्याच्या अंगावर येऊन त्याला हुसकून लावले. तो जरा दूर जाऊन फिरून त्रयस्थाप्रमाणे मांजराकडे व आपल्या जातभाईकडे पाहात राहिला. मग त्या जोडप्यापैकी एक कावळा खिडकीच्या

तावदानावरून व दुसरा जवळच्या फांदीवर मांजरावर पहारा देत बसला. मांजर अधिकाधिक अंग चोरून बसले होते. त्यानेही शत्रूवरची रोखलेली नजर अजून काढून घेतली नव्हती. आणखी काही वेळ गेला. सुमारे अर्धा तास असेल. कोणाच्या वृत्तीत काही फरक पडला नव्हता. इतक्यात एक मासे विकणारी कोळीण त्या बाजूला आली आणि सारे भेदभाव क्षणात मिटले. मांजर तिच्या मागोमाग उड्या मारीत चालू लागले आणि कावळे वर घिरट्या घालू लागले. कावकाव करू लागले. पेरूचे झाड रिकामे झाले.

माघात दृग्गोचर होणारे हे काड्या-कुड्यांचे, उघड्या फांद्यांचे दृश्य मनात अधिक भरते. केव्हा, तर या वठलेल्या झाडावरची गेल्या हंगामातील पक्ष्यांनी सोडलेली जुनी घरटी पाहून, या निर्जन घरट्याशिवाय मला तर माघ–फाल्गुनांतल्या निष्पर्णतेचा विचारच करता येत नाही. ही पाहा कावळ्यांची काटक्या-कुटक्यांची घरे अस्ताव्यस्त झाली आहेत व स्वैर पसरलेल्या डहाळ्यांहून वेचक्यातला तो दुरून विसकटलेला दिसणारा घरट्याचा गोळा किती निराळा दिसतो आहे. वस्तुतः तोही झाडांच्या सुक्या काड्यांचाच बनलेला. पण त्यात प्राण्यांची कृती व हेतू अजून भरलेले दिसताहेत. पडीक घर माणसांचा इतिहास बोलका करते, तसे ओसाड घरटे पक्ष्यांच्या वात्सल्याची परंपरा या वेळीं जणू बोलून दाखवीत असते, पक्षि-जीवनाचा अनाद्यंत संकेत सांगत असते. मोठमोठ्या वृक्षांवर असणारे एकच चिमणे घरटे असले तरी ते या वेळीं तुमचे मन ओढून घेईल. जाणते कावळे फिरून या घरांवर लक्ष ठेवून त्यांची जरा डागडुजी करून ते वापरण्याचा बेत करीत असतात व इतर जातभाईंना त्यांच्याकडे फिरकू देत नाहीत. नवे कावळे मात्र अजून प्रणयातही नवखेच असतात. मग हा सांसारिक उरक त्यांना कुठला ! हे झाड सोड, ते धर; काडी उचल, फेक; भिरभिर करावी, इथून तिथून हुसकले जावे आणि शेवटी एखादा निवारा मिळावा असे या महिन्यात त्यांचे सारखे चालू असते. झाडांचा, काड्याकुड्यांचा पसारा नसता,

पाने गळून सुकून इतस्ततः कुठल्याही पाखराच्या चिमुकल्या चोचीत मावण्याइतकी हलकी फुलकी नसती, तर पाखरांची घरे कशी पुरी झाली असती ? पक्ष्यांच्या या स्थितीबद्दल विचार आला की निसर्गाचा आताचा उघडेपणा किती खोल अर्थाने, हेतूने भरलेला आहे ते लक्षात येते आणि मग हा काड्याकुड्यांचा फाफट पसारा, तो वाळका पाचोळा सारेसारे विशिष्ट सौंदर्याने परिपूर्ण आहे असे पटू लागते. जसजशी झाडे उघडी होत जातात, तसतसा पक्ष्यांतला प्रणयोन्माद वाढीस लागतो. वसंतवैभवाशी मिळता असलेला त्यांचा प्रणय, त्यांची गीते आपल्या चटकन लक्षात येतात. पण या उघड्या स्थितीतली त्यांची प्रणयाची व वात्सल्याची आतुरता अजमावयाची, तर या काड्याकुटक्यांशी पक्ष्यांचे असणारे सतत सान्निध्य लक्षात घेतल्याशिवाय समजणार नाही. शाळकरी पोरांप्रमाणे काड्याकुटक्यांचा आकार, वजन, त्या उचलण्याचा अभ्यास, त्यांचा रंग, उपयोग सारे काही पक्षी वसंतागमापूर्वीच मोठ्या हिरीरीने शिकत असतात. चिमणीची उघडी, मऊ पिसांनी, कापसाने भरलेली घरे; कबूतरांची घरांच्या वळचणीला लागून असलेली काड्यांची व पिसांनी भरलेली घरे; कावळ्यांची ओबडधोबड घरे, घारीची ज्यांच्यांतून मोठाली मळकी फडकी अद्याप खाली लोंबत आहेत अशी जंगी कोटरे, नदीनाल्याकाठची चिखल वाळत जात असतानाची झाडा-झुडपांतून लोंबणारी सुगरण पक्ष्यांची काथ्यांची आतून भरगच्च विणलेली अतिसुंदर घरे ! ही सारी या महिन्यात निर्जन व गेल्या हंगामाची निशाणी असलेली घरे आहेत. पण त्याची आता डागडुजी होण्याचा मुहूर्त झाला आहे. वाळक्या काड्यांचे विश्व, सुक्या पर्णांचे विश्व जणू सचेतन झाले आहे. पक्ष्यांची घरे चैत्राअखेरपर्यंत बहुतेक पूर्ण होतात. कधी कधी वैशाखापर्यंतही हे काम लांबते. फाल्गुनातही रीतसर या घरबांधणीला सुरुवात झालेली नसते. पक्षी या वेळी एकमेकांतच पूर्ण रंगलेले असतात. फाल्गुन व चैत्रात त्यांच्या प्रणयरंगाला बहर आलेला असतो आणि मादी गाभण झाली म्हणजेच घर बांधण्याची त्यांची धडपड आपल्या लक्षात येते. पण या संसारी वृत्तीची

चाहूल माघातच त्यांना लागलेली दिसते. संसाराच्या उंबरठ्यावरची स्वप्ने या महिन्यातच दिवसाही पाखरे पाहत असतात. अर्धोन्मीलित भावना प्रणय-रंगाच्या सुरुवातीलाच त्यांना त्यांच्या संतानाकडे आकर्षीत असतात. युगा-युगातून सतत वाहत असणारे वात्सल्य त्या पाखरांच्या अत्युत्कट क्षणातही त्यांना या काट्याकुटक्यांना सतत जखडून टाकीत असते. वरून हा असा सुके निष्पर्णतेचे कवच धारण करणारा माघ अमोघ सृजनशीलतेने भरलेला आहे. प्राणि-मात्रांना अज्ञाताकडे ओढणारा आहे. कठीण काळ्या वृक्ष–पत्तरांतच निर्मल जलौघ दडलेला असतो; तसेच माघाचे आहे. ही वरवर दिसणारी रुक्षता, ते तरूतरूवरचे कठोर रेषामय दृश्य, नद्यातळ्यांचे सुकून कठीण कठीण होत जाणारे तळ, सतत वरवर राहणारी सुकी धूळ, या साऱ्या बाह्य अवतारात माघाच्या अंतरातला मायावीपणा दडलेला आहे. वसंत, वर्षा यांच्या रहस्यांची बीजे मोठ्या कंजूषपणाने तो साठवतो आहे. संयमाची बतावणी करतो आहे. या महिन्यातली अणुरेणूंतून फुटू पाहणारी सृजनशीलतेची अनावर उकळी पाखरांच्या देहांत मावेनाशी झाली, की ती बिचारी काड्यांवर चोच मारून मारून वेजार होतात. उगीचच त्या इकडून तिकडे फेकून देतात. या पाहा, पोपटाच्या दोन जोड्या एकमेकांत घराच्या वळचणीतल्या एका भोकाचा कबजा घेण्याकरता आपसात झगडताहेत. एक पोपटीण तर त्या भोकात तोंड खुपसून कधीची बसली आहे. नर त्या दुसऱ्या जोडप्याबरोबर केव्हाचा झुंजतो आहे. ते पोपट जवळच्या एका झाडावर बसून बसूनच त्या बिळाकडे पाहताहेत, तोवर कावळ्यांची झुंड येऊन त्या पोपटांना हुसकावून लावते आहे. माघाचा मायावीपणा आपल्या या सहज लीलांतून उघडा पडतो आहे याची जाणीव त्या पाखरांना काय ? वरून रुक्ष वाटणाऱ्या पण आतून सरसतेच्या लाटा निर्माण करणाऱ्या माघाची माया, जड, गंभीर व अचेतन दिसणाऱ्या वृक्षांची स्तब्धता आणि त्याच्या उलट पाखरांची वाढती गती, यांचा मेळ असा विरोधी तऱ्हेने घालीत असते. माघातल्या काट्याकुटक्या या एकंदरीत यक्षिणीच्या कांडीसारख्याच असतात म्हणायच्या.

## रूपधर
## फाल्गुन

वसंताच्या रूपवैभवाचा, नादऐश्वर्याचा खजिना फाल्गुनात खुला झाला. पौषाचे ते धुके ओसरले. माघातला सुका व मुका तपकिरीपणा लयाला गेला. देशी शिरीषांच्या झाडावरच्या सुक्या शेंगा वाऱ्याच्या झुळकीबरोबर हालता हालता, पावसाची झिमझिम व्हावी असा अत्यंत सुखकारक नाद करू लागल्या. जणू काही वसंतलक्ष्मीचे नाजूक, नखरेल पाऊल त्या वृक्षाच्या मखमली पर्णांकुरांवर पडून त्याचा पडसाद झाडभर घुमतो आहे. पुष्कळ झाडांच्या सुक्या शेंगा या महिन्यात रात्रीच्या शांत वेळी असाच पावसाच्या सरींचा आभास निर्माण करतात. निसर्गातही आवाजांच्या, रूपांच्या अशा नकला नेहमी चालू असतात.

मृगजळे ठिकठिकाणी वाढताहेत आणि उन्हाच्या माऱ्याने, पाणी पिऊनही तृप्त न होणारी प्राण्यांची मने स्वतःकडे ओढून घेताहेत. वाढते वारे समुद्रकाठीच्या सुरूच्या झाडांच्या मधून वाहताना कापले गेल्यामुळे

समुद्राच्या लाटांचाच घोष उठल्यासारखा वाटतो आहे. चहूकडे नाजूक नादाच्या लाटा वाहताहेत. झाडात व आकाशात, पक्ष्यांचे प्रणयाने आर्द्र व मधुर झालेले, साद व प्रतिसादींच्या रूपात तानेसारखे वाटणारे आवाज एकमेकात मिसळताहेत. साळुंक्यांच्या आवाजातला किनरेपणा कमी होऊन, त्यांच्या गळ्यांतला गोडवा जणू काही शिरीषाच्या पालवीला दिवसो-दिवशी उमलवतो व डुलायला लावतो आहे. पोपटांच्या कर्कश आरोळ्यातून काही तरी जाणते शब्द, कारुण्य व आनंद यांनी काठोकाठ भरल्याप्रमाणे बाहेर पडल्याचा भास होतो आहे. कावळ्यांचा शब्द श्रुतिमनोहर नाही. पण आता प्रणयाने गदगदलेले त्यांचे गंभीर बसके आवाज, त्यांच्यांत आता किती मृदुपणा आणि जाणतेपणा भरला आहे, ते दाखवीत आहेत. प्रणयोन्मादाच्या ऐन क्षणीही कलापूर्ण संयम बाळगणारे हे पक्षी आपल्या गंभीर शब्दांनी 'आयुष्यातला आनंद मनमुराद चाखायचा तर कोणत्याही क्षणी मनावरचा ताबा जाऊ देऊ नका' असेच जणू सांगत असतात.

या नेहमीच्या सदोदित भांडल्यासारखा कलकलाट करणाऱ्या चिमण्या पाहा! त्यांचेही आवाज आता किती बदलले हो! नेहमीचा चिमणा. पण आता त्याचा आवाज आडून ऐकला तर तो चिमण्याचा आवाज नसून कुठल्या तरी फुलचुख्या पाखराचा आहे असे वाटते. शेवग्याची कोवळी पालवी कुरतडणारा हा चिमण्यांचा थवा. अंगाला किती मुरड घालून, त्या ती कोवळी पाने कुरतडताहेत. त्यांचे एरवी गुबगुबीत वाटणारे देह आता कसे रबरासारखे लवचिक होऊन ताणले गेले आहेत. कधी कधी खाली डोके करून त्या फांदीवर चक्राकार गिरक्या घेतात. चिमण्यांचा हा कोल्हाटी अवतार काही न्याराच वाटतो. किती चपळ, हलके झाले आहे त्यांचे शरीर! या माद्यांच्या कोलांट्या आणि त्या वेळी त्या काढीत असलेले खुळखुळ्यांच्या आवाजाप्रमाणे गुडगुडत बाहेर पडणारे स्वर अत्यंत मनोज्ञ असतात. वास्तविक पक्ष्यांच्या माद्या नरांहून बेडौल असतात; पण फाल्गुनातला चिमण्यांचा हा डौल पाहिला की त्यांच्या आसपास वावरणाऱ्या, कंठावर

काळा ठिपका असणाऱ्या आणि कामविव्हलतेने शेपटांचा चिमुकला पिसारा फुलविणाऱ्या नरांपेक्षा या माद्या किती तरी अधिक मोहक वाटतात. त्यांच्या त्या पांढरट गुलाबी चोची, त्यांच्या त्या भस्मी रंगाच्या माना, ती अंगाबरोबर वट्ट बसणारी पिसांची कंचुकी, त्यांच्या या चपळपणाला किती खुलावट आणते आहे. पुष्कळदा मी या चिमण्या नेहमीच्या आहेत की आणखी कुठल्या रानचिमण्या झाडावर बसल्या आहेत, अशा संभ्रमाने त्यांच्याकडे तास तास बघत बसते. तरी पण त्यांचे सारे व्यवहार इतके विजेसारख्या वेगाने होत असतात की, त्यांच्यावर नजर ठरत नाही. पण दुपार कलंडली की, त्या धुळीत अंग घुसळायला बसतात, तेव्हा त्या संथ असतात; त्याच वेळी या तर रोजच्याच चिमण्या हे तेव्हाच पटते. ऐन प्रणयाच्या बहरातसुद्धा स्वतःच्याच रूपात आणि विहारात पूर्ण रमणारी आणि नराला स्वतःच्या काबूत ठेवणारी चिमणीसारखी मादी विरळाच.

ऐन दुपारची वेळ आहे. पक्ष्यांचे स्वर काही स्पष्ट, काही अस्पष्ट असे एकात एक मिसळून गेले आहेत. पारव्यांचे घुमणे आणि घारींच्या अगदी उंचावरून फुटणाऱ्या कर्कश पण जीवनानंदाने परिपूर्ण अशा आरोळ्या, यातून सप्तसुरातल्या आणि सर्व तालातल्या स्थूल छटांचे अजब मिश्रण होऊन दुपारच्या शांतीत नादब्रह्माचे गांभीर्य ओतले गेले आहे. आवाज व स्तब्धता यांच्यातला विरोध नष्ट झाला आहे. ऐन दुपारी सूर्य आग खाली फेकीत असताना पाखरांच्या गळ्यांतून, त्यांच्या उडत्या फडफडणाऱ्या पंखांतून निर्मितीचे वृंदसंगीत झाडाझाडांतून कोंदून त्यांच्या वाहत असते; घराघरात ते निनादित होत असते; मनामनाला वसंतागमाची प्रेरणा देत असते. जीवनाच्या उन्मादाची निसर्गाच्या रोमारोमातून फुटून जाणारी उकळी पाहण्यासाठी माध्यान्हीच्या दीर्घ प्रहरी आवाहन देत असते.

जमीन सुकली आहे. सूर्य तापतो आहे. धूळ वर उडते आहे. वाऱ्याच्या झुळकांबरोबर सुकलेली पाने गिरक्यांचा नाच खेळताहेत. तो पाहण्यासाठी ते वृंदसंगीत आम्हाला आवाहन देते आहे. या उष्णकाली पाने गाळून आपला

श्वासोच्छ्वास गेले दोन महिने झाडांनी रोखून धरला होता. उन्हामुळे झाडातला अंगरस वाढीला लागला. झाडाझाडावर कोवळ्या पालवीची लाजरी हिरवळ अंग चोरून उभी राहिली. आंबा, फणस सोडल्यास बहुतेक झाडांवरची जुनी पाने गळूनच गेली आहेत. आणि नवी पालवी भराभर फुटते आहे.

झाडाझाडाला पालवी फुटण्याच्या तऱ्हा तरी किती वेगळ्या! ही पाहा नाजूक सीताफळ. तिच्यावर पालवी अशी फुटली आहे की जणू काही प्रत्येक पान दुसरेच कुठले तरी बाहेरून चिकटवले जाते आहे. समोर करंजाचे झाड आहे ते पाहा, केवढे मोठे आणि जून. पण त्याच्या अंगावर चौफेर पालवी अशी फुटते; एक दिवस सकाळी अचानक असे दिसते की जणू काही रात्री कुणीतरी खोडकर वनदेवता फिकट हिरव्या रंगाची धूळच फुंकर घालून झाडभर उधळून गेली असावी. तसेच ते दुसरे एक ऑस्ट्रेलियन झाड आहे. त्याच्याही निष्पर्ण देहावर पालवी अशी येते आणि ती एकाच दिवसात इतकी वाढते की कुणीतरी हिरव्या रंगाच्या चुळाच एकामागून एक झाडावर टाकते आहे असे वाटते. आणि हे समोरचे शिरीषाचे झाड! त्याच्या त्या काळ्या-भोर खडबडीत आणि आकाशाला वेढू पहाणाऱ्या महत्त्वाकांक्षी फांद्या. पण त्यांच्या मनांतील कोवळीक जागी होऊन आता तिचीच हिरवी लव बनून तिने त्यांना आच्छादून टाकले आहे. अगदी झाडाच्या अंतरंगातून बाहेर फुटलेली हिरवी उकळीच वाटते आहे ही पालवी म्हणजे.

शिरीषाच्या पोपटी पालवीचा सोनेरी नूर माध्यान्हीच्या उन्हात सांज-सकाळच्या लालसर प्रकाशात पाहातच राहावे. दिवसागणिक पोपटी रंग खुलत चालला आहे. हलत्या पानांच्या रूपाने हे हिवाळ्यात श्वास रोखून बसलेले झाड, जोरजोराने श्वासोच्छ्वास करते आहे असे वाटते. आणि त्याचे ते निःश्वास हुंगण्यासाठीच जणू पाकोळ्या भिरीभिरी झाडाच्या माथ्यावर नाचताहेत. चार दिवसांतच पाने वाढून दाट झाली; पाकोळ्यांचा नाचही दुणावला आहे. काय पाहिले त्यांनी? एक दिवस सकाळच्या सोनेरी उन्हात शिर नम्र करून, मुरकून, एक लाजाळू फूल फिका गुलाबी पेहराव करून

पानांच्या झुल्यावर बसलेले दिसले. पाकोळ्यांनी त्याचे चुंबन घेतले आणि साऱ्या दुनियेला वसंताचे मधुकोष झाडाझाडावर खुले झाल्याची बातमी त्यांनी दिली. दुसऱ्या दिवशी अर्धे झाड फुलांनी भरले. किसलयांचा उन्मादक सुगंधी चारा पोपटांनी भरपूर खाल्ला. फुलांच्या डहाळीवर अलगद बसून पोपट किती रुचीने आणि रसिकतेने, नाजूक नखरा करीत हे केसर खातात, हे पाहिले की नवल वाटते ! कैऱ्यांना टोचून घायाळ आणि कुरूप करणारे पोपट ते हेच का, असे मनात येते.

आत्यंतिक प्रणय व आत्यंतिक शोक ही या महिन्याची वैशिष्टये का समजायची ? तसेच असावे. नाही तर जरा या बागेत पाहा. किती करुणरसपूर्ण नाट्य या मुंग्यांच्या वारुळावर घडते आहे. घरातले लहान मूल धावत्या मुंग्यांना पकडण्याच्या छंदात होते. पायरीच्या बाजूला मोठ्या मुंग्यांचा पुंजका होता, तिकडे ते धावले. त्याला मुंग्या डसतील म्हणून मी त्याला उचलून घेतले आणि खाली निरखून पाहिले, तो काय, एका वारुळाच्या तोंडाशी हा मुंग्यांचा थवा दिसला. पण थवा कसला ? निर्जीव मुंग्यांचा तो ढीग होता. आणि दुसऱ्या वारुळातून एक एक मुंगी सावकाश येऊन त्यातले एकेक धड कष्टाने वाहून नेत होती. त्यांच्या वारुळातल्या बाळांचा तो खुराक होता. पण जरा काडीने डिवचले तो त्या ढिगाऱ्याच्या आतून राणी मुंगीचे मुंडके व धड—नांग्या तुटलेले शरीर आढळले. बिळातली राणी मुंगी गेली की मुंग्या म्हणे अशा तऱ्हेने सामुदायिक हाराकिरी करतात. कीटकसृष्टीतला आत्महत्येचा तो प्रकार पाहून माझे मन सुन्न झाले ! प्रत्येक वारुळात पाचसात महिन्यांनी कामकरी मुंग्या अशाच मरतात. राणी मुंगीचे आयुष्य दोन वर्षांचे असते. ती वयात आलेल्या पोरांना कामकरी बनवते आणि आपण प्रसवात गढून जाते.

तसेच मार्गशीर्षात आईपासून पूर्ण सुटे झालेले, पौषात कावळयांना शह देणारे हे मांजराचे पोर, आता खूप मोठे आणि हुशार झाले आहे. त्याचा शिकारीचा छंद वाढला आहे. ते वयात येण्याची लक्षणे त्याच्या डोळ्यावरून

व पोटावरच्या स्तनांवरून दिसून येताहेत. माजलेले बोके या नव्या सुंदर मांजरीवर नजर ठेवताहेत. एक दिवस एक बोका तिच्या मागे लागला. ती अनभिज्ञ भाटी जीव घेऊन पळू लागली. बोक्याला चेव आला. त्याची पकड तिच्यावर पडली. दात तिच्या कुशीत घुसले. ती विव्हळली. इतक्यात बाजूने चीत्कार झाला. तिची आई संतापाने पेटून तिच्याजवळ आली. वाढलेली आणि परिचित अशी ती मांजरी पाहून बोका तिच्या मागे गेला. पण इतक्यात स्वतःच्या प्रणयाच्या रिंगणात शिरलेल्या त्या प्रतिस्पर्धिनीला, स्वतःच्या लेकीला त्या चिडलेल्या मांजरीने नखांनी रक्त येत होते तिथे फाडून घायाळ केले. ती बिचारी जीव घेऊन पळाली. तेव्हापासून मी पाहते आहे की संधी मिळाली रे मिळाली, की ती मांजरी आपल्या पोरीला ठार करण्याच्या हेतूने टपलेली असते. एकीकडून ही व दुसरीकडून दुसरी एक प्रौढ मांजरी तिच्या आईच्याच भावनेने पेटलेली, त्या नव्या मांजरीच्या पाळतीवर असते. पण ही देखील मोठी शूर व बुद्धिमान आहे. जीवनाच्या संग्रामात यशस्वी होण्याची ईर्षा तिच्यात कमालीची जागृत आहे. मोठ्या मांजरांप्रमाणे कामविव्हलता जागृत न झाल्यामुळे, अजून कोणाही नराच्या आधीन ती होत नाही. ती भावनाच नसल्यामुळे स्वतंत्रपणे जगायचे हेच तिचे एकमेव उद्दिष्ट आहे. आणि म्हणूनच ती लवकरच, त्या मांजऱ्यांवर चढाई करण्यात नाही, तरी त्यांच्यापासून संरक्षण करण्यात पटाईत झाली आहे. प्राण्यांच्या जीवनातील हे असे खेळ पाहून मन भांबावते, उदास होते. नजर भिरभिरते. तोच प्रफुल्ल पळसाचे भगव्या फुलांचे तुरे, त्यांच्या त्या करंजीच्या आकाराच्या, तपकिरी मखमली परकर नेसून बसलेल्या सुंदर कळ्या मन ओढून घेतात, उदासीनता घालवतात. ते ताम्हणीचे निळ्या रंगाच्या फुलांचे बहारदार घोस तर काय वर्णावे ? फुलाफुलांची नाजूक मुरडलेली कडा, पाकळीपाकळीचा तो डौलदार नखरा नजर बंदिस्त करून टाकतो. फाल्गुनाची राणीच आहे ही ताम्हण. आणि त्या निर्गंध पांगाऱ्याचा भडक लालपणा, त्याच्या फुलांचा तो तरवारीच्या पात्यासारखा

आकार तर काय वर्णावा ? त्या थंड ज्योती धोसदार तुऱ्यातून झाडभर चमकताना पाहिल्या की आशेचे तांबडे मनात फुटते, मन वसंताकडे धावत जाते; एवढेच नव्हे तर नाचण पक्ष्याच्या उल्हासाने, जे जे म्हणून वसंताचे त्याला अल्लडपणे स्पर्शीत जाते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८४३२५ वि. निबंध
क्रमांक १८८३ नों. दि. २९/३/६९

REFBK-0015918

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १५८१८
ठाणे

ऋतुचक्रातील लावण्यमहोत्सवाची चित्रे रेखाटणारे हे ललितनिबंध आहेत. दुर्गाबाईंनी डोळे भरून सृष्टीचे दर्शन घेतले आहे. निसर्गाची बदलती रूपे, पशुपक्ष्यांच्या हालचाली, रंगगंधांच्या बोलक्या संवेदना त्यांनी एखाद्या शास्त्रज्ञाच्या डोळस कुतूहलाने न्याहाळल्या आहेत. परंतु या शास्त्रीय दृष्टिकोनाला काव्यात्म प्रतिभेची मिळालेली जोड हे या ललितनिबंधांचे खरे वैशिष्ट्य आहे. या सृष्टीतल्या सर्व सौंदर्याचा भौतिक आणि कलात्मक आस्वाद घेणारे सौंदर्यासक्त मन त्यांच्याजवळ आहे. तसेच, या तरल सौंदर्यानुभवांना सेंद्रिय रूप देण्याचे, या अतींद्रिय क्षणांना इंद्रियांकरवी अनुभवायला लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेच्या ठिकाणी आहे. जाईजुईच्या झेल्यासारखे हातात धरून हुंगावेसे वाटणारे पर्जन्यरूप सूर्यबिंब, पोपटाच्या पिलांसारखी दिसणारी वडाची हिरवी पाने, पारिजातकाच्या मोत्यापोवळ्यांच्या राशीतून फुटणारे श्रावणाचे हसू, फुलांच्या पायघड्यांवरून भूतलावर पदार्पण करणारा पुष्पमंडित भाद्रपद... हे सारे रूपरसरंगगंधाचे, लावण्यविभ्रमांचे जग दुर्गाबाईंचे हे निबंध वाचीत क्षणोक्षणी प्रत्ययाला येते. निसर्गाच्या चित्रलिपीचे रहस्य दुर्गाबाईंना उलगडले आहे याची साक्ष या निबंधसंग्रहात पानोपानी मिळते.

तीन रुपये